विख्यात मानवतावादी, रशियन लेखक लिओ टॉलस्टॉय ह्याने आपली ''वॉर अँड पीस'' ही विख्यात कादंबरी १८५९ ते १८६४ ह्या पाच वर्षाच्या कालात लिहिली.

महात्माजी टॉलस्टॉयना गुरुस्थानी मानत. मानवी जीवनाच्या काही चिरस्थायी चिरंतन प्रेरणा आहेत. युद्धांनी त्या लुप्तप्राय झाल्या तरी नष्ट होत नाहीत. हाच वैचारिक धागा ह्या कथेतही टॉलस्टॉयनी मोठ्या विस्ताराने व मार्मिकपणे गोवला आहे.


समतावादी तत्त्वज्ञानाची प्रेरक शक्ती म्हणूनही टॉलस्टॉयच्या वाङ्मयाला आगळे महत्त्व आहे. सबलांनी निर्माण केलेली धनलालसा व सत्ता, मादक संस्कृती, ह्यांवर मार्मिक कोरडे ओढण्याचे काम लेखकाने ठिकठिकाणी केले आहे. जवळ जवळ बाराशे पानांच्या त्या प्रदीर्घ कादंबरीची ही सारांशकथा आहे.

लेखकाचे सर्व विवेचन सारांशकथेत समाविष्ट होणे अशक्यप्राय आहे. मराठी युवक वाचकांना सारांशरूपाने का होईना, पण जगद्विख्यात अशी ही वाङ्मयकृती वाचनासाठी उपलब्ध करून द्यावी ह्याच हेतूने ही अनुवादित कथा तयार केली आहे. उपलब्ध अशा सर्व आवृत्त्या व वॉर्नर ब्रदर्सचा चित्रपट ह्यांचा उपयोग मोठ्या प्रमाणात झाल्याने लेखकाने त्या सर्वांचे ऋण आवर्जून व्यक्त केले आहे.

'साऱ्यात अवघड पण आवश्यक गोष्ट म्हणजे जीवनावर अढळ श्रद्धा, निरागस प्रेम! आत्यंतिक यातनांतही जीवनावर मनुष्य प्रेम करतो. कारण 'जीवन' हेच जगाचे सार-सर्वस्व आहे. जीवनावरील श्रद्धा हीच परमेश्वरावरील श्रद्धा! जो जीवनावर प्रेम करतो तोच परमेश्वरावर प्रेम करतो!'

हा जीवनसंदेश जगात दीर्घकाळ घुमत राहाण्यात या कादंबरीने भूमिका बजावली.

*'पराभूत जय' ही मराठीतील संक्षिप्त अनुवादित कथा .-दत्त आपटे हे लिओ टॉलस्टॉयचे वाचक भक्त होते. त्यांच्या काळातील उगवत्या विचारवंतांवर टॉलस्टॉयने प्रभाव टाकला होता. त्यामुळे या सारांश कथेच्या पुस्तिकेचे चांगले स्वागत झाले. मुंबईच्या ढवळे प्रकाशन परिवारातील 'निनाद पुस्तके' मालिकेत १९६२ मध्ये ही पुस्तिका प्रकाशित झाली.*




| **प्रकरण** | **पृष्ठ** |
|---|---|
| १ | २१४ |
| २ | २१६ |
| ३ | २१८ |
| ४ | २२० |
| ५ | २२३ |
| ६ | २२५ |
| ७ | २२८ |
| ८ | २३१ |
| ९ | २३३ |
| १० | २३६ |
| ११ | २३९ |
| १२ | २४२ |
| १३ | २४५ |
| १४ | २४७ |
| १५ | २५० |



# पराभूत जय

१.

१८०५ च्या जुलै महिन्यातील ती एक संध्याकाळ होती. पीट्सबर्ग शहरातील बहुतेक सर्व बडी धेंडे, स्वच्छ दीपप्रकाशाने उजळलेल्या पण उकाड्याने अस्वस्थ करणाऱ्या ह्या दिवाणखान्यात गोळा झाली होती. नृत्ये व मेजवान्या म्हणजे बड्यांनी एकत्र जमण्याची एक पर्वणीच! अशा प्रसंगी प्रवेश मिळणे म्हणजे बडेपणाची दीक्षाच! नखरेल उद्दामपणाचे व त्यात भलेपणा मानणाऱ्या शिष्टांचे संमेलन आज भरले होते.

''आपण आता युद्धावर जाणार तर!'' ॲना पावलोव्हानाने विचारले.

''सेनापती कुझावने मला स्वत:चा रक्षक म्हणून नियुक्त करण्याची मेहेरबानी केली असल्याने मला आता जाणं भागच आहे.'' अँड्री उत्तरला. ॲना अर्धवट मिटल्या डोळ्यांनी अँड्रीचे सौंदर्य, रुबाब निरखीत होती. तेथे जमलेल्या सर्वांत अँड्रीचे व्यक्तिमत्व उठून दिसणारे आहे, ह्याची जाणीव म्हातारी असूनही तिला होत होती.

''आणि मग सौभाग्यवतीची काय व्यवस्था?''

''ती माझ्या वडिलांकडे आमच्या जमीनदारी गावाकडे राहील!''

''वाऽ म्हणजे मग तिला आमच्या सहवासाला मुकविण्याचा बेत दिसतो तुमचा!'' आणि त्याच क्षणाला 'लिसी'- अँड्रीची पत्नी, व्हिकमाँ द माँतमार्त ह्यांच्या हातावर रेलून तेथे आली.

माँतमार्त हे फ्रेंच राज्यक्रांतीच्या तडाख्यातून परागंदा होऊन आलेले एक प्रस्थ होते. ''अँड्री, सरदारसाहेबांनी नेपोलियनच्या खूपच गमती जमती मला सांगितल्या! त्याचे म्हणे पॅरिसमधील एका नटीशी सूत आहे!'' लिझी तेथे येताच म्हणाली.

अँड्रीच्या मुद्रेवर तुच्छतेचा भाव स्वच्छ उमटला पण तो बोलला मात्र काहीच नाही. तिचा पोकळ डौल व बोलण्याची ती कृत्रिम लाडकी लकब त्याला मुळीच आवडली नाही. आपण पती-पत्नी नसून नुकतेच प्रेम करू लागलेले विवाहेच्छू आहोत अशा थाटात चारचौघांत ती अँड्रीशी बोलू लागली, म्हणजे त्याला एक प्रकारे तिची शिसारीच येई. विशेष खुशीत असताना ती आपल्या ओठांची जी बुद्धिपुरस्पर लाडिक हालचाल करी तेव्हा तर त्याला तिची चांगलीच चीड येई. 'हिच्या ह्या नाजूक नखऱ्यानेच मला प्रथम भुरळ पाडली, नाहीतर सबंध पीट्सबर्ग शहरात हिच्याएवढी मूर्ख पोरगी नसेल.' तो मनातल्या मनात चरफडला.

मेजवान्या, नृत्ये, जलसे, ह्यात अवीट गोडी वाटणाऱ्या व कृत्रिम भपक्याच्या जिण्याला चटावलेल्या समाजाच्या सहवासाची तिला असलेली आवड अँड्रीला आता असह्य होऊ लागली होती. तथाकथित

प्रतिष्ठांच्या घोळक्यात वावरताना त्याचा जीव आता मट्ट्यास येई. थिल्लरपणाला भाळलेली व भपक्याच्या आहारी गेलेली आपली पत्नी दिवसेंदिवस मानसिक विकृतीची बळी बनत चालली आहे ह्या जाणिवेने त्याचे मन व्यथित होई. लग्नाच्या ह्या बंधनातून एकदा मुक्त व्हावे अशी तीव्र इच्छा त्याला कित्येक वेळा होई.

ह्या विचाराने बेचैन असताच त्याचे लक्ष एका व्यक्तीने वेधून घेतले आणि त्याचा चेहेरा एकदम उजळून निघाला. दिवाणखान्याच्या मध्यावरच एक चष्माधारी तरुण उभा होता. त्याने आपले केस बारीक कापले होते व पिंगट रंगाचा नीटनेटका पोशाख केला होता. त्याच्या मुद्रेवरून त्याच्या लाघवी स्वरूपाची ओळख पटत होती.

कौंट बेझ्होव हे एक बडे प्रस्थ होते. त्यांच्या संपत्तीला, मालमत्तेला मोजमाप नव्हते! त्यांच्या वैभवाची कल्पना नाही अशी व्यक्ती रशियात अस्तित्त्वात नव्हती. त्यांचाच अनौरस पुत्र हा पेरी! पेरीचा अशा ह्या समाजात येण्याचा हा पहिलाच प्रसंग! इतके दिवस शिक्षणाच्या निमित्ताने तो परदेशीच वावरत होता. रशियात परत येऊन त्याला फक्त काही महिनेच लोटले होते.

दिवाणखान्यात जमलेली सारीच बडी माणसे हलक्या आवाजात एका गंभीर विषयाची चर्चा करण्यात रस घेत होती. इंग्लंड, ऑस्ट्रिया यांबरोबरच रशियाही नेपोलियनविरोधी युद्धात भाग घेणार असल्याची वार्ता हा चर्चेचा खास विषय होता. पण पेरीला ह्या गहन विषयाच्या चर्चेत फारसे स्वारस्य वाटत नसल्याचे स्पष्ट दिसत होते. व्हॅसिली कुर्जीन व त्यांची सौंदर्यशाली कन्या 'हेलेन' ह्यांच्याशी गप्पा मारण्यात तो रंगला होता. मग काही वेळाने ह्या तिघांचा मोर्चा अँड्रीकडे वळला.

''ओ ऽ हो ऽ! पेरीमहाशय आणि आपण आज ह्या बड्या समाजात?'' अँड्री सुहास्य मुद्रेने पुढे येऊन पण टोचून म्हणाला. व्हॅसिली कुर्जीनने जवळ येताच आपले चमकणारे टकले मस्तक नमवून ॲनाला किंचित अभिवादन केले व म्हटले, ''हा लाजाळू प्राणी आणला आहे आज मुद्दाम तुमच्याकडे! म्हटलं, पाहावं माणसाळतो का तुमच्या सहवासात. आठन् आठ दिवस राहातो आहे माझ्याकडे, पण समाजात मिसळेल तर शपथ! आज स्वारीला आणलं आहे झुलवीत झुलवीत! तुमच्यासारख्या हुशार स्त्रीच्या सहवासाने तरी माणसाळतो का पाहावं म्हटलं!''

एवढे बोलून व पेरीला तेथेच सोडून व्हॅसिलीने कन्येसह दुसरीकडे प्रयाण केले. पेरी चकित होऊन बावरलेल्या नजरेने हेलेनच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहात होता. हेलेनचा एकंदर दिमाखच असा होता की गर्दीतून जाताना तिला माणसे आपोआप वाट करून देत होती.

''सुंदर! काय थाट आहे!'' अँड्री तिच्याकडे पाहात उद्गारला.

''सुंदर!'' पेरी तोंडातल्या तोंडात पुटपुटला. नंतर तो अँड्रीकडे वळून म्हणाला, ''अँड्री, मी आज तुझ्याकडेच जेवणासाठी येणार आहे. येऊ ना?''

''छऽट्,अशक्य!'' अँड्री उत्तरला व त्याने इतक्या प्रेमाने पेरीचा हात दाबला की त्याच्या उद्गारातील फोलपणाच त्यामुळे पेरीच्या ध्यानात आला. जणू काय ''त्यात विचारतोस काय रे?'' असेच त्याला म्हणावयाचे होते.

आणि मग व्हॅसिलीला दुसऱ्याच एका म्हातारीने गाठले. तिचा चेहरा काळजीने व्यापलेला दिसत होता. एके काळी बड्या समाजात हिने आपले संबंध जोडले होते व मोठ्या कसोशीने ते आजतागायत कायम ठेविले होते. केव्हा ना केव्हा त्यांचा उपयोग होतो अशी तिची भावना होती.

''प्रिय सरदारसाहेब!'' काहीशा बुजऱ्या आवाजात ती बोलू लागली, ''माझ्या पित्याने तुमच्यासाठी काय केलं ह्याची स्मृती ह्या प्रसंगी करून देण्याची गरज नाही, पण आता मात्र माझ्या मुलासाठी तुमचा वशिला लावण्याची गरज भासू लागली आहे. माझ्या मुलाची संरक्षक दलात बदली करून घेण्यास राजेसाहेबांकडे एखादा शब्द टाकलात तर नाही का चालणार?'' व्हॅसिलीचे वशिल्याचे तत्त्वज्ञान काही निराळे होते! तो लावलाच तर आपल्या नातलगासाठी लावणे त्याला अधिक सोयिस्कर वाटे. दुसऱ्यासाठी शब्द टाकला व मग आपल्यासाठी टाकण्याचा प्रसंग आला तर अडचण पडते असे त्याचे ठाम मत होते. पण सध्या स्वारी जरा खुशीत असल्याने तो उल्हासाने म्हणाला, ''जरूर! जरूर!!''

सुमारे तासाभराने पाहुणे पांगू लागले. पेरी सर्वांच्या

शेवटी राहिला होता. दिवाणखान्यात तो वेंधळेपणाने उगाच रेंगाळत होता. शेवटी तो अँड्रीच्या घरी चालतच निघाला. अँड्री एकटाच त्याची वाट पाहात बसला होता. त्याची पत्नी लिसी केव्हाच झोपी गेली होती. भोजन आटोपून ते तेथेच एका खोलीत सिगारेटचे झुरके मारीत गप्पा छाटीत बसले.

●●●

२.

''नेपोलियनशी होणारं हे युद्ध स्वातंत्र्यासाठी असतं, तर प्रथम लष्करात भरती होणं आवश्यकच होतं. पण इंग्लंड ऑस्ट्रियाने ह्या महान व्यक्तीविरुद्ध मांडलेल्या कारस्थानासाठी आपण लढण्यात मला तरी काही स्वारस्य दिसत नाही!'' पेरीने शांतताभंग केला.

अँड्री खांदे उडवीत म्हणाला, ''स्वत:च्या मताला काही मोल देऊन, लढायचं की नाही ते ठरविण्याचा अधिकार प्रत्येकाला दिल्यास मला वाटतं जगात युद्धच होणार नाही. आपण हुकुमाने लढतो पेरी!''

''मग तू युद्धावर का जात आहेस?''

''का जात आहे? जाणं भाग आहे म्हणून! आणि दुसरं म्हणजे इथलं जीवन असह्य झालं आहे म्हणून!!'' नंतर किंचित् घोगऱ्या आवाजात तो पेरीला पुढे म्हणाला, ''पेरी, लग्न करू नकोस! जीवनात काही विशेष करून दाखविण्याची मनीषा असेपर्यंत तरी निदान ह्या फंदात पडू नकोस. जीवन मातीमोल करून घेण्याचं एकमेव साधन म्हणजे लग्न!''

एव्हाना रात्रीचा एक वाजला होता. पेरीने विचारमग्न अवस्थेतच अँड्रीचे घर सोडले. त्याला रात्र कोठेतरी भटकण्यातच घालवावयाची होती. व्हॅसिलीच्या मद्यपी, स्त्रैण व दिवट्या चिरंजीवांची त्याला आठवण झाली. अँतोल घोडदळाच्या बराकीत कोठेतरी राहातो एवढे त्याला माहीत होते. पेरीने त्याच्याकडे जाण्याच्या हेतूने आपला मोर्चा वळविला. जाताना त्याचे मन त्याला खात होते. ''मी कुठे ह्या शहरात कायम राहाणार आहे! आजची ही रात्र काढली म्हणजे खलास! ह्या शहराला आणि त्यातील चवचाल जीवनाला कायमचा रामराम!'' तो गाडीत बसल्या बसल्या आपल्या मनाची समजूत काढीत होता. त्याची घोडागाडी बराकीपाशी केव्हा येऊन पोचली त्याचेही भान त्याला नव्हते. गाडी थांबताच तो दचकल्यागत झाला व मग बाहेर उडी मारून बराकीच्या पायऱ्या चढू लागला.

पेरी माडीवरील एका खोलीपाशी गेला. खोली लख्ख दीपप्रकाशाने उजळून निघाली होती. सात आठ तरुण जवान एका खिडकीपाशी गोळा होऊन धमाल उडवीत होते, तर तीन चार मद्यपानाने बेहोष होऊन कोचावर अस्ताव्यस्त लोळत होते. त्याच गर्दीत साखळीला बांधलेला, अस्वलाचा एक बच्चाही कडमडत होता. पेरी आत येताच अँतोलने त्याचे स्वागत केले व म्हटले, ''ह्या तिसऱ्या मजल्याच्या उघड्या खिडकीवर उभं राहून, खिडकीच्या बाजूंना स्पर्शही न करता मद्याची आख्खी बाटली टाळ्यात रिती करण्याची पैज दोलोव्हने मारली आहे!''

दोलोव्ह कुरळ्या केसांचा व निळ्या डोळ्यांचा उमदा जवान असून, मद्याची बाटली घेण्याच्या तयारीने तो खिडकीत चढून बसला होता. बाटली हाती येताच तो खिडकीत चढून उभा राहिला व कसाबसा तोल सावरीत डोके मागे झुकवून त्याने मद्याची बाटली तोंडाला लावली. हा जीवघेणा खेळ पाहून पेरीने डोळेच मिटले.

''हा शुद्ध वेडेपणा आहे! जीवघेणा खेळ आहे हा!'' कोणीतरी ओरडले. पेरीने डोळे उघडले, तेव्हा दोलोव्हने बाटली रिती करण्याच्या नादाने मस्तक इतके झुकवले होते की जरा तोल जाताच, तीन मजल्यांवरून खालच्या फरसबंदीवर कोसळून त्याच्या चिंधड्या उडण्याची धास्ती होती. फिरून भयभीत होऊन त्याने डोळे मिटले, पण एवढ्यात हर्षाची एकच आरोळी उठली. पैज जिंकून दोलोव्हने दाणकन् खोलीत उडी मारली; त्याची पाठ थोपटण्यासाठी, त्याला उचलण्यासाठी जवानांनी एकच गर्दी केली.

''अरे यार, हम् भी करेंगे!'' दोलोव्हच्या विजयाने फुरारलेला पेरी दाणकन् टेबलावर मूठ आपटून ओरडला, ''आणा एक बाटली!'' त्याचे हे अवसान पाहून अँतोल चकित झाला. ''बुड्ढेबाबा, फुकट मराल! तुमचा पराक्रम उद्या पाहू. चला, मद्य खलास झालं. आता कुठून तरी व्होडका पैदा करूया!'' असे म्हणून गोंधळ, गोंगाट करीत हे सारे टोळके बाहेर पडले.

बेल्जियम, जर्मनी, ऑस्ट्रिया, इत्यादी देश पादाक्रान्त करीत नेपोलियनचा सेनासागर पुढे पुढे चालला होता. आज रशियावर जरी त्याने प्रत्यक्ष चाल केली नसली, तरी ह्या संभाव्य धोक्याचे निमित्त करून आपल्या जनतेला स्फुरण आणण्यासाठी व तिला आपल्या लष्करी सामर्थ्याचे प्रदर्शन दाखविण्यासाठी मॉस्कोच्या प्रमुख रस्त्यांवरून आज लष्करी संचलन चालू करण्यात आले होते. संचलनाचा कार्यक्रम पाहाण्यासाठी लोटलेले रशियन नागरिक हर्षाने आरोळ्या ठोकून सैनिकांचे स्वागत करीत होते. अँड्री बोलोन्स्की आपल्या बगीत उभा राहून हे संचलन पाहात होता. शेजारी त्याची तरुण पत्नी लिसी बसली होती व पेरी बाहेर जवळच गाडीपाशी उभा होता. रोस्टोव्ह कुटुंबाला भेट देण्यासाठी तो चालला असता वाटेतच त्याला हे जोडपे भेटले. संचलन पाहात असता पेरी गंभीर दिसत होता.

''ह्याच क्षणी फ्रान्सची राजधानी पॅरिस इथेही कदाचित असंच संचलन चालू असेल. समता, बंधुता व स्वातंत्र्य ह्यांसाठी आपण लढत आहोत अशी भावना तरी फ्रेंच युवकांना आहे, पण ही फटावळ स्वतंत्र नाही, ह्यांना समता ठाऊक नाही आणि बंधुता कशाला म्हणतात हेही हिच्या गावी नाही! आणि असं असूनही ही भरती, युद्धाच्या दिशेने का चालली आहे कुणास ठाऊक?'' तो म्हणाला.

पेरी रोस्टोव्ह कुटुंबात आला.

अनेक शतके, अनेक युद्धांत भाग घेत आलेले रोस्टोव्ह योद्धे आपल्या रीतीरिवाजाप्रमाणे आपल्या प्रेयसींचा प्रेमपूर्वक निरोप घेण्यासाठी आघाडीवर जाण्यापूर्वी येत असत. आज निकोलस रोस्टोव्ह तेच करण्यासाठी घरी आला होता. त्याने आपली बालपणापासूनची मैत्रीण 'सोनिया' हिच्या घरी येताच प्रेमभराने तिचे चुंबन घेतले. पण त्याच्या आईला- कौंटेस रोस्टोव्हला- ही गोष्ट आवडल्याचे दिसले नाही. सोनिया तिच्या आश्रयाखाली वाढलेली निर्धन मुलगी होती. सरदार घराण्यातील आपल्या पुत्राची ती प्रेयसी बनावी हे तिला मान्य नव्हते.

नताशा ही रोस्टोव्ह पतीपत्नीची लाडकी मुलगी. काळ्याभोर डोळ्यांची, तरतरीत व तारुण्याने मुसमुसणारी ही छोकरी खिडकीत उभी राहून मोठ्या मजेने संचलन पाहात होती. ''काय मजा आहे! मी पुरुष असते तर एका तजेलदार काळ्या कुळकुळीत घोड्यावर स्वार होऊन नि कमरेला तलवार लटकावून नक्कीच ह्या संचलनात सामील झाले असते!'' ती मोठ्या उत्साहाने बडबडली. पण नंतर अल्पावधीतच तिचा उत्साह मावळला. साश्रुनयनांनी ती खिडकीपासून दूर झाली व नुकत्याच तेथे येऊन दाखल झालेल्या पेरीपाशी जाऊन उभी राहिली.

''काय झालं नताशा?'' पेरीने तिचे अश्रू पाहून विचारले.

''हे सारे उमदे जवान मृत्यूला कवटाळण्यासाठी धाव घेत आहेत!'' ती गहिवरलेल्या स्वरात म्हणाली.

आता सर्व कुटुंब संचलन पाहाण्याचे सोडून निकोलसभोवती गोळा झाले. लेफ्टनंटचा कोरा करकरीत गणवेष त्याने आपल्या अंगावर चढविला होता. त्यात त्याचे व्यक्तिमत्त्व मोठे उठून दिसत होते. त्याची धाकटी बहीण नताशा आता त्याच्या ह्या रुबाबाकडे फिरून फिरून निरखून पाहात होती व त्याचे कौतुक करीत होती. ''ह्या कपड्यांत तुझा रुबाब काही और दिसतो दादा! आता तू ऑस्ट्रियात जाणार ना? फार फार दूर आहे म्हणे तो देश! मी नकाशात पाह्यला आहे. हा नेपोलियन म्हणे शुद्ध रानटी माणूस आहे!'' असे म्हणून ती किंचित् दूर झाली व फिरून कौतुकाने भावाकडे टक लावून पाहू लागली. ''दादा, तू मोठा झकास दिसतोस हं!'' असे म्हणून त्या पोरीने आपल्या गळ्यातील साखळी काढून भावाच्या गळ्यात घातली. ''तुम्हा पुरुषांची चैन आहे बुवा! मनात येईल ते होता येतं तुम्हाला! शिपाई, न्यायाधीश, वकील, काय वाटेल ते व्हावं; मनात येण्याचा अवकाश!'' ती बडबडली.

''मग तू पुरुष असतीस तर काय केलं असतंस गं पोरी?'' पेरीने विनोदाने विचारले.

''तसं असतं तर, मी झारची प्रमुख मंत्री बनले असते!

मला विचारल्याशिवाय काही करायची त्याची छातीच झाली नसती मुळी! आणि मग कितीतरी कायदे भराभर लागू केले असते मी!'' तिच्या ह्या बडबडीने आकर्षित झालेला तिचा म्हातारा बाप सुहास्य मुद्रेने तेथे आला व म्हणाला, ''कसले कायदे ग पोरी?''

आणि मग खूपच विचारात पडल्याचा अभिनय करीत नताशा म्हणाली, ''आमच्या बाबांना पत्त्यांच्या डावात कुणीही हरवू नये हाच पहिला कायदा करीन मी!'' तिच्या ह्या उत्तराने सर्वचजण खदखदून हसले. नताशा सडकेतून डौलाने रांगारांगांनी जाणाऱ्या योद्ध्यांकडे खिडकीतून पाहू लागली. काही काल उल्हसित झालेली तिची मुद्रा फिरून दु:खग्रस्त झाली. तिच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा सरसर ओघळू लागल्या. पेरी तिच्यापाशी येऊन समजुतीच्या स्वरात म्हणाला, ''नताशा, हे ग काय? वेडी पोरगी!''

ती गुदमरलेल्या स्वरात म्हणाली, ''ही सारी माणसं मरण्यासाठी जात आहेत! दादा! दादा!! तूही जाणार ना?''

●●●

३.

एके दिवशी अँड्री अचानक पेरीकडे आला आणि त्याला म्हणाला, ''पेरी, तुझा पिता शेवटची घटका मोजीत आहे. तुला तत्काल त्याच्याकडे तुझ्या गावी गेलं पाहिजे!'' पेरीला ही वार्ता ऐकून मुळीच आश्चर्य वाटले नाही. आपला म्हातारा बाप गेले कित्येक दिवस आजारी आहे व त्याचा अंतकाल दिवसेंदिवस समीप येत आहे, ह्याची जाणीव त्याला होती. पण त्याला पित्याकडून बोलावणे असे कधीच आले नसल्याने, तिकडे जाण्यास त्याचे मनच घेत नव्हते. आपण अनौरस पुत्र असल्याने आपली अवहेलना होते ही जाणीव त्याला बोचत होती. पित्याच्या सरदार घराण्याशी संबंधित असलेल्या व्यक्तींनी त्याच्याबद्दल दाखविलेली उपेक्षा त्याला असह्य वेदना देत असे. बेझुकोव्ह कुटुंबातील व त्यांच्या नात्यातील माणसे ह्या घराण्याची अवाढव्य मालमत्ता, संपत्ती आपणास वारसा हक्काने मिळू देणे शक्य नाही ह्याची संपूर्ण जाणीव असल्याने तो एक प्रकारे ह्या सर्व प्रकरणात उदासीनच होता. आपणास आपुलकीने वागविण्यात येत नाही, ह्या जाणिवेनेच तो पित्यापासून दूर दूर राहात आला होता, पण आता अँड्रीच्या ह्या तातडीच्या निरोपामुळे त्याला जाणे भाग होते.

अँड्री आणि पेरी ज्या वेळी काउंट बेझुकोव्ह ह्यांच्या प्रासादात येऊन पोचले, तेव्हा त्यांना प्रासादाचा कानाकोपरा नातलगांनी भरून गेलेला दिसला. दु:खाने भारावून गेल्याच्या आविर्भावाने प्रत्येकजण सर्व हालचाली मुकाट्याने करीत होता. पेरी भित्रेपणाने, बुजऱ्या नजरेने, दिसेल त्याला अभिवादन करीत होता. पण त्याची दखल घेण्यास कोणीच तयार नव्हते. ते थंडपणाने त्याच्याकडे खाकरून पाहात व चालू लागत. ह्या सर्व प्रकाराने पेरी अधिकच गोंधळून गेला, खजिल झाला. डॉक्टर मंडळींनी सरदारसाहेबांच्या जीविताची आशा नष्ट झाल्याचा अभिप्राय केव्हाच जाहीर करून टाकला होता. धर्मगुरूंचे टोळके मृत्युशय्येवर पडलेल्या कौंटच्या बिछान्याभोवती गराडा घालून, मरणोत्तर त्याच्या आत्म्याला शांतता लाभावी म्हणून मंत्रतंत्रादि संस्कार करण्यात गढले होते. त्या प्रचंड प्रासादात औदासीन्यपूर्ण प्रगाढ शांतता पसरली होती. प्रत्येकजण कोणताही आवाज होऊ न देण्याची दक्षता घेऊन गंभीरपणाने हालचाल करीत होता.

पेरीच्या खांद्यावर कोणीतरी हळूच हात ठेविला. ती म्हातारी ॲना डुबेट्स्की होती. ''चल इकडे ये!'' ती हळूच म्हणाली व तिने पेरीला त्याच्या मरणोन्मुख पित्याच्या बिछान्यापाशी आणले. रुग्णशय्येवर पडलेल्या काउंटचा भव्य चेहरा आता सुरकतून आक्रसून गेला होता. विशाल कपाळाच्या खालच्या बाजूस असलेली केसाळ भुवयांची धनुष्ये त्यातील ताण गेल्यामुळे शिथिल होऊन पडली होती. भोगलालसेने डवरलेली एका काळची त्याची भरदार मुद्रा वासलेल्या जिवणीमुळे आता भयानक दिसत होती.

म्हातारा विव्हळला. त्याला एका कुशीवर व्हावयाचे होते. त्याला उजव्या कुशीवर वळवून घेण्यासाठी एक नोकर पुढे धावला, पण ही गोष्ट सोपी नव्हती. म्हाताऱ्याचे मास झडले असले तरी हाडांचा पिंजरा काही कमी भक्कम व अवजड नव्हता. छातीची कमान, बावळे अद्यापि त्याच्या मूळच्या भरदारपणाची साक्ष देत होते. पेरीची दु:खश्रांत मुद्रा, त्याच्या पित्याच्या - काउंटच्या - नजरेस पडली मात्र, त्याच्या सुरकुतलेल्या चेहऱ्यावर स्मिताची एक लकेर उठली. ते स्मित पेरीच्या अंत:करणाला खोल जाऊन भिडले. त्याच्या गालांवरून अश्रू ओघळू लागले.

म्हातारा काउंट फिरून एकदा विव्हळला व पेरी चट्‌कन पुढे होऊन त्याच्याजवळ जाऊन बसला. पुढे काय करावे हेच त्याला समजेना. एवढ्यात ॲना डुबेट्स्की पुढे आली. तिने पेरीचा हात धरून त्याला तेथून उठविले व त्याला बाहेर नेता नेता ती हळूच म्हणाली, ''आता ग्रंथ आटोपत आला आहे. तिथे बसून तू आता काय करणार?''

तो दिवाणखान्यात आला, तेव्हा नातेवाईकांनी तो प्रशस्त दिवाणखाना गजबजून गेल्याचे त्याला दिसले. इतक्यात एका नोकराने दोन मोहोरबंद लखोटे त्याच्या हाती आणून दिले. पेरीने निर्विकारपणाने ते शेजारी उभ्या असलेल्या अँड्रीच्या हाती दिले. ''काउंटचा अवतार संपलेला दिसतो!'' व्हॅसिली पेरीला हळूच म्हणाला. तो काउंटचा दूरचा नातलग लागत होता.

''हे पत्र झारला उद्देशून लिहिलेलं दिसतं!'' अँड्री लखोट्यावरील पत्ता वाचीत म्हणाला, ''हे दुसरं पत्र मात्र तुझ्यासाठी दिसतं!''

''माझं पत्र फोडून वाचून पाहा!'' पेरी पुटपुटला. अँड्रीने तत्काल तो लखोटा फोडला व भर्‌कन वाचून काढला. ''ह्या पत्रावरून असं दिसतं की कौंटने झारला, तुला आपला कायदेशीर वारस म्हणून मान्यता देण्याची ह्या दुसऱ्या पत्राने विनंती केली आहे. पेरी, बापाच्या सर्व मालमत्तेचा वारसा, तुला वारसाहक्काने ह्या मृत्यूपत्राने दिला आहे. पुढील कौंट बुझोकोव्ह म्हणून तुझ्या बापाने तुझी नियुक्ती केली आहे!'' अँड्री मोठ्या उत्साहाने म्हणाला, पण तेथे जमलेल्या सर्वच नातलगांनी, निराशेने प्रदीर्घ सुस्कारा सोडल्याचं त्याला स्पष्ट ऐकू आले. व्हॅसिली व त्याची कन्या हेलेन ह्यांनी सहेतुकपणाने एकमेकांकडे दृष्टीक्षेप केला. म्हातारा कन्येला घेऊन पेरीपाशी आला आणि म्हणाला, ''बापाचं नाव काढ बेटा! हेलेन, बाळ, ह्या तुझ्या नव्या नातलगाचं चुंबन घे, त्याचं अभीष्टचिंतन कर, अभिनंदन कर!'' पित्याच्या मृत्यूने थिजलेला पेरी ह्या वाक्याने एकदम बावचळल्यागत झाला व निर्विकार मुद्रेने हेलेनकडे पाहू लागला. एवढ्यात हेलेन पुढे झाली व आपले हात पेरीच्या भोवती टाकून, त्याच्या गालाचे प्रगाढ चुंबन तिने घेतले. पेरीला वारसा प्राप्त होताच, पितापुत्रीला त्याच्याबद्दल निर्माण झालेले अगत्य पाहून अँड्रीला मनुष्यस्वभावाची मोठी मौज वाटली.

त्या घटनेनंतर लौकरच अँड्रीने लष्करी नोकरीवर रुजू होण्याची तयारी चालू केली. पत्नीच्या एकंदर वर्तनाबद्दल, कार्यक्रमाबद्दल त्याच्या मनात घृणा निर्माण होऊ लागल्याने, तो त्रासल्यागत झाला होता. तिच्या सहवासापासून दूर होण्याची एक प्रकारे ओढच त्याला लागून राहिली होती. तिला आपल्या जमीनदारी गावाकडे, आपल्या पित्याकडे रवाना करण्याचा त्याचा मानस होता, पण तिचा ह्या गोष्टीला सक्त विरोध होता. तेथे तिला धाकटी नणंद व म्हातारा सासरा प्रिन्स बोलोन्स्की ह्यांच्या सहवासात राहावे लागणार होते. तिसरी संगत नाही, सोबत नाही. म्हातारा निवृत्त लष्करी अधिकारी असल्याने मोठा करडा व तऱ्हेवाईक होता. तिने खूप आढेवेढे घेतले, रुसवा फुगवा करून पाहिला, पण अँड्रीने दाद दिली नाही. शेवटी रुकार देणे भागच पडले तिला! पत्नीला घरी ठेवून व पित्याचा आणि बहिणीचा निरोप घेऊन लष्करी नोकरीवर रुजू होण्याचा कार्यक्रम त्याने पक्का केला.

प्रिन्स बोलोन्स्कीने -अँड्रीच्या बापाने -आपल्या जमीनदारी गावी एक भला मोठा प्रासाद उभारला होता. अँड्री येणार असल्याची आगाऊ वार्ता असली तरी त्याचा बाप आपल्या दैनंदिन कार्यक्रमांत वा घरच्या एकंदर शांत वातावरणात निराळी अशी कोणतीच ढवळाढवळ करण्यास सिद्ध नव्हता. म्हाताऱ्याने कन्येच्या शिक्षणक्रमाचीही सर्व जबाबदारी स्वत:कडे घेतली होती. हा सेवानिवृत्त मेजर जनरल आता स्वत:च्या कन्येचा शिक्षक बनला होता.

मुलीला बीजगणित-भूमिती तो शिकवी; तिच्या प्रत्येक हालचालीवर नजर ठेवी; बागबगीचात मन घाली; स्वत:च्या आठवणी लिही; आणि हस्तव्यवसाय करून काही चिजाही बनवी! सारे छंद घड्याळ्याच्या काट्याप्रमाणे कसे काटेकोर नियमितपणाने चालत. रोजचे जेवणसुद्धा ठराविक क्षणाला आले पाहिजे, संपलेही पाहिजे असा त्याचा कटाक्ष असे. शिस्त! जीवनाचा आत्मा शिस्त व अचूकपणा आहे अशी त्याची ठाम श्रद्धा होती.

राजवर्तुळात आता त्याला फारसे स्वारस्य नव्हते, महत्त्व नव्हते. पण हीसुद्धा गोष्ट खरीच की त्यातील बडी बडी धेंडे त्याच्या भेटीस येत व त्याची भेटी देण्याची ठराविक वेळ होईपर्यंत तिष्ठतही बसत. नेमलेल्या वेळीच तो दिवाणखान्यात येई व आल्यागेल्यांच्या गाठीभेटी घेई. बोलोन्स्की आता म्हातारा झाला होता. त्याचे सर्व केस पांढरे शुभ्र झाले होते. पण डोळ्यांतील तेज व मुद्रेवरील तलुखपणा अद्यापि कायम होता. त्याच्या मुद्रेकडे पाहाताच एक प्रकारचा धाक, जरब वाटे.

आज अँड्रीचे व त्याच्या पत्नीचे आगमन अपेक्षित होते. म्हातारा हुजऱ्या तिखोन बसल्या जागी डुलक्या घेत होता. मध्येच शेजारच्या खोलीतून येणारे मालकाचे घोरणे ऐकून दचकत होता. दुरून येणाऱ्या घोडागाडीचा आवाज ऐकून तो जरा तरारला. त्याची डुलकी उडाली. एवढ्यात गाडी येऊन प्रासादाच्या पायऱ्यांपाशी उभी राहिली. तिखोन गडबडीने धावला व गाडीतून उतरणाऱ्या अँड्रीला व त्याच्या पत्नीला सामोरा गेला. ''मालकांची डुलकी अद्यापि संपली नाही!'' तो हळूच म्हणाला. अँड्रीला हे वातावरण काही अपरिचित नव्हते. त्याने आपल्या घड्याळ्याकडे पाहिले व पत्नीला उद्देशून तो म्हणाला, ''आणखी वीस मिनिटांनी बाबा उठतील व मग आपली भेट होईल.''

अँड्रीने त्या शांत प्रासादात प्रवेश केला आणि बरोबर वीसच मिनिटांनी तिखोन त्याला बोलवावयास आला.

●●●

४.

अँड्रीने बापाच्या खोलीत प्रवेश करताच म्हातारा त्याला म्हणाला, ''यावं, यावं रणवीर! आपण काय आता नेपोलियनशी सामना देण्यास जाणार आहात म्हणे? पण जरा जपूनच त्याच्या वाटेला जा हं! पण काय रे पोरा, तुझं सारं ठीक आहे ना?''

''मी पत्नीसह भेटायला आलो आहे बाबा! ती सध्या दिवसांत आहे.'' अँड्री लाजेने लालीलाल होऊन भीत भीत म्हणाला. ''आपली प्रकृती कशी काय आहे बाबा?''

''मूर्खांच्या प्रकृती बिघडतात बेटा! मी तर सकाळपासून संध्याकाळपर्यंत कामात असतो, निर्विकार असतो. माझी प्रकृती बिघडायचं कारणच काय मुळी?''

''ठीक! ठीक! परमेश्वरी कृपा!'' अँड्री सुहास्य मुद्रेने उद्गारला.

''परमेश्वरी कृपेचा ह्यात काय संबंध?'' त्याचा बाप तिरसटला.

दुसऱ्या दिवशी सायंकाळी तो घर सोडण्याच्या तयारीत असताच बापाकडून त्याला बोलावणे आले. अँड्रीने बापाच्या खोलीत प्रवेश केला तेव्हा म्हातारा टेबलापाशी काही लिहीत बसला होता. त्याने वर मान करून मुलाकडे एक दृष्टीक्षेप टाकला.

''चाललास?''

''मी निरोप घेण्यासाठीच आलो आहे.''

''माझं इथे चुंबन घे!'' म्हाताऱ्याने गालावर बोट ठेवून त्याला जागा दाखविली.

''आभारी आहे! आभारी आहे!!'' अँड्रीने चुंबन घेताच तो म्हणाला.

''माझे आभार कशाबद्दल बाबा?''

''इथे ठरलेल्या वेळेपेक्षा जास्त वेळ रेंगाळायला तयार नाहीस, बायकोच्या आड दडून बसायला तयार नाहीस, म्हणून! प्रथम कर्तव्य! छान! छान! आभारी आहे बेटा!''

एवढे बोलून त्याने आपले लिखाण पुढे चालू केले. त्याची लेखणी चुरचुर वाजत होती व तिच्यातून शाईचे बारीक शिंतोडे इतस्तत: उडत होते.

''तुला काही सांगायचं आहे? सांग! एकाच वेळी दोन कामं करू शकतो मी!''

''हिचे दिवस भरत आले आहेत! प्रसूतीच्या वेळी मॉस्कोहून एखादा तज्ज्ञ डॉक्टर आणला तर बरं होईल.''

''ठीक! ठीक!!'' लेखणी बंद न करता म्हातारा म्हणाला, ''तुझ्या म्हणण्याप्रमाणे होईल सर्व व्यवस्था!'' आणि मग एकदम अँड्रीकडे वळून तो म्हणाला, ''ही एक भली मोठी कटकटच आहे बेटा!''

''कसली कटकट बाबा!''

''बायकांची!''

''म्हणजे?''

''पण तिला काही इलाज नाही बेटा! हे असंच चालायचं, बायका इथून तिथून सर्व सारख्याच! पण हे पाहा, आता त्याची चिंता नको करू. मी बघतो काय करायचं ते!'' जागेवरून उठून म्हाताऱ्याने अँड्रीचा हात आपल्या हाती घेतला. आपली तीक्ष्ण नजर त्याच्या मुद्रेवर खिळवून मंद स्मित केले. अँड्रीने दीर्घ सुस्कारा सोडला. अबोल व करड्या बापाच्या भावना त्याला उमगल्या. पाषाणात, आत खोलवर ओलावा आहे ह्याची जाणीव त्याला झाली.

''बेटा, तुझ्या बायकोची सर्व काळजी मी घेईन बरं! मोठी नाजूक पोरगी आहे ती!'' आणि मग अँड्रीचा हात सोडून देऊन म्हातारा लिहिलेले पत्र लखोट्यात बंद करण्याच्या नादास लागला.

''हे पाहा अँड्री, हे पत्र सेनापती कुझोव्हला दे! त्याला म्हणावं, तुझी खूप आठवण येते बाबांना! आणि हे पाहा, तुला तो कशी काय वागणूक देतो ते कळवीत जा मला! प्रिन्स बोलोन्स्कीच्या मुलाला कुणाचे बूट चाटायची मुळीच गरज नाही! पोरा, युद्धात मेलास तर मला वाईट वाटेल, पण निकोलाय बोलोन्स्कीच्या पोराने त्याला न शोभणारे कृत्य केलं, असं जर माझ्या कानी आलं तर मात्र असह्य वेदना होतील रे मला!''

''बाबा, आपल्यावर तशी पाळी खास येणार नाही!'' म्हातारा त्यावर काहीच बोलला नाही. जरा वेळाने अँड्री एकदम म्हणाला, ''आणखी एक गोष्ट बोलायची राहूनच गेली बाबा! मला यदाकदाचित् मुलगा झाला व मी तिकडे युद्धात मारला गेलो, तर त्याचा सांभाळ तुम्ही करालच, पण तो तुमच्याच देखरेखीखाली वाढला पाहिजे असा माझा आग्रह आहे बाबा!''

''तुझ्या पत्नीला त्याची काळजी नाही का?'' म्हातारा लटके स्मित करीत म्हणाला व मुलासमोर येऊन उभा राहिला.

''बेटा, तू नीघ आता इथून, निरोप घेऊन झाला आहे! तुझी वटवट ऐकायला मला सवड नाही!'' म्हातारा पिसाळल्यागत होऊन एकदम कडाडला. त्याने खोलीचे दार उघडले व अँड्री बाहेर जाताच ते फिरून धाडकन् लावून घेतले. बाहेरच उभ्या असलेल्या लिसीला व मेरीला ह्या प्रकाराने चांगलाच धक्का बसला. त्यांना वाटले, काही तरी विशेष भानगड झाली. त्याला त्या दोघींनी गाठताच तो काहीशा तुसडेपणानेच पत्नीला म्हणाला, ''हं, आता तुझ्या निरोपाचं नवं नाटक चालू होऊद्या!''

''अँड्री, तू आताच चाललास?'' त्याची पत्नी लिसी क्षीणपणाने म्हणाली. ती गोरीमोरी झाली होती. भेदरल्यागत दिसत होती. त्याने तिला जवळ घेताच ती जवळ जवळ बेशुद्ध झाली. तिला हलक्या हातांनी अँड्रीने तेथील एका कोचावर ठेविले व तो तडक बाहेर जाण्यास निघाला. आपल्या बेशुद्ध भावजयीजवळ बसलेली मेरी बाहेर पडणाऱ्या भावाकडे साश्रुनयनांनी पाहात होती. म्हाताऱ्याच्या खोलीतून, पिस्तुलातून गोळ्या सुटाव्यात त्याप्रमाणे सटासट् आवाज येत होता. नक्कीच तो नाक शिंकरीत होता. थोड्या वेळाने खोलीचे दार उघडून तो बाहेर आला. ''अँड्री गेला काय? छान! छान!!'' तो उद्गारला. बेशुद्ध पडलेल्या आपल्या सुनेकडे तुच्छतेने एक दृष्टिक्षेप टाकून त्याने फिरून धाडकन् दार लावून घेतले.

अल्पावधीतच अँड्री, सेनापती कुझोव्हचा विश्वासू सहकारी बनला. अनेक महिने स्वस्थ बसून काढल्यानंतर आता रशियन सेना युद्धाच्या दृष्टीने सज्ज होऊ लागली होती. ऑस्ट्रियाच्या सरहद्दीवर तिचा तळ पडला होता. कुझोव्हचे निवासस्थान बनलेल्या आघाडीवरील एका

झोपडीत मध्यरात्र उलटून गेली तरी युद्धसमितीची बैठक चालू होती. टेबलावर पसरलेल्या नकाशावर इतस्तत: खाणाखुणा करीत ऑस्ट्रियन अधिकारी युद्धक्षेत्राची व लष्करी हालचालींची माहिती देत होता. ह्या लढाईचे नेतृत्त्व ऑस्ट्रियन लष्करी अधिकाऱ्यांकडे होते. ''उद्या सकाळी नेपोलियनच्या पिछाडीवर हल्ला चढवून त्याला, एका बाजूस जंगल असलेल्या ह्या मधल्या मैदानी प्रदेशात रेटूया!'' त्याने युक्तिवाद केला.

''भूगोलाचा पाठ म्हणून ही बडबड ठीक होईल!'' दुसरा एक लष्करी अधिकारी भली मोठी जांभई देऊन हळूच पुटपुटला. आतापर्यंत सेनापती कुझोव्ह खुशाल डुलक्या घेत बसला होता. तारवटलेल्या डोळ्यांनी तो आळसटपणाने म्हणाला, ''दोस्तहो, उद्याचा ठरलेला मूळचा बेत आता बदलणं शक्य नाही! आपलं काम चोख करणं एवढंच आता आपल्या हाती आहे आणि तेच आपण करूया. युद्धाच्या आदल्या रात्री झक्क झोप काढणं फार महत्त्वाचं असतं. जा बाबांनो, जा! एक झकास झोप काढा, नाही तर उद्या कायमचेच झोपाल! चलो नमस्ते! नमस्ते!!'' आणि मग हा काथ्याकूट संपला व छावणीत सर्वत्र शांत झाले.

दुसऱ्या दिवशी सकाळीच युद्धाला तोंड लागले. एका टेकडीवर सेनापती कुझोव्ह अँड्री व इतर लष्करी सहकारी ह्यांच्यासह उभा होता. फ्रेंच लष्कराची हालचाल बारकाईने पाहाण्याचे त्याचे काम चालू होते. दूरच्या दरीतून होणारी रशियन सेनेची हालचालही त्याला तेथून स्पष्ट दिसत होती. फ्रेंच सैनिक चढाई करीत करीत खुल्या मैदानात आलेले दिसताच तो आपल्या अधिकाऱ्याकडे वळून म्हणाला, ''कॅप्टन, हुसार सैनिकांना हल्ला चढवायचा हुकूम द्या आता!'' अधिकाऱ्याने तत्काळ आपल्या घोड्यावर मांड टाकली व तो दबा धरून बसलेल्या हुसार सैनिकांच्या टोळीच्या दिशेने दौडला. द्रुत गतीने दौड करणाऱ्या ह्या अधिकाऱ्याची तत्परता पाहून कुझोव्ह खूश झाला. अँड्री कौतुकाने त्या दिशेने पाहू लागला.

फ्रेंच पायदळ छोट्या छोट्या तुकड्यांनी, अधून मधून सामना देत धीमेपणाने पुढे सरकत होते. मुरलेल्या लढवय्यांच्या चिकाटीने त्यांची संथ, पण खंबीर प्रगती चालू होती.

निकोलस रोस्टोव्ह व त्याचा सहकारी डेनिसोव्ह आपल्या हुसार सैनिकांना चढाई हुकूम केव्हा मिळतो ह्याची औत्सुक्याने वाट पाहात उभे होते. मधून मधून तोफा-बंदुकांच्या फैरी झडत होत्या. ''अद्यापि चढाईचा हुकूम मिळत नाही! ह्या लढाईचा बोऱ्या करायचा विचार दिसतो आमच्या अधिकाऱ्यांचा!'' हुटहुटीला आलेला डेनिसोव्ह निकोलसला म्हणाला. पण एवढ्यात कुझोव्हचा चढाईचा हुकूम घेऊन येणारा लष्करी अधिकारी तेथे येऊन थडकला.

''तरवारी काढा! नंग्या समशेरींचा हल्ला चढवा! चला, घुसा पुढे!'' हुकूम येताच डेनिसोव्हने ओरओरडून हुसार सैनिकांना इशारा दिला.

आणि मग लगेच हुसार सैनिकांनी मैदानात आलेल्या फ्रेंच तुकड्यांवर नंग्या समशेरींनी, हातघाईचा हल्ला चढविला. एकच घोडदौड चालू झाली. निकोलस आपली नंगी समशेर उंच धरून आपल्या सहकाऱ्यांबरोबर दौडत होता. त्यांची मुद्रा निश्चयी दिसत होती. सर्वांपेक्षा त्याची समशेर अधिक उंच होती. घनचक्कर संग्रामाला तोंड लागले. हातघाईला रंग चढला. निकोलसने सरळसरळ आपला घोडा एका फ्रेंच घोडेस्वाराच्या अंगावर घालून त्याला आपल्या समशेरीचा एक जबरदस्त फटकारा दिला. तत्काळ तो फ्रेंच सैनिक घायाळ होऊन घोड्यावरून एका डबक्यात कोसळला, पण पडल्या पडल्या त्याने आपल्या कमरपट्ट्यातील पिस्तुल काढून ते निकोलसवर झाडले. निकोलसला गोळी लागली नाही, पण ह्या अनपेक्षित दणक्याने तो एकदम बिचकला, चाळवल्यागत झाला. त्याचा तोल जवळ जवळ सुटलाच होता, पण त्याने तो कसाबसा सावरला.

●●●

५

रणधुमाळीला जसजसा रंग चढू लागला तसतसा फ्रेंचांचा कडवा प्रतिकार जाणवू लागला. त्यांच्या क्रौर्याला व शौर्यालाही धार येऊ लागली. पण रशियन सैनिकांचे धैर्य मात्र क्रमश: सुटू लागले. त्यांच्यांत घबराट निर्माण झालेली दिसू लागली व अखेर पांगापांग सुरू झाली. फ्रेंच तोफखान्याने अविरत भडिमार चालू ठेवला होता, पण रशियन तोफखाना थंडावल्याप्रमाणे दिसत होता. फ्रेंच तोफखान्याने टाकलेल्या एका गोळ्याच्या ठिकऱ्या लागून खुद्द कुझोव्हच्या गालावर एक भली मोठी जखम झाली.

''आपण जखमी झाला आहात!'' शेजारी उभा असलेला अँड्री कळवळून ओरडला.

''जखम इथे झालेली नाही, तिथे झाली आहे!'' पळणाऱ्या सैनिकांकडे बोट दाखवून कुझोव्ह म्हणाला. आपल्या घोड्याला टाच देऊन त्याने तो पुढे काढला. अँड्रीनेही त्याच्याबरोबर दौड केली. ''त्या भित्र्या भागूबाईंना थोपवून धरा! बोलोन्स्की, काहीही कर, पण ही उधळणारी भ्याडं आवरून धर!!'' अँड्रीने घोड्यावरून उडी टाकली व रशियन झेंड्याभोवती मेंढराप्रमाणे वेंधळ्या मुद्रा करून उभ्या असलेल्या सैनिकांच्या घोळक्याकडे धाव घेतली. त्याने तेथे जाऊन झेंडा आपल्या हाती घेतला व शत्रूच्या दिशेने चाल करता करता तो ओरडला, ''चला! पुढे चला!! या माझ्या पाठोपाठ!''

प्रथम काही सैनिकच फक्त अँड्रीच्या पाठोपाठ निघाले. त्यांचे उदाहरण पाहून आणखी काही लोक पुढे आले व मग स्फूर्तीची एकच लाट उठली. ह्या लोकांच्या शौर्याने, धैर्याने भारावलेले अनेक सैनिक पुढे आले व अँड्रीच्या नेतृत्त्वाखाली त्या संग्रामात सामील झाले. फ्रेंचांच्या भडिमाराने थंड पडलेल्या रशियन तोफखान्याच्या दिशेने अँड्रीने चढाई चालू केली. हा तोफखाना फिरून चालू करण्याचा त्याचा मानस होता. फ्रेंचांनी हा बेत ओळखून अँड्रीच्या तुकडीवर एकजात भडिमार चालू केला. आजूबाजूस रशियन शिपाई पटापट कोसळून पडताना त्याला दिसू लागले. पण झेंडा सरसावून अँड्री नेटाने पुढे पुढे चालला होता. फ्रेंच पायदळाने व घोडदळाने अँड्रीची तोफखान्याच्या दिशेने होणारी प्रगती बंद पाडण्यासाठी त्याच्या तुकडीवर तुफानी हल्ला चढविला.

अँड्री रशियन तोफखान्याच्या जवळ जवळ येऊन पोचला, पण एवढ्यात सणाऽण् करीत आलेल्या एका गोळीने त्याला हैराण करून जमीनदोस्त केले. कोसळलेल्या स्थितीतही त्याने झेंडा हृदयाशी घट्ट धरून ठेविला होता. बराच वेळ बेशुद्धावस्थेत तो तेथे पडून होता.

काही वेळाने त्याला शुद्धी आली व तो तारवटलेल्या भकास नजरेने इकडे तिकडे पाहू लागला. आजूबाजूची वनश्री त्याला ह्या अवस्थेतही अप्रतिम भासली. निसर्गाला एवढे सौंदर्य असते हे आजच आणि आताच त्याला खरेखुरे जाणवले. ह्या सौंदर्यशाली प्रदेशात माणसांनी चालविलेली रक्ताची रंगपंचमी व कत्तल पाहून त्याला शिसारी आली. युद्धाची धुमश्चक्री सरकत आता दूर गेली होती. सायंकाळ झाली होती. सूर्यास्ताचा समय नजीक येऊन ठेपला होता. रणधुमाळी आवरत आल्याची चिन्हे दिसत होती. दूर दूर क्षितिजावर गरजणाऱ्या तोफेचा धडाऽड धडाऽड आवाज रेंगाळत त्याच्या कानांवर येऊन आदळत होता. लांबून कोठून तरी तुतारीचे कर्णकटू स्वर आले. जखमी लोकांचे विव्हळणे, कुंथणे चालू होते आजूबाजूला.

अंधाराची काळी सावली सरकू लागली. युद्ध विराम पावले. समरभूमीवर जखमी व मृत शिपाई इतस्तत: विखुरले होते. जंगली श्वापदे त्यांच्या समाचारास जाण्याची योग्य वेळ पाहात दबून बसली होती. रक्ताळलेल्या भूमीभागावर पसरलेला हा मानवी देहांचा सडा मोठा भयानक दिसत होता. आपल्या दिशेने येणारा घोड्यांच्या टापांचा टपटप् आवाज अँड्रीच्या कानी आला. नेपोलियन आपल्या अधिकाऱ्यांसह रणभूमीची पाहाणी करीत हिंडत होता. झेंडा हाती घेऊन स्वस्थ मृतवत् पडलेल्या अँड्रीकडे लक्ष जाताच त्याने लगाम खेचून आपला घोडा उभा केला. ''वाऽ सुंदर मरण!'' तो उद्गारला. एवढ्यात अँड्री चाळवल्यागत झाला. त्याच्या मुखातून अस्पष्ट असा विव्हळण्याचा आवाज बाहेर पडला. ''ह्याला उचलून माझ्या छावणीकडे न्या नि खास डॉक्टरकडून त्याची सेवाशुश्रुषा करवा!'' त्याने आपल्या अधिकाऱ्यांना हुकूम दिला.

पराभूत झालेले रशियन सैनिक विस्कळीतपणाने रखडत रखडत घरी परतू लागले होते. काही संपूर्ण निराश झाले होते, तर काहींना ह्या पराभवाचे उट्टे काढण्याची तीव्र इच्छा निर्माण झाली होती. मॉस्कोला परत जाण्यास निघालेल्या

निकोलसला मात्र ह्यांपैकी काहीच वाटत नव्हते. त्याला फक्त घरी जाण्याचीच ओढ लागली होती. सोनियाची मूर्ती त्याच्या डोळ्यांपुढे तरळत होती. गाडीवाल्याला गाडी जोरात दौडवता येत नाही हीच एक त्याची तक्रार होती. त्याच्याबरोबर त्याचा वरिष्ठ अधिकारी, मित्र आणि काळ्या टोकदार मिशांचा डेनिसोव्ह हाही होता. त्याच्यापुढे आपल्या घिसाडघाईचे प्रदर्शन होऊ नये म्हणून तो जपत होता आणि त्यामुळेच गाडीवाल्याला गाडी जोरात पिटाळण्याचा तगादा करणे त्याला शक्य होत नव्हते.

गाडी घराच्या रस्त्यावर येताच निकोलस उल्हासला. कोण आला आणि कोण गेला ह्याची दखल घेण्यास आपण जणू काही तयारच नाही, अशा आविर्भावाने त्याचे घर अंधारात निस्तब्धपणे उभे होते. निकोलसने गाडीतून उडी टाकून गडबडीने घराचा भला मोठा दरवाजा रेटला. ठराविक पद्धतीने कुरकुर करीत तोही उघडला गेला. आत जळणारी एकुलती एक मेणबत्ती मंद प्रकाश टाकीत, अंधाराशी झगडत तिपाईवर उभी होती. तेथेच एका स्टुलावर बसून 'प्रोकोफी' हा हुजऱ्या डुलक्या घेत होता. दाराने केलेली कुरकुर ऐकून त्याने आपले झोपाळू डोळे किंचित किलकिले केले. निकोलस दृष्टीला पडताच मात्र त्याची झोप पार उडाली. अत्यानंदाने तरारून तो ओरडला, ''ओऽहो! छोटे मालक! छोटे मालक!!'' ''छोटे मालक!'' घरानेही पडसाद दिला. डेनिसोव्ह आपल्या बरोबर आहे, पाहुणा म्हणून आला आहे, ह्याचे भानही निकोलसला राहिले नाही. आपल्या अंगावरील जड उबदार कोट काढून त्याने प्रोकोफीच्या अंगावर भिरकावला आणि दिवाणखान्याकडे धाव घेतली. हा हा म्हणता आजूबाजूची दारे खडाखड आवाज करून उघडू लागली. स्त्री-पुरुषांचा एक लोंढाच आला जणू त्याच्या अंगावर! त्याची ओढाताण सुरू झाली. चुंबनांच्या भडिमाराने तो बेजार होऊन गेला. आनंदाश्रूंचा पाऊस पडू लागला त्याच्या अंगावर! आई, बाप, बहीण, प्रेयसी कोण कोठे आहेत हेच त्याला कळेना मुळी ह्या धमालीत. सारेच हर्षाने गलबलाट करीत होते, त्याला ओढीत होते, चोंबाळीत होते. एखाद्या चिमण्या पोराप्रमाणे त्याची अवस्था होऊन गेली.

सोनिया, नताशा, त्याचा बाप म्हातारा काउंट व धाकटा भाऊ पेत्या ही सर्वच ह्या धांदलीत, आनंदात, सामील झाली होती. नोकर चाकर, दाया मोलकरणी ह्यांनीसुद्धा ह्या आनंदोत्सवात मनसोक्त भाग घेतला होता. ''दादा! दादा!!'' करून नताशाने तर विलक्षण आनंदाने त्याला झोंबाडले.

इतक्यात झपाझप येणारी कोणाची तरी पावले वाजली. पावलांच्या गतीवरून तरी ती निकोलसच्या आईची असण्याची शक्यता नव्हती, पण ती होती मात्र तिचीच! आई दृष्टीला पडताच निकोलसने तिच्याकडे धाव घेतली. तिने त्याला एकदम हृदयाशी धरून कुरवाळले व त्याच क्षणी सोनियाकडे असा एक कठोर दृष्टिक्षेप टाकला की जणू काही तिला सुचवावयाचे होते, ''माझा हा राजबिंडा मुलगा तुझ्यासारख्या दरिद्री, आश्रित मुलीचा प्रियकर होऊ शकत नाही!''

पेरी अवाढव्य मालमत्तेचा वारस बनल्या दिवसापासून व्हॅसिली व त्याची सौंदर्यशाली कन्या हेलेन ह्यांनी त्याच्याबद्दलच्या अगत्याला उधाण आणले होते. त्यांची गाठभेट झाली नाही असा एक दिवसही जात नसे. आपण हेलेनवर खरेखुरे प्रेम करीत आहोत किंवा काय ह्याची शंका पेरीला अधून मधून वाटे. पण हेलेनच्या सौंदर्याने तो भारावून गेला होता. तिच्या सहवासाची आसक्ती, ओढ त्याच्या मनात निर्माण झाली होती ही गोष्ट काही खोटी नव्हती. पेरी व हेलेन ह्यांच्या विवाहाची शक्यता आता उघडपणे चर्चिली जाऊ लागली होती. ''हेलेनशी विवाह करण्यात अर्थ नाही! तिच्या भावना आपल्या पतिपत्नी संबंधाला पोषक असतीलच अशी हमी नाही!'' पेरीच्या मनात क्वचित् प्रसंगी असा विचार डोकावे, पण त्याच क्षणी हेलेनच्या सहवासाची तीव्र इच्छाही त्याला आवरता येत नसे. ''हेलेनसारखी सौंदयशाली स्त्री पत्नी म्हणून लाभल्यास, तिचं ते लाडकं स्मित, ते अप्रतिम सौंदर्य कायमचं आपलं होईल!'' असाही एक विचार त्याच्या मनात चमकून जाई. आणि शेवटी व्हायचे तेच झाले. एके दिवशी हेलेन व पेरी उभयता विवाहबद्ध झाली.

मॉस्कोमधील आपल्या भव्य प्रासादात हेलेनचा पती म्हणून वावरणारा पेरी सुखसागरात डुंबत होता. पेरी सुखावला होता. मद्य व मदिराक्षी ह्यांचा गुलाम बनला

होता. हेलेन क्वचित् प्रसंगी त्रासल्यागत दिसे, पण पेरीच्या सहवासाला आपण किती आसुसलेल्या आहो ह्याचे नाटकही छानदार वठवी.

युद्ध मॉस्कोपासून फार दूर होते. अँन्ड्री, निकोलस पेरीच्या लालचावलेल्या, सुखावलेल्या मनातून दूर झाले होते. पण एक दिवस रशियाच्या पराभवाची वार्ता आली आणि पेरीची मोहनिद्रा चाळवल्यागत झाली. तो उदासीन दिसू लागला. आपली सुखासीन वृत्ती ठीक नाही ह्याची जाणीव त्याला तीव्रतेने होऊ लागली. पेरीच्या मनातील ह्या घालमेलीकडे हेलेन उपेक्षेने पाहात होती. भोग, विलास, समृद्धी ह्यापलीकडे तिला कशाचीच गरज नव्हती. जीवनमधु-शोषणाची चटक लागलेली ही मक्षिका जयापजयाच्या क्षुल्लक विचाराला भीक घालण्यास तयार नव्हती.

''मॉस्कोतील रंगेल वातावरण सोडून त्या खेडवळ मुलखात जायची गरजच काय मुळी!'' ती पेरीला विचारीत होती.

''मला इथे करमत नाही! थोडे दिवस निवान्त एकांतात राह्यलं म्हणजे बरंही वाटेल नि शेतीभातीकडे लक्षही देता येईल!''

''मग आपण एकटेच जा ना! तशी गरजच वाटली तर मी मागाहून येईन काही दिवसांनी!''

मनोमनी पटत नसताही पेरीला हेलेनच्या हट्टाला रुकार द्यावा लागला. अस्वस्थ मनस्थितीतच त्याने पत्नीची खोली सोडली व आपल्या जमीनदारी गावी जाण्याची तयारी केली. बाहेर पडणाऱ्या पेरीकडे हेलेनने काही काळ टक लावून पाहिले. नंतर तुच्छतेने खांदे उडवून तिने आरसा व ब्रश हाती घेतला. केस विंचरता विंचरता हळूहळू तिच्या मुद्रेवर स्मित झळकू लागले. संगीताचे हळूवार स्वर तिच्या मुखातून बाहेर पडू लागले.

●●●

## ६

'ऑस्टरलिझ'च्या लढाईनंतर निकोलस परत आल्याने रोस्टोव्ह कुटुंबात आनंदीआनंद झाला, पण इकडे बोलोन्स्की घराण्यात मात्र दु:खाची विषण्ण छाया पसरलेली होती. नेपोलियनशी युद्धतहकुबी होऊन युद्ध तात्पुरते का होईना पण विराम पावल्याचीही बातमी येऊन थडकली, तरीही अँड्रीचा पत्ता नव्हता. सारे राष्ट्र शांतता झाल्याच्या क्षणिक का होईना, पण आनंदात मग्न झाले होते; पण म्हातारा काउंट बोलोन्स्की मात्र, अँड्रीचा पत्ता न लागल्याने अस्वस्थ होता. उदास होता. मेरी खिन्न होती. लिसी गरोदर स्त्रीच्या स्वाभाविक गंभीरतेने मुकाट्याने वावरत होती.

जवळ जवळ दोन महिन्यांनी अँड्रीचा तपास लागत नसल्याची वार्ता म्हाताऱ्या बोलोन्स्कीला अधिकृतपणे कळविण्यात आली. तो रणक्षेत्रावर गायब झाला होता. कुझोव्हने आपल्या पत्रात लिहिले होते, ''हाती झेंडा घेऊन शत्रूशी लढता लढता तुमचा मुलगा घायाळ होऊन रणक्षेत्रावर कोसळल्याचे मी समक्ष माझ्या डोळ्यानी पाहिले आहे. बापाचे नाव काढले त्याने! तो कामी आला की शत्रूच्या हाती जिवंत लागला हे कळण्यास मात्र मार्ग नाही.''

हे पत्र मिळाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी सकाळी म्हातारा लेथवर काही काम करीत बसला असता मेरी तेथे गेली. तिला पाहाताच चमत्कारिक आवाजात तो म्हणाला, ''कोण मेरी?'' लेथवरचा पाय त्याने काढला. चक्राला गती आलेली असल्याने ते तसेच फिरत राहिले. क्रमश: त्याची गती कमी कमी होत अखेर ते थांबले. बाप विमनस्क स्थितीत आहे हे मेरीच्या ध्यानात येण्यास वेळ लागला नाही. ''बाबा, अँड्रीची काही वार्ता कळली का?'' तिने भीत भीत विचारले.

''मला कुझोव्हचं पत्र आलं आहे. अँड्री जखमी लोकांत नाही. तो कैद झालेला नाही. तो मेला आहे! तो मेला आहे!!'' म्हातारा हृदयाला पीळ पडल्याप्रमाणे कळवळून ओरडला. मेरीची बापाबद्दलची भीती दूर पळाली. तिने असाहायपणे स्फुंदत स्फुंदत त्याच्या गळ्याला मिठी मारली. ''बाबा! बाबा!!'' ती काकुळतीने म्हणाली व भडभडून रडू लागली.

''हरामखोर बेटे! माणसांचा, सैन्यांचा निष्कारण नाश करणारे सैतान! का? कशासाठी? जा पोरी जा, आणि लिसीला जाऊन सांग सारं!''

मेरी बापाच्या खोलीतून बाहेर पडून लिसीकडे आली. तिची भावजय हातात काहीतरी विणकाम घेऊन बसली होती. मेरीची दु:खी मुद्रा पाहून ती म्हणाली, ''वन्स, ह्यांची काही विशेष बातमी आहे का?''

''नाही! तसं विशेष काही नाही! बाबा अस्वस्थ झाले आहेत म्हणून मलाही जरा भीती वाटते.''

''तुम्ही काहीच ऐकलं नाही त्यांच्याकडून?''

''नाही!'' आपले ओठ घट्ट आवळीत मेरी म्हणाली. लिसीच्या प्रसूतीचे दिवस जवळ आले असल्याने, तिची सुटका होईपर्यंत काही एक बोलावयाचे नाही, असा तिने निश्चय केला होता.

एके दिवशी सकाळी लिसी अस्वस्थ झालेली दिसू लागली. अशक्तपणाने आधीच फिकट झालेली तिची मुद्रा अधिकच फिकट दिसू लागली.

''वहिनी, काय झालं गऽ? तू आज अशी का दिसतेस?'' मेरीने घाबऱ्या घाबऱ्या विचारले.

''काही विशेष नाही, पोटात जरा अस्वस्थ वाटतंय एवढंच!'' पण अशा बतावणीने भागण्याजोगे नव्हते. लिसीच्या वेदना क्षणोक्षणी वाढू लागल्या. असाहायपणे ती आळोखे पिळोखे देऊ लागली. तळमळू लागली. मेरी घाबरून गेली; इतक्यात लिसीच्या दिमतीस दिलेली गबदुल दाई आपले गोल गलेलठ्ठ हात चोळीत चोळीत तेथे आली. ''मला वाटतं वहिनीला वेदना सुरू झाल्या आहेत!'' आश्चर्याने, भीतीने विस्तारलेल्या डोळ्यांनी दाईकडे पाहात मेरी म्हणाली.

''छान, छान! मग त्यात एवढं भिण्याजोगं काय आहे बाईसाहेब?''

''मॉस्कोचे डॉक्टर अजून का आले नाहीत कळत नाही.'' मेरी काळजीयुक्त स्वरात म्हणाली.

''न का येईना मेला! आहे काय काम त्याचं इथे! तुम्ही अलीकडच्या मुली म्हणजे अशाच घाबरट!'' दाई बेदरकारपणे म्हणाली. आपल्या ह्या फुशारकीने मेरीला धीर येईल अशी तिची भोळी समजूत होती.

मेरी आपल्या खोलीत जाऊन एकटीच बसली. थोड्या वेळाने तिच्या बालपणापासूनची तिची म्हातारी दाई तिच्या सोबतीला तेथे आली. लिसीच्या वाढत्या वेदनांमुळे आज दिवसभर कोणालाच जेवणखाण सुचले नव्हते. लिसीच्या खोलीतून येणारे विव्हळण्याचे आवाज ऐकून मेरीचा जीव खालीवर होत होता. तिचा म्हातारा बाप बाहेर सज्जात सर्व दिवसभर येरझारा घालीत अस्वस्थपणाने फिरत होता. सर्व नोकर-चाकर चुपचाप बसून होते.

रात्र झाली. प्रासादात सर्वत्र मेणबत्या, मशाली लागल्या. दाई बाहेर येऊन म्हणाली, ''प्रसूतिवेदना चालू आहेत. मुलगी अशक्त असल्याने जरा जास्त त्रास होतो आहे एवढंच!'' रात्र वाढू लागली, मार्च महिन्यातील ही रात्र! हिवाळा आपल्या स्थानाला चिकटून राहाण्याची कोशीस करून राहिला होता. तुफानी वादळ व हिमवर्षाव ह्यांच्या जोरावर तो आपले अधिराज्य संपले नाही ह्याची प्रचिती आणून देऊ पाहात होता.

डॉक्टरला आणण्यासाठी, एकामागून एक घोडेस्वार मॉस्कोला पिटाळण्यात आले होते पण अद्यापि तरी कोणाचाच पत्ता नव्हता.

मेरी जागत बसली होती. तिची म्हातारी दाई जवळ बसल्या बसल्या डुलक्या घेत होती. एकाएकी ती ताडकन् जागेवरून उठली व खिडकीतून बाहेर डोकावत म्हणाली, ''गाडीचा आवाज येतोय. देव करो, डॉक्टर आला असावा बहुत करून!'' गाडी थांबल्याचा ठराविक आवाज आला. गाडीतून कोणीतरी उतरल्याची चाहूल लागली. ''ते झोपी गेले आहेत.'' नोकर कोणाला तरी सांगत असलेले शब्द कानी आले. ''कोण आलं आहे? जाऊनच पाहाते मी.'' असे म्हणून मेरी ताड्कन् उठली व बाहेर येऊन जिन्याच्या तोंडाला उभी राहिली. जिन्यात अंधुक अंधुक उजेड पडला होता. खाली नोकराशी बोलणाऱ्या माणसाचा आवाज तिला परिचित वाटू लागला. ''हा अँड्री तर नाही ना?'' मेरीला शंका आली. ''नाही, पण ती शक्यता नाही!'' तिने मनाला आवरले आणि त्याच क्षणी चपराशी कोणाला तरी मेणबत्तीचा प्रकाश दाखवीत जिन्याच्या तळपायरीशी घेऊन आला. त्या मंद प्रकाशात अँड्रीचा चेहेरा तिला

दिसला. अँड्री खूपच वाळला होता. शेलाटा झाला होता. फिकट दिसत होता. मेरीला पाहाताच तो तर तर जिना चढून वर आला व त्याने बहिणीला छातीशी धरले. ''मी येणार असल्याचं पत्र तुम्हाला मिळालंच नाही का ग?'' तिला कुरवाळीत त्याने विचारले. ''नाही! नाही!!'' मेरी गहिंवरून म्हणाली. ''मी जखमी होऊन फ्रेंचांच्या हाती लागलो होतो, पण त्यांनी मला खूपच चांगल्या रितीने वागवलं नि बरा होताच सोडून दिलं.'' तो म्हणाला. एवढ्यात मॉस्कोहून आलेला जर्मन डॉक्टर जिना चढून वर आला. अँड्रीच्या पाठोपाठच त्याचे आगमन झाले होते. मेरीला तेथेच सोडून अँड्री डॉक्टरच्या मागोमाग लिसीच्या खोलीत आला.

लिसी एखाद्या मेणाच्या पुतळीप्रमाणे बिछान्यावर पडून होती. अँड्रीच्या आगमनाची चाहूलही तिला लागली नसावी, कारण तिच्या मुद्रेवर कोणत्याच विकारांची चलबिचल झालेली दिसली नाही. अँड्रीने तिच्याजवळ जाऊन तिच्या कपाळाचे हळुवार चुंबन घेतले. लिसीने डोळे उघडले व त्याच्याकडे निर्विकारपणाने टक लावून ती पाहू लागली. आपल्याला अशा ह्या एकान्तवासात, हालात, सोडून जाणाऱ्या अँड्रीबद्दलचा आपला तिरस्कारच जणू ती प्रकट करीत होती. फिरून तिच्या वेदना चालू झाल्या. म्हाताऱ्या दाईने येऊन अँड्रीला खोली सोडून जायला सांगितले. तो शेजारच्या खोलीत निघून गेला. पण पंचप्राण गोळा करून, शेजारच्या खोलीत होणारी प्रत्येक हालचाल लक्षपूर्वक ऐकू लागला.

लिसीच्या हृदयद्रावक विव्हळण्याने तो कासावीस होत होता. ''मोठा विलक्षण योगायोग आहे हा!'' तो स्वत:शी पुटपुटला व अस्वस्थपणाने येरझारा घालू लागला. लिसीने मारलेली अस्फुट पण करुण किंकाळी त्याच्या कानी येताच तो तिच्या खोलीकडे धावला. दार बंद होते. त्याने ते ठोकताच आतून कोणीतरी म्हणाले, ''नाही! आताच आत येता येणार नाही!'' अँड्री निराश झाला. पण आता विव्हळणे थांबले होते. आत कसली तरी अस्वस्थ हालचाल चालू होती. एकाएकी तान्ह्या मुलाचे रडणे त्याच्या कानी आले. त्याची मुद्रा विलक्षण उल्हसित झाली. ''मला मुलगा झाला! नक्की मुलगाच आहे हा?'' त्याच्या मनात विचार आला. त्याचे हृदय भरून आले. तो गुदमरल्यागत झाला. एखाद्या अजाण पोराप्रमाणे अश्रू ढाळू लागला.

लिसीच्या खोलीचा दरवाजा उघडून डॉक्टर बाहेर आला. त्याने आपल्या सदऱ्याच्या अस्तन्या दुमडून मागे सारल्या होत्या. जाकीट काढून ठेवले होते. त्याच्या तोंडाचा जबडा थरथरत होता. अँड्रीने त्याच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला, पण एक चकार शब्दही न बोलता तो चमत्कारिक मुद्रेने तसाच निघून गेला. त्याच्या पाठोपाठ दाईही बाहेर आली, पण अँड्रीला पाहाताच ती तेथेच थबकली.

अँड्रीने घाईघाईने लिसीच्या खोलीत प्रवेश केला. मृत लिसी पूर्वीप्रमाणेच बिछान्यावर पडली होती. तिचे डोळे सताड उघडे पडले होते. गाल पांढरे फटफटीत झाले होते, पण मुद्रेवरील पोरकट भाव तशातही शाबूत होता.

''माझं तुझ्यावर प्रेम आहे लिसी! मी अद्यापि कुणालाही दुखवलेलं नाही. पण तू मात्र.... तू मात्र.... '' अँड्री कळवळून म्हणाला व ओक्साबोक्शी रडू लागला. खोलीच्या एका कोपऱ्यात मऊ बिछान्यावर, लालभडक मासाचा एक गोळा - त्याचा मुलगा - वळवळत होता. ह्या नव्या मांसाच्या गोळ्यात आपले जीवन साठवून त्याची आई, अँड्रीची पत्नी- निघून गेली होती.

आणखी सुमारे दोन तासांनी चोरट्या पावलांनी अँड्रीने बापाच्या खोलीत प्रवेश केला. म्हातारा खोलीत चिंताक्रांत होऊन उभा होता. घरातील एकूण एक घटना त्याला आधीच परिचित होऊन चुकली होती. त्याने अँड्रीला कवटाळून आपल्या पुढ्यात घेतले. म्हातारा थरथरत होता, स्फुंदत होता, पण बोलत मात्र नव्हता! आणि मग तो एकदम कडाडला, ''ह्या यातना भोगण्यासाठी लढलो आपण पोरा! युरोपच्या, रशियाच्या स्वातंत्र्याच्या गप्पा मारल्या लेकांनी ह्यासाठी!''

ऑस्टरलिझच्या संग्रामाला आता जवळ जवळ दीड वर्ष होऊन गेले होते. १८०७ च्या जून महिन्यातील ही एक सकाळ होती. सर्वत्र लख्ख सूर्यप्रकाश पसरला होता. रशियन झार अलेक्झांडर ह्याने नेपोलियनशी शांतता-करार

करण्याचा निर्णय केला होता. आज तो टिलसिट येथे नेपोलियनला भेटून शांतता-तहावर सही करणार होता.

टिलसिटच्या एका प्रशस्त चौकात, रशियन व फ्रेंच सैनिकांच्या तुकड्या समोरासमोर उभ्या होत्या. झारने घोडदळातील सर्वोच्च अधिकाऱ्याचा गणवेष चढविला होता, तर नेपोलियन आपली ठराविक तिकोनी टोपी घालून निळ्या रंगाच्या पोशाखात आला होता. दोनही बादशहांनी आपापल्या घोड्यांवरून उतरून हस्तांदोलन केले. नेपोलियनच्या गुबगुबीत चेहेऱ्यावर तुच्छतानिदर्शक स्मिताची एक लहर उठली. डेनिकोव्हला भेटण्यासाठी आलेला निकोलस रोस्टोव्ह हे दृश्य पाहात होता.

ती रक्ताळलेली समरभूमी, ते विव्हळणे, कुंथणे, नाकाला झोंबणारी सडक्या मुडद्यांची घाण, हे सर्व काही तो क्षणभर विसरल्यागत झाला.

झार व नेपोलियन बंधू बंधू असल्याची घोषणा झाली.

''युरोपचा हरामखोर!'' म्हणून झारने शापलेला नेपोलियन आज त्याचा भाऊ झाला होता! हे बंधुत्त्व जोडायला किंमत काय पडली, तर असंख्य निरपराध तरुण पोरांची अमानुष कत्तल!

●●●

## ७.

मॉस्कोतील सौंदर्य-सम्राज्ञीशी विवाहबद्ध होण्याचा मान आपणास मिळाला आहे ह्या जाणिवेबरोबरच आपणाला झेपणारा हा गौरव नाही ह्याचीही जाणीव, पेरीला ह्या शांत ग्रामीण वातावरणात तीव्रतेने होई. बेझुकोव्ह घराण्याच्या सर्व मालमत्तेची देखभाल करणे काही सामान्य काम नव्हते. त्यासाठी त्या भागातच दीर्घकाल राहाणे आवश्यक होते आणि हेलेन तर मॉस्को सोडून हलण्यास मुळीच तयार नव्हती. नाचरंग, मेजवान्या, जलसे, नृत्ये, इत्यादि तिचे कार्यक्रम, अप्रतिहत अव्याहत सुरू होते. पेरीची मालमत्ता, संपत्ती तिला हवी होती पण त्याची अरसिक संगत मात्र तिला नको होती. रंगेल नृत्य-समारंभातून सहवास-सोबत करणारा एखादा रसिक जोडीदार तिला त्याच्याऐवजी हवा होता आणि मॉस्कोत त्यांची मुळीच उणीव नव्हती.

हेलेनने असे अनेक जोडीदार आतापर्यंत हाताळले होते, पण कॅप्टन दोलकोव्ह मात्र तिच्या सहवासात स्थिरावू लागला होता. तिच्या उनाड भावाचा- अँतोनचा- तो जिवलग मित्र होता. एके काळी पेरीवर स्थिरावणारी तिची विषयासक्त नजर आता दोलकोव्हच्या मुद्रेवर स्थिरावू लागली होती.

पेरीला, हेलेन व दोलकोव्ह ह्यांच्या हालचालींची बित्तंबातमी पुरविणारे निष्काम कर्मयोगीही मॉस्कोत काही थोडे नव्हते! त्यांच्या पत्रांनी तो विचलित होई पण गप्प बसे! आज मात्र त्याने मॉस्कोला जाण्याचा निर्णय केला. हेलेन-दोलकोव्ह प्रकरणाचा निकाल करण्याचा त्याने निश्चय केला.

मॉस्कोतील एका रंगेल इंग्लिश क्लबमध्ये आज पेरी दोलकोव्हबरोबर भोजनास आला होता. दोघांनी मद्याचे प्याले हाती घेतले होते. ''मॉस्कोतील सुंदर स्त्रिया नि त्यांचे प्रियकर ह्यांच्या... ह्यांच्या अभिनंदनार्थ!'' आपला प्याला उंच धरून दोलकोव्ह बरळला. क्लब असंख्य रंगेल लोकांनी गजबजून गेला होता. पेरीने खूपच मद्य प्राशन केले होते. पत्नीच्या स्वैराचाराच्या वार्तांबरोबरच त्याचे मद्यप्राशनाचे व्यसनही वाढत गेले होते. आपल्या सौंदर्यशाली पत्नीची उपेक्षा करणारा हा नवरा मूर्ख आहे असा मॉस्को रसिकांचा समज होता आणि म्हणूनच हेलेनच्या भोवती तिच्या चाहत्यांचा घोळका वाढत होता. तिला संगत-सोबत देण्यासाठी अनेक वीर तयार होते.

''हरामखोर! न ऽ न ऽ नाऽ दान!!'' पेरी दोलकोव्हच्या वाक्याने दुखावून, त्याच्या मुद्रेवर आपली मद्यपी नजर खिळविण्याचा प्रयत्न करीत बरळला.

दोलकोव्ह एकदम चमकला, संतापला. ''चूप!'' तो

हळूच म्हणाला.

''चूप! कोणाला चूप म्हणतोस? हिंमत असेल तर कर दोन हात माझ्याशी!'' पेरी नकळत, संतापाने त्याला द्वंद्वाचे आव्हान देऊन चुकला.

दुसऱ्या दिवशी सकाळी आठ वाजताच पेरी आपल्या सहकाऱ्यासह, मॉस्कोला लागूनच असलेल्या सोकोनिकी जंगलात येऊन पोचला. दोलकोव्ह त्याच्या आधीच तेथे येऊन दाखल झाला होता. त्याच्याबरोबर डेनिसोव्ह व निकोलस त्याचे सहकारी म्हणून आले होते.

पेरी विचारात गढला होता. हेलेनच्या अपराधाबद्दल त्याला शंका नव्हती, पण दोलकोव्हच्या अपराधाबद्दल मात्र तो साशंक होता. ''आपल्या उत्तान पत्नीने ह्या उमद्या पोराला नादी लावलं ह्यात त्याचा काय अपराध? मी जर त्याच्या जागी असतो तर मी तरी काय केलं असतं? नादावलो असतोच की नाही! मग हे द्वंद्व, ही खुनाखुनी का?'' त्याच्या डोक्यात विचारचक्र चालू होते. ''आता तो मरेल अगर मी मरेन, पण हेलेनला त्याचं काय?'' पण ह्या सारासार विचाराला आता वेळ कोठे होता? नियतीने द्वंद्व लादले होते. माघार घेणे भ्याडपणाचे होते. पत नडत होती. पतीसाठी मरणे अगर मारणे भागच होते आता त्याला!

सर्व सिद्धता झाली. पिस्तुले व्यवस्थित भरण्यात आली. मध्यावर हद्द दाखविण्यासाठी, हिमात एक तलवार खुपसून उभी करण्यात आली. पेरीचा सहकारी त्याच्याजवळ येऊन म्हणाला, ''ह्या गंभीर क्षणी मी तुमच्यापाशी अंत:करण खुलं केलं नाही तर ती चूक होईल नाही?'' पुढे तो चाचरत म्हणाला, ''रक्तपात करण्याइतकं मोठं कारण, भांडण आपणांत दिसत नाही. आपल्या मनाचा तोल गेल्यामुळे हा प्रसंग ओढवला आहे नाही?''

''होय होय!! हा एक भयंकर मूर्खपणाच आहे.'' पेरी म्हणाला.

''मग तुमची दिलगिरी मी तुमच्या प्रतिस्पर्ध्याला निवेदन करू का? तो खचित ती मान्य करील नि माघार घेईल!''

''छे ऽ छे! हा त्याहूनही मूर्खपणा आहे. तुम्ही हे काय बोलत आहात, मी कुठे उभं राहायचं? काय करायचं ते सांगा?'' गंभीर स्मित करीत पेरी उत्तरला, ''हे पिस्तुल कसं उडवायचं ते तरी सांगा मला कुणी!''

''माफी बिफी कुछ नही!'' दोलकोव्ह, डेनिसोव्हला- आपल्या सहकाऱ्याला- त्याच वेळी म्हणत होता.

जंगलातील पाईन वृक्षराजी पांढऱ्या शुभ्र, नाजूक हिमाने आच्छादली गेली होती. एकमेकांपासून सुमारे चाळीस कदमांच्या अंतरावर द्वंद्वास तयार झालेले प्रतिस्पर्धी एकमेकांसमोर उभे होते. सर्वजण शांत होते.

''होऊद्या ना सुरुवात!'' दोलकोव्ह म्हणाला.

''जरूर! जरूर!!'' आपले चमत्कारिक स्मित करीत पेरी ओरडला. वातावरणात भयानक शांतता पसरली होती. मूर्खपणाच्या चिडाचिडीतून निर्माण झालेले हे प्रकरण थोपविणे आता कोणाच्याच हाती नाही हे सर्वांनाच कळून चुकले होते. आता त्याची तड लागणेच अपरिहार्य होते.

डेनिसोव्ह त्या दोघांच्या मध्ये येऊन उभा राहिला. ''हे प्रतिस्पर्धी माघार घेण्यास ज्या अर्थी तयार नाहीत, त्या अर्थी ह्या द्वंद्वाचा निकालच लावणं भाग आहे!'' तो म्हणाला. ''सज्ज करा आपापली पिस्तुलं! मी तीन म्हणताच झाडा गोळ्या! हुश्शार! एऽक, दोऽन, तीन!'' डेनिसोव्ह रागारागाने ओरडला व झटकन् मागे पळता पळता पुटपुटला, ''मरा लेको!''

पेरी आणि दोलकोव्ह सरसावले. विरल धुक्यातून एकमेकांस निरखून नेम धरण्याचा प्रयत्न करू लागले. पेरीने आपले पिस्तुल उजव्या हातात लांबलचक धरले होते. त्याच्या मनाची चलबिचल अद्यापिही चालू होती. त्याची सर्व हालचाल गोंधळल्याप्रमाणे होत होती. अभावितपणे त्याच्या पिस्तुलाचा चाप ओढला गेला. ठोऽऽ! त्याच्या पिस्तुलाने गर्जना केली. पेरी दोलकोव्हच्या पिस्तुलाचा आवाज ऐकू येईल म्हणून कान टवकारून थबकला, पण तो आलाच नाही.

दोलकोव्ह हिमावर अडखळताना, कडमडताना त्याला दिसला. क्षणार्धात तो पालथा कोसळला. बचकभर, मऊ, भुसभुशीत हिम त्याच्या वासलेल्या तोंडात शिरले. पिस्तुलातून निघालेला धूर सरकत सरकत दूर निघून गेला आणि पेरीला ते भयानक दृश्य दिसले.

डाव्या हाताने दोलकोव्ह आपली बगल दाबीत होता व थरथरणाऱ्या उजव्या हाताची पकड, पिस्तुलावर घट्ट करण्याचा प्रयत्न करीत होता. त्याच्या कुशीतून ओघळणारे रक्त तो पडलेल्या शुभ्र हिमावर ठळकपणाने उठून दिसत होते. त्याचा चेहरा पांढराफट पडला होता. निकोलस त्याच्यापाशी आला आणि त्याला काहीतरी म्हणाला. ''नाही! नाही!!'' दातखीळ वाजवीत दोलकोव्ह त्याला म्हणाला. त्याने हातावर भार देऊन उठण्याचा प्रयत्न केला, पण फिरून तो खाली कोसळला. त्याचा हात रक्ताने बरबटला होता. त्याने तो कोटाला पुसून साफ करण्याचा प्रयत्न केला. तो सुस्कारत होता. ''च ऽ'' त्याने बोलण्याचा प्रयत्न केला पण ते जमले नाही. शेवटी मोठ्या कष्टाने तो म्हणाला, ''च ऽ चऽल.... पु... पुढे ये!'' त्याचे चाचरणारे शब्द ऐकून पेरी पुढे धावला. त्याला अनिवार हुंदका आला होता. ''हां ऽ हांऽ हद्द ओलांडू नको.'' कोणीतरी ओरडले आणि पेरी हद्दीवर उभारलेल्या तरवारीपाशी थबकला. गोंधळून इकडे तिकडे पाहू लागला. आता तो आणि त्याचा प्रतिस्पर्धी ह्यांत कसेबसे आठदहा कदमांचे अंतर होते. दोलकोव्हने मस्तक खाली करून तेथे पडलेले हिम त्वेषाने चघळले व घशाला पडलेली कोरड दूर करण्याचा प्रयत्न केला. त्याने उठून उभे राहाण्याची धडपड करून पाहिली पण तीत त्याला यश आले नाही. त्याचे ओठ थरथर कापत होते. आपली शक्ती क्षणाक्षणाला क्षीण होत आहे ह्याची जाणीव त्याला तीव्रतेने झाली असावी. एकाएकी त्याच्या डोळ्यांत काही विलक्षण तेज चमकले. त्याने धडपडत आपले पिस्तुल सावरले व नेम घेण्याचा प्रयत्न केला. ''पेरी, सावध! स्वत:ला असा गोळीच्या टप्प्यांत ठेवू नकोस!'' पेरीचा सहकारी ओरडला.

''मूर्खा! सरळ सरळ पिस्तुलापुढे काय उभा राहिला आहेस?'' डेनिसोव्ह, दोलकोव्हचा सहकारी म्हणून आला असूनही ओरडला. पण पेरीचे ह्या कशाकडेच लक्ष नव्हते. तो वेडगळाप्रमाणे दोलकोव्हच्या पुढे सरळ उभा होता. सर्वांनीच भीतीने डोळे मिटले. दोलकोव्हने उच्चारलेले क्रोधयुक्त शब्द व पाठोपाठ झालेला त्याच्या पिस्तुलाचा धडाका त्यांनी ऐकला.

''थुत् तेरी.... हुकला नेम!'' दोलकोव्ह चडफडला व फिरून त्याने साफ पालथे पडून हिमावर मस्तक टेकले.

पुढे काय घडले अगर न घडले हे पाहाण्यास पेरी तेथे उभाच राहिला नाही. हिमाचे ढिगारे तुडवीत, खाली मान घालून तो जंगलात शिरून दिसेनासा झाला. ''मूर्खपणा! साराच मूर्खपणा!!'' तो जाता जाता पुटपुटत होता.

द्वंद्वाची ही वार्ता ऐकून हेलेन एखाद्या नागिणीप्रमाणे पेरीवर उसळली. ''छान! छान!!'' ती पेरीच्या अंगावर ओरडली. ''आपण शूर वीर आहोत अशा घमेंडीत असाल आता आपण नाही? आपण माझे संरक्षणकर्ते ठरलात आता! मॉस्कोच्या विनोदाचा विषय होण्यास हरकत नाही मला आता!! पण तुम्हाला त्याचं काय म्हणा? तुम्ही पराक्रमी ठरलात, झालं काम तुमचं!'' पेरी तिचा हा भडिमार मुकाट्याने ऐकत होता. शेवटी तो त्रस्तपणे म्हणाला, ''आपण आता घटस्फोट घ्यावा हेच बरं!'' हेलेन हसली. त्याला हिणविण्याच्या बुद्धीने तुच्छतेने हसली व चिडून म्हणाली, ''घटस्फोट! काय सुंदर विचार! आपण ह्या अभागिनीला पोटगी देणार असालच! अशी काय धनदौलत ह्यासाठी आपण देऊ करीत आहात ते तरी सांगा एकदा!''

ह्या घटनेनंतर पेरी मनस्वास्थ्य मिळविण्यासाठी रोस्टोव्ह कुटुंबियांकडे, त्यांच्या ग्रामीण भागातील निवासस्थानाकडे निघून गेला.

काउंट रोस्टोव्ह, नताशा, काउंटेस रोस्टोव्ह, नताशाचा धाकटा भाऊ पेत्या, ही सारीच मंडळी तेथे राहावयास आली असल्याने सहवासाला, करमणुकीला, तोटा नव्हता. आपल्या मनातील एकंदर खेदजनक घटनांवर विस्मृतीचा कायमचा पडदा टाकण्याची तीव्र मनीषा पेरीच्या मनात होती. रोस्टोव्ह कुटुंबियांनाही ह्या बड्या पाहुण्याची सरबराई करण्यात एक प्रकारे अभिमान, आनंदच वाटत होता.

●●●

## ८

पेरी, नताशा व छोटा पेत्या आज घोड्यांवर स्वार होऊन व कुत्र्यांचे लटांबर बरोबर घेऊन शिकारीसाठी रानोमाळ भटकत होते. त्याच वेळी अँड्री काही कामासाठी म्हाताऱ्या काउंट रोस्टोव्हला भेटण्यासाठी त्याच्या गावी येण्यास निघाला होता. अचानकपणे त्याची व ह्या टोळक्याची वाटेत रानातच गाठ पडली. पेरीने त्याची नताशाबरोबर ओळख करून दिली व त्याला शिकारीच्या कार्यक्रमात सामील होण्याची विनंती केली. अँड्रीचा उमदा स्वभाव व आकर्षक सौंदर्य ह्यामुळे नताशा त्याच्याकडे स्वाभाविकच आकर्षित झाली. तिने अँड्रीला आपल्याच घरी राहाण्या-जेवण्यास येण्याचे आमंत्रण दिले. पत्नीच्या मृत्यूनंतर उदास झालेला अँड्री आज प्रथमच उल्हसित झालेला दिसू लागला. भुरळ पाडणारे, वेड लावणारे नताशाचे खेळकर सौंदर्य पाहून तो स्तिमित झाला होता. जीवनाचा नव्या दृष्टीने विचार करू लागला होता.

रात्री सज्जात उभी असलेली नताशा, खोलीत बसलेल्या सोनियाला म्हणत होती, ''अँड्री मोठा गोड तरुण आहे नाही! मला तरी तो खूपच आवडला. त्याच्यावर प्रेम करावं असं राहून राहून वाटू लागलं आहे मला!''

अँड्री त्याच वेळी न कळत खालच्या सज्जात उभा होता. नताशाचा प्रत्येक शब्द त्याच्या कानी पडत होता व त्यामुळे त्याची मन:स्थिती मोठी चमत्कारिक होत होती. एकदा त्याला वाटे येथून दूर जावे. पण दुसऱ्याच क्षणी नताशाचे शब्द ऐकण्याचा मोह त्याला अनिवार होई. पूर्ण चंद्राच्या उन्मादकारी प्रकाशात रोस्टोव्ह - प्रासाद न्हाऊन निघत होता. वर नताशाची बडबड अद्यापि चालूच होती. तिला भावना लपविण्याचे ढोंगी शास्त्र अद्यापि माहीत झाले नसल्याने ती खुशाल मनमोकळेपणाने बडबडत होती. अँड्री आपली बडबड ऐकत आहे ह्याची तिला काहीच कल्पना नव्हती. आपल्या भावावर सोनियाचे असलेले प्रेम तिला माहीत असल्याने आपली मनोव्यथा तिच्यापाशी प्रकट करण्यात तिला काहीच संकोच वाटत नव्हता. ''आणि हे बघ सोनिया, एकदा तर मला असं वाटलं की त्याला दोन्ही हातांनी घट्ट पकडून ठेवावं नि त्याच्या मुद्रेवर डोळे रोखून ती मनसोक्त पाहून घ्यावी!'' ती म्हणाली.

''ए ऽ पोरी, पुरे कर तुझी वटवट आणि चल पाहू झोपायला. रात्र बरीच झाली आहे आता!'' सोनिया म्हणाली आणि मग थोड्या वेळाने नताशाची हालचाल बंद झाल्याचे अँड्रीच्या ध्यानी आले. तोही जड पावलांनी आपल्या खोलीकडे जायला निघाला.

अँड्री आणि नताशा ह्यांची प्रथम भेट झाल्याला बरेच दिवस झाले, पण ह्या भेटीत त्यांच्या मनात रुजलेल्या भावना प्रकट होण्यास फारशी संधीच मिळाली नाही. अँड्री परत निघूनही गेला. पण एके दिवशी आकस्मिकपणे एक घटना घडली व अगदी अनपेक्षितपणाने त्यांना एकत्रित येण्याचा योग आला आणि तोही मोठा बहारदार!

नताशा आज प्रथमच एका नृत्य-समारंभाला जाणार होती. सकाळपासून तिची गडबड, धांदल, धावपळ चालू होती. आजच्या नृत्यांत ती भाग घेणार होती.

हात, पाय, गळा, तोंड नितळ स्वच्छ धुवून तिने त्यांना हळूवारपणाने सुगंधी पावडर लावली होती. पांढऱ्या मखमलीचा नाजूक पोशाख चढविला होता. वेण्यांना सुंदर फिती लाविल्या होत्या. तिच्या सौंदर्यप्रसाधनात काडीचीही उणीव राहू नये म्हणून कुटुंबातील साऱ्या स्त्रिया मनापासून झटत होत्या. 'न जाणो एखाद्या सरदारपुत्राने नृत्यासाठी तिची निवड केल्यास, तिला त्याची प्रेयसी बनण्याचाही योग यायचा एखादे वेळेस!' अशा समजुतीखाली प्रत्येकजण होती. नताशा अद्यापि आरशापुढे बसून आपला नट्टापट्टा निरखीत होती.

''ए ऽ पोरी, आटोपलं की नाही तुझं अजून?'' खालून तिच्या आईचा आवाज आला.

''आले ग आले आई! पण तुझं सारं आवरलं का?''

''झालंच म्हणायचं! आता एवढी टोपी चढवली की झालंच म्हणायचं!''

''थांब, तुला ते जमायचं नाही. मीच येऊन बसवते ती!''

आपला थाटमाट आटोपता घेऊन, नताशा सोनियाकडे आली. तिच्याकडे एकदा नीट निरखून पाहून मग ती

आईकडे धावली. आईचे मस्तक इकडे तिकडे वळवीत, टाचण्या, पिना लावून तिने तिची टोपी नीटनेटकी बसवून दिली व प्रेमभराने तिच्या रुपेरी केसांचे एक चुंबन घेतले. मग तिने दायांकडे धाव घेतली. तिचा झोक पाहून त्या अगदी गारीगार झाल्या.

''हे काय बाई!'' असे म्हणत एकीने तिच्या झग्यावर टिचक्या मारून उगीचच काहीतरी झटकल्यागत केले. नताशाच्या निर्दोष नेपथ्यावर साऱ्याजणी कशा बेहोष खूश झाल्या.

''ह्या बायकांचं कधी संपायचं म्हणून नाही! तुम्ही तयार तरी केव्हा होणार ग ऽ?'' म्हातारा काउंट रोस्टोव्ह ओरडत होता.

''एक मिनिट बाबा! झालं हो झालं; आलेच मी!'' नताशा घाईघाईने ओरडली.

होय - नाही करीत करीत रात्री सव्वा दहाला, एकदाचे हे कुटुंब नृत्याला जाण्यासाठी गाडीत चढले. हवा कुंद होती. गाडी कशी गच्च भरून गेली होती माणसांनी. तिला बेसुमार आचके बसत होते. पण ह्या हिसका-हिसकीत आपला जामानिमा बिघडू नये म्हणून प्रत्येकजण कसा आकसून बसला होता. नताशाचे लक्ष मात्र दुसरीकडेच होते. तिच्या डोळ्यांपुढे उजळ दीपप्रकाशात न्हाऊन निघणारा नृत्याचा दिवाणखाना दिसत होता. अनेक सौंदर्यशाली घरंदाज युवकांचा घोळका तेथे जमला होता. फुलांचा, विविध सेंटचा नाजूक सुवास सर्वत्र दरवळला होता. तेथील वातावरण कसे धुंद झाले होते. वाद्यवृंदाचे कोमल स्वर त्यातच तरळत होते. 'आज .... इथेच आपलं दैव उघडणार आहे. ..... आपल्या जन्माच्या जोडीदाराची इथेच गाठ पडण्याची शक्यता आहे ..... कित्ती ... कित्ती ... मजा येणार आहे!' ती मनात म्हणत होती.

नृत्यगृहातील थाटमाट पाहून नताशाचे डोळे दिपून गेले. छात्या काढून व पिसे फुगवून पटरऽघुमऽ डौलाने पावले टाकणाऱ्या कबुतरांच्या जोडीप्रमाणे असंख्य स्त्रीपुरुष उल्हासाने रंगीबेरंगी पोषाखांत तेथे वावरत होते. बहुतेक स्त्रियांना जोडीदार मिळून त्या नृत्यासाठी सज्ज झाल्या होत्या. सोनिया, तिची आई एका बाजूस उभ्या होत्या. जोडीदार न मिळाल्यास आपणास तेथेच त्यांच्याजवळ बसून राहावे लागणार अशी अकारण भीती नताशाला वाटू लागली.

तिची छाती ह्या अज्ञात भीतीने खालीवर होत होती. आपण उपेक्षित तर नाही ना होणार, ह्या शंकेने ती खिन्न झाली. जीवनातील अत्यानंदाचा क्षण येथे मिळेल म्हणून मोठ्या उल्हासाने ती आली होती. पण त्या सर्व आशा-आकांक्षांचा चुराडा तर होणार नाही ना; अशी धास्ती तिला वाटू लागली. 'कोणीच तरुण नृत्यासाठी पाचारण करायला मजकडे आला नाही तर?... मी खूप सुबक नृत्य करते... करीन.... माझ्या नृत्याने तो खास सुखावेल.... पण ही संधीच मला मिळाली नाही तर.... ?' ती रडकुंडीला आली. तिचा म्हतारा बाप दूर दिवाणखान्याच्या दुसऱ्या टोकाला उभा होता. आई व सोनिया ह्यांच्यासह ती एका कडेला उभी होती. पण त्यांच्याकडे कोणाचेच लक्ष जात नव्हते, कोणीच त्यांना नृत्यासाठी पाचारण करीत नव्हते, माणसांत असूनही जंगलात असल्याप्रमाणे त्यांची केविलवाणी अवस्था झाली होती.

आता वाद्य-वृंदामधून उत्तान, दरबारी असे ''वॉल्टझ्'' नृत्याचे उन्मादकारी स्वर निघू लागले. एक क्षण गेला. नृत्याला अद्यापि कोणी सुरुवात केली नव्हती. ''वॉल्टझ्'' नृत्याची आपली करामत दाखविण्याची संधी आपणास मिळणार नाही, ह्या निराशाजनक विचाराने नताशाच्या डोळ्यांत अश्रूंचे टपोरे थेंब उभे राहिले.

घोडदळावरील कर्नलचा पांढरा शुभ्र गणवेष चढवून व नृत्याला योग्य असे बूट घालून अँड्री रुबाबात मित्रपरिवाराच्या घोळक्यात उभा होता. तो आज नृत्याच्या खास तयारीने आला होता आणि रोस्टोव्ह कुटुंबातील स्त्रियांपासून फारच थोड्या अंतरावर उभा होता. मित्रांच्या बडबडीकडे त्याचे मुळीच लक्ष नव्हते. नृत्यासाठी पाचारण केले जाण्याची, औत्सुक्याने वाट पाहात उभ्या असलेल्या स्त्रीसमाजाचे तो बारकाईने निरीक्षण करीत होता.

नताशाचा निराश चेहरा अल्पावधीतच त्याच्या दृष्टिपथात आला. त्याने तिला ओळखले. तिच्या भावना जाणल्या. सज्जात उभे राहून ऐकलेले तिचे शब्द त्याला

आठवले आणि मग सुहास्य मुद्रेने तो काउंटेस रोस्टोव्हपाशी आला. म्हातारीला वाटले हा आपणास पाचारण करण्यासाठी आला आहे आणि ती खुशाल लाजली, पण मग तोल सावरून म्हणाली, ''वाऽवाऽऽ या. मी तुम्हाला माझ्या मुलीची ओळख करून देते.''

''तिचा परिचय तर मला पूर्वीच झाला आहे. मागे एकदा मी आपणाकडे आलो होतो, आपल्या स्मरणात आहे ना?'' अँड्री अत्यंत नम्रतेने म्हणाला. तो नताशाकडे गेला व नृत्यासाठी पाचारण करीतच त्याने आपला हात तिच्या कटिभागाभोवती घालण्यासाठी पुढे केला. वॉल्टझ् नृत्यात सहभागी होण्यासाठी त्याने केलेले पाचारण ऐकून नताशाचे सर्वांग थरारले. पुलकित झाले. तिने भरघोस स्मित करून आपला मूक रुकार त्याच्या नजरेस आणला. 'मी तर इतका वेळ तुझीच वाट पाहात होते की रे!' असेच जणू ती म्हणत होती.

अँड्री उत्तम नर्तक म्हणून नाणावलेला होता. नताशाही काही कमी कुशल नव्हती. पांढऱ्या मखमलीच्या जोड्यांतील तिची नाजूक पावले लयबद्ध पडत होती. तिचा चेहरा हर्षाने उमलला होता. प्रत्येक हालचालीबरोबर तिने लाविलेल्या उंची सेंटचा सुगंध अँड्रीच्या मस्तकात भिनत होता. नताशाची उघडी मान, हात, नाजूक होते. हेलेनचे सौंदर्य शेकडो डोळ्यांनी, हातांनी कलंकित झाले होते, तर नताशाच्या सौंदर्याचा तजेला निष्कलंक होता. तो आजच प्रकट होत होता; त्यामुळे असंख्य स्त्री-पुरुषांचे डोळे तिच्यावर खिळले होते.

अँड्री ह्या नृत्यप्रसंगाने कमालीचा सुखावला. नृत्यानंतर प्रत्येकजण त्याला राजकीय चर्चेच्या काथ्याकुटात गुंगविण्याचा प्रयत्न करीत होता, तर तो त्यातून सुटून, नताशाच्या सहवासात जाण्यासाठी धडपडत होता. तिच्या नाजूक लवचिक कमरेभोवती आपल्या हाताचा विळखा घालण्यासाठी उतावीळ होत होता. पूर्वीच्या सर्व स्मृती मागे पडून आपण फिरून नवजवान झाल्याची जाणीव त्याला झाली.

अँड्रीबरोबर केलेल्या नृत्याने नताशाला उन्माद आल्याप्रमाणे झाले. अनेकांच्या आमंत्रणांचा स्वीकार तिने केला. सर्व रात्रभर ती नृत्यात रंगून गेली होती. अँड्रीबरोबर फिरून तिने दुसऱ्यांदा नृत्य केले. अँड्रीने नृत्य करता करता तिला, चांदण्या रात्री सज्जात तिने केलेल्या भाषणाची जाणीव करून दिली. त्याने ते ऐकले होते हे समजताच नताशा लाजेने लालीलाल झाली.

ठराविक साचाच्या भपकेबाज समाजात रुळलेल्या प्रत्येकालाच काहीतरी नावीन्यपूर्ण सहवासाची, संगतीची तीव्र इच्छा होते आणि अँड्रीलाही ती झाली होती. नताशा ती पूर्ण करू शकत होती. तिच्यात तसे नावीन्य खास होते! 'ही पोरगी मोठी गोड आहे. सुंदर आहे!' अँड्री स्वत:शी म्हणत होता, 'मोठी दुर्मीळ चीज आहे ही!' रोस्टोव्ह कुटुंबाकडे त्याचे जाणे येणे वाढू लागले.

●●●

९.

नृत्याचा कार्यक्रम आटोपताच, म्हाताऱ्या काउंट रोस्टोव्हने, अँड्रीपाशी येऊन त्याला आपल्या घरास भेट देण्याची नम्रतापूर्वक विनंती केली. नंतर तो नताशाकडे वळून म्हणाला, ''काय ग पोरी, मजा आली ना कार्यक्रमाला?'' नताशाने उत्तर दिले नाही, पण अभिनय मात्र असा केला की जणू काही तिला म्हणायचे होते, 'हे काय विचारणं बाबा? इतका गोड कार्यक्रम माझ्या आयुष्यात ह्यापूर्वी कधीच झाला नव्हता!' अँड्री तिच्याकडे अनिमिष नेत्रांनी पाहात होता. म्हाताऱ्याचे आमंत्रण त्याने मोठ्या अगत्याने स्वीकारले.

दुसऱ्या दिवशी सकाळीच अँड्री रोस्टोव्ह कुटुंबीयांकडे आला आणि मग तो त्यांचा रोजचाच पाहुणा झाला. तो तेथे गेला नाही असा दिवसच मुळी उजाडेना आणि त्याचा हा कार्यक्रम कित्येक आठवडे चालू होता. तो सारखा का येतो हेही घरातील प्रत्येकाला माहीत होऊन चुकले होते. पण त्याबद्दल कोणीच काही बोलत मात्र नव्हते! एक दिवस सकाळी नताशाची आई तिला गंभीरपणाने म्हणाली, ''तुला

तो काय विचारीत होता गं?'' तिच्या प्रश्नाला उत्तर न देता उलट नताशाने प्रतिप्रश्न केला, ''तो विधुर असला म्हणून काय झालं ग आई?''

''कोण काय म्हणतंय्? लग्न ही सर्वस्वी दैवाधीन गोष्ट आहे. देवानेच ती आधी ठरवून ठेवलेली असते. ज्याच्या नशिबात जे असेल ते होते.''

''आई! आई!!'' नताशा गहिवरून म्हणाली व आईला बिलगली. आईला तिच्या भावना ओळखण्यास वेळ लागला नाही. एके दिवशी सायंकाळी आईकडे येऊन नताशा म्हणाली,

''आई, मला तुला काही सांगायचं आहे गं.''

''अँड्रीबद्दलच सांगणार असशील, होय ना?''

''होय आई! गुरुवार.... शुक्रवार.... शनिवार.... आज आता सोमवार उजाडला.... पाच दिवस झाले, तो एकदाही घरी आला नाही बघ!''

''धीर धर जरा! त्याच्याकडून रीतसर मागणी आल्याशिवाय गडबड करून चालणार नाही आपल्याला नताशा!'' मग तिला धीर देण्यासाठी ती पुढे म्हणाली, ''आज ना उद्या तो खास परत येईल!''

नताशाच्या आईचा अंदाज चूक नव्हता. नताशाला मागणी घालण्याची परवानगी घेण्यासाठी अँड्री पित्याकडे आपल्या गावी गेला होता. म्हातारा सहजासहजी ह्या सोयरिकीला परवानगी देण्यास तयार नव्हता. मुलाची सर्व बडबड शांतपणे ऐकून घेतल्यानंतर तो म्हणाला, ''तुझ्या विवाहाची ही कल्पना फारशी अभिनंदनीय नाही. दर्जा, संपत्ती, ह्या दृष्टिंनी रोस्टोव्ह मंडळी आपली बरोबरी करू शकत नाहीत. अद्यापि तुझी प्रकृती ठीक नाही आणि ती पोरगी पडली तरणीताठी! शिवाय त्या पोरीला तुझ्या लहान मुलाचं संगोपन करायचं कामही जमणार नाही. ह्या बाबतीत ती अननुभवीच असणार! अशा स्थितीत तुला आपला हा विचार एक वर्ष पुढे ढकलणं भाग आहे. काही काळ तू दूर जा. प्रकृती पूर्वीप्रमाणे धडधाकट होऊदे आणि ह्या काळात तुमचं प्रेम आजच्याप्रमाणेच अबाधित राहिलं तर एक वर्षाने तिच्याशी विवाह कर! ह्याउपर तुझी मर्जी!'' अँड्रीला आपल्या पित्याची पूर्ण कल्पना होती. एक वर्षपर्यंत हा विषय काढण्यात अर्थ नाही हे त्याला कळून चुकले. तो निराश मनाने पीटस्बर्गला परत आला.

अँड्रीने नताशाला मागणी घालतानाच, विवाह एक वर्ष लांबणीवर टाकणे भाग आहे ह्याची जाणीव दिली. सबंध एक वर्ष थांबण्याची त्याची ही सूचना स्वाभाविकपणे नताशाला खेदजनक वाटली. ती निराश झाली. दु:खीकष्टी झाली. पण शेवटी संयम करून म्हणाली, ''जीवनाचा केवढा तरी काल आपणापुढे आहे. त्यात एक वर्षाने काय मोठंसं होणार आहे?''

पण एक वर्षाची ही अपेक्षित मुदत संपण्यापूर्वीच फार मोठ्या घडामोडी व्हावयाच्या होत्या. अँड्रीला आघाडीवर, लष्करी कामगिरीवर जाणे भाग होते. शांततातह संपुष्टात येणार असल्याची चिन्हे दिसू लागली होती. रशियाने सैन्यभरती चालू केली होती. अँड्री नताशाचा निरोप घेण्यास आला तेव्हा तिला धक्काच बसला. तो जायला निघाला तेव्हा ती कळवळून म्हणाली, ''त्याला अडवा! त्याला जाऊ देऊ नका! काहीतरी विपरीत होईल अशी भीती वाटते मला!'' तिला शोकाकुल स्थितीत सोडून अँड्री चालता झाला.

१८१२च्या जूनमधील मनस्वी उष्म्याची एक सायंकाळ होती ती. व्हिलनाच्या प्रासादात झार अलेक्झांडर 'माझुरका' नृत्यात मशगुल झाला होता. इतक्यात त्याच्या सेनापतींपैकी एक सेनापती बॅलाशोव्ह तेथे येऊन थडकला. दिवाणखान्यातून तडक वाट काढीत तो झारकडे निघाला. वाटेत येणाऱ्या कोणालाही कस्पटाप्रमाणे दूर ढकलीत तो पुढे चालला होता. त्याचा हा बेदरकारपणा पाहून सारे दरबारी स्तिमित झाले होते. बॅलाशोव्ह त्यांच्याकडे दुर्लक्ष करून सरळ झारपाशी जाऊन पोचला. त्याने झारचा हात धरून त्याला त्याच्या नृत्यातील जोडीदारणीपासून विभक्त केले. त्याचा हा अजब खाक्या पाहून झारही विस्मयचकित झाला. पण त्याची मुद्रा पाहाताच मात्र तो चमकला व त्याच्याबरोबर एका बाजूला गेला.

थोड्याच वेळात बॅलाशोव्ह, झारचा खलिता घेऊन बाहेर पडताना सर्वांना दिसला. झारने नृत्याचा कार्यक्रम बंद केला व तोही घाईघाईने निघून गेला. रंगाचा बेरंग झाला.

बॅलाशोव्ह झारचा खलिता घेऊन नेपोलियनच्या छावणीत येऊन दाखल झाला. नेपोलियनने आपला जामानिमा नुकताच आटोपला होता. कपड्यांवर कोलनवॉटरचा यथास्थित मारा केला असल्याने त्याचा मंद सुगंध सर्वत्र दरवळला होता. त्याच्या विशाल कपाळावर काळ्याभोर केसांची एक बट रुळत होती. त्याचा फुगीर चेहरा व मान रोगट असल्याप्रमाणे पांढरी सफेद दिसत होती. त्याचा बांधा गिड्डा व मजबूत असून पोटाची ढेरी वाजवीपेक्षा मोठी दिसत होती. पण एकंदर रुबाब मात्र दुसऱ्याला दबवून टाकण्यास पुरेसा होता. बॅलाशोव्हने दिलेला लखोटा टरकावून त्याने झटकन् वाचून काढला. झारने लिहिले होते:

'मला कळते की मी माझ्या वतीने बादशहांना दिलेला शब्द तंतोतंत पाळला असूनही आपल्या सैनिकांनी रशियन सरहद्द ओलांडली आहे. बादशहांनी रशियन हद्दीतून जर सैन्य परत काढून घेतले, तर ह्या घटनेकडे मी उपेक्षेने पाहाण्यास तयार आहे व आपले संबंध पूर्वीप्रमाणे मैत्रीचे, स्नेहाचे ठेवण्यास तयार आहे. पण तसे न झाल्यास मात्र ह्या आक्रमणाचा प्रतिकार करणे मला भाग आहे. माझ्याकडून अशी कोणतीच आगळीक झालेली नाही हे मी आपल्या नजरेस आणीत आहे. दुसऱ्या युद्धाच्या भयानक परिणामांपासून मानवतेचे रक्षण करणे आता बादशहासलामतांच्या हाती राहील!

आपला
अलेक्झांडर'

''झारना म्हणावं मीही तुमच्याइतकाच शांततेचा पुरस्कर्ता आहे!'' झारच्या पत्राला उद्देशून तो ताडकन् तोडल्याप्रमाणे बॅलाशोव्हला म्हणाला, ''ती मिळविण्यासाठी माझ्याकडून होईल तितका प्रयत्न करण्यास माझी ना नाही म्हणावं. त्या प्रयत्नांत माझी कसूर नाही ह्याची जाणीव आहे का तुमच्या बादशहांना?'' तो एकदम येरझारा घालू लागला. खवळलेला नेपोलियन आपल्या रागाला बांध घालण्याच्या प्रयत्नांत आहे, ह्याची जाणीव बॅलाशोव्हला झाली.

''असल्या ह्या मागण्या बेडनच्या राजपुत्राकडे करा म्हणावं त्यांना! मला त्यांचा काय उपयोग?'' नेपोलियन तडकू लागला. ''मी लढाई चालू केली म्हणे! छाऽ! त्यांच्या सैन्याला जाऊन कोण मिळाले? इंग्लंडशी चुंबाचुंबी कोणी केली? मी? छान्!'' तो तिरस्काराने हसला. आपल्या पांढऱ्या जाकिटाच्या खिशातून त्याने तपकिरीची डबी बाहेर काढली व एक भक्कम चिमूट नाकाला लावीत तो ओरडला, ''तुमच्याकडे लाख दोन लाख तरी सैनिक आहेत का?'' तुच्छतेने कठोरपणाने तो गर्जू लागला, आज माझी फौज सहा लाखाच्या घरात आहे! तरीही मी तुम्हाला वचन देतो....'' फ्रान्सखेरीज इतरत्र आपल्या वचनावर कोणाचा विश्वास नाही, ही गोष्ट तो साफ साफ विसरून गेला होता. पण त्याचे ते वचन तेवढ्यावरच राहिले. ते उच्चारले गेले नाही. भडकलेला नेपोलियन हातवारे करीत होता. ''तुम्हाला मी डिव्हा नदीपार, नीपर नदीपार, ढकलून दिल्याशिवाय थांबणार नाही!'' तो गरजला. त्याचा पांढरा चेहरा लाल दिसू लागला. ''माझ्याशी वैर मांडून, माझ्या शत्रूशी हातमिळवणी करणारांना धडा दिल्याशिवाय गत्यंतर नाही मला!'' त्याने तपकिरीची डबी रागारागाने परत जाकिटाच्या खिशात कोंबली. तो लांब लांब टांगा टाकीत खवळलेल्या श्वापदाप्रमाणे तंबूत फिरू लागला. त्याचे भक्कम खांदे क्रोधाने थरथरू लागले. ''आपले बादशहा नि त्यांचा कारभार ही मोठी अजब चीज आहे!'' तो बॅलाशोव्हकडे पाहात म्हणाला.

बॅलाशोव्ह परत निघाला तेव्हा त्याच्या लक्षात आले की नेपोलियनचे डावे कानशील स्फुरण पावत होते. नेपोलियनलाही त्याची जाणीव झाली असावी. त्याचा तो शुभशकुन होता! विजयाची नांदी होती.

युद्धाला तोंड लागले.

अँड्री निघून गेल्यानंतर नताशाला काही काळ चुकल्या चुकल्यागत झाले, पण पुढे पुढे ती नित्यक्रमात रमू लागली. आज रात्री ती एका संगीत नाट्यप्रयोगाला हजर होती. हेलेनही आपल्या उडाणटप्पू भावाबरोबर - अँतोनबरोबर - नाटकाला आली होती. नताशा दृष्टीस पडताच बंधुराजांनी बहिणीला खुणावले. तज्ज्ञ बहिणीनेही भावाच्या खुणेचा अर्थ बरोबर जाणला. नताशाच्या सौंदर्याने स्वारी

पागल बनली आहे हे तिच्या लक्षात येण्यास मुळीच वेळ लागला नाही. हेलेनच्या शेजारीच असलेल्या खास राखीव जागेत ती बसली होती. अँड्रीशी तिचा वाङ्.निश्चय झाला आहे, पण तो पोलंडमध्ये लष्करी कामगिरीवर असल्याने हा विवाह लांबला आहे ह्याची जाणीव हेलेनला होती. पण प्रत्येक दुर्वर्तनी स्त्रीला सर्वांनी आपल्याच माळेत बसावे ही भावना असते. हेलेनने नताशाला आपल्या जाळ्यात खेचण्याचा प्रयत्न करणे त्या दृष्टीने स्वाभाविकच होते.

तिचा परिचय करून घेण्याच्या निमित्ताने हेलेनने तिला आपल्या खास जागी येण्यास पाचारण केले. ती भाबडी पोरही तिच्या आमंत्रणास मान द्यायचा म्हणून तेथे आली आणि थोड्याच वेळात अगदी सहज आल्याप्रमाणे अँतोनही तेथे येऊन दाखल झाला. एक खुर्ची ओढून नताशाजवळ बसला. अँतोनची सलगी व धिटाईची वागणूक पाहून ती चांगलीच गोंधळात पडली. आपल्या रुबाबाची छाप नताशावर पाडण्यासाठी तो जाणून बुजून तिच्याशी सलगी करीत होता. प्रथम बहिणीशी बोलण्याचे नाटक करून त्याने आता सर्व लक्ष नताशावर केंद्रित केले होते. नताशाला काहीतरी बोलणे भागच होते म्हणून ती म्हणाली, ''आपल्याला कसा काय आवडला प्रयोग आतापर्यंत?'' ''मी रंगभूमीकडे पाह्यलं असलं तर ना? आपण शेजारी असताना रंगभूमीकडे पाह्यचा अरसिकपणा कोण करील?'' तो मधुर स्मित करीत म्हणाला. ''आपण हेलेनकडे आलं पाहिजे हं एकदा!'' नताशा अस्वस्थ झाली. अँड्रीबरोबर नृत्य करतानाही जो अस्वस्थपणा तिला जाणवला नाही, तो ह्या पागल माणसाच्या सहवासात तिला जाणवू लागला.

●●●

## १०.

काही दिवसांनी हेलेन रोस्टोव्ह कुटुंबात आली व तिने सर्वांना आपल्या घरी मेजवानीस येण्याचे आमंत्रण दिले. हेलेनने अगत्याचे एवढे मोठे प्रदर्शन केले की तिला नकार देणे अशक्यच झाले रोस्टोव्ह कुटुंबियांना.

मेजवानी आटोपल्यानंतर, नताशाला एकीकडे गाठण्याची संधी हेलेनने गमावली नाही. ती हळूच तिच्या कानात म्हणाली, ''तुझ्या प्रेमाने माझा भाऊ अक्षरश: वेडा झाला आहे पोरी! तुझ्यासाठी सुस्कारे सोडण्यातच बिचाऱ्याचा सारा दिवस खर्च होतो आहे. त्याला तारणं अगर मारणं तुझ्या हाती आहे आता!''

काही वेळाने नताशाला अँतोनने एका बाजूला गाठले. दिवसभर तो आपल्या प्रेमाची खात्री पटवून देण्याची एकही संधी गमावीत नव्हता. आता तर त्याला अनुकूल संधी मिळाली होती. नताशा त्याच्या लांगूलचालनामुळे त्याच्या आहारी थोडीफार गेली होतीच. पण मन खात असल्याने ती भीतीग्रस्त होती. अँतोनला आता पुरेसा एकांत मिळाला होता. त्याने तिला आपल्या करपाशात बद्ध करून तिचे प्रगाढ चुंबन घेतले. नताशा अगतिकपणे त्याच्या आहारी गेली. तिची सारासार विचारशक्ती पार लुप्त झाली. तिच्यावर तारुण्यसुलभ विकारांचा पगडा बसण्यास एवढी घटना पुरेशी ठरली.

हेलेनच्या मेजवानीनंतर काही दिवसांनी, सोनियाने एकदा नताशाच्या खोलीत प्रवेश केला. नताशा गाढ झोपी गेली होती व तिच्या शेजारीच पत्राची एक घडी पडलेली दिसत होती. क्षणभर सोनियाच्या मनाची चलबिचल झाली. पण शेवटी तिने ते पत्र घेऊन वाचलेच.

'प्रिय नताशा,

तुझ्या प्रेमाला पात्र ठरणे अगर मरणे एवढेच आता माझ्या नशिबात आहे. तुझे आईवडील तुला, मला देण्यास नाखूश असणार ह्याची मला स्पष्ट कल्पना आहे. पण तुझे माझ्यावर खरोखरच प्रेम असले तर तू फक्त 'होय' म्हण. मग जगातील कोणतीही मानवी शक्ती मला थांबवू शकणार नाही!

तुझा<br>अँतोन'

पत्र वाचताच सोनियाला जबरदस्त धक्का बसला. दिङ्मूढ झाल्याप्रमाणे काही काळ नताशाकडे पाहात ती स्तब्ध उभी होती. मग तिने तिला जागे केले. झोपेच्या गुंगीतच नताशाने विचारले, ''अं ऽअँ ऽ कोण सोनिया, केव्हा आलीस गं?'' सोनियाच्या मुद्रेवरील भाव पाहाताच मात्र ती एकदम चमकली. ''पत्र वाचलंस वाटतं तू? ठीक आहे. नाही तरी मी तुला सांगणारच होते एक दिवस सारं! नाही तरी मी हे तुझ्यापासून फार दिवस चोरून ठेवू शकलेच नसते ग!'' तिची ही बडबड ऐकून सोनियाचा आपल्या कानावर विश्वास बसेना. तिच्या ह्या अतिरेकी वागण्याचा उलगडाच होईना तिला. तिने विचारले, ''अँतोनच्या अशी कितीशी सहवासात आलीत तू नताशा? आणि अँड्रीशी तू वचनबद्ध झाली आहेस त्याचं काय? नताशा, असला मूर्खपणा मी तुला करू देणार नाही!'' सोनिया निश्चयी स्वरात म्हणाली, ''मी हे सर्व पेरीच्या कानावर घालणार!''

''नको! नको! सोनिया, तसं काही करू नको! मी अँतोनशिवाय जगू शकणार नाही!'' नताशा केविलवाण्या स्वरात म्हणाली.

''तू स्वत:चा नाश करून घ्यायला निघाली आहेस पण मला ते चालू देता येणार नाही!'' रागारागाने सोनिया म्हणाली व तेथून निघून गेली.

मध्यंतरी, दोलकोव्हच्या मदतीने नताशाला पळवून नेऊन तिच्याशी लुटुपुटीचा विवाह घडवून आणण्याच्या कारस्थानात अँतोन गुंतला होता. ह्यासाठी बहिणीकडून पुरेसा पैसाही त्याने गोळा केला होता. इतर जुळणी भरपूर पैसा घेऊन दोलकोव्हने करून दिली होती. द्वंद्वाच्या प्रसंगात प्राणांवर आलेले शेपटावरच निभावले असल्याने, असले नसते उद्योग करण्यास तो रिकामा होता. हेलेनच्या भावाला मदत करणे आपले पवित्र कर्तव्य आहे अशी त्याची धारणा होती.

एके दिवशी रात्री अँतोन दोलकोव्हच्या मकाणावर आला. नताशाला पळवून नेण्याच्या कार्यक्रमाची सर्व जुळणी करून तो आला होता. रात्री सव्वादहाला रोस्टोव्ह प्रासादाच्या मागील बाजूला जाऊन उभे राहाताच व खुणेची शीळ घालताच नताशा मुकाट्याने येऊन त्याला भेटणार होती. तिला घेऊन तो पुढे पळ काढणार होता. पोलंडच्या दिशेने निघून जाणार होता. त्याने आवश्यक ती सर्व सिद्धता केली होती व ती करण्यासाठी पाण्यासारखा पैसाही खर्च केला होता. वाटेतच एका खेड्यात तो लग्नाचे नाटक उरकणार होता.

सुहास्य मुद्रेने दोलकोव्हने त्याचे स्वागत केले व तो आत येताच खोलीचे दार लावून घेतले.

''सर्व तयारी झाली! आज रात्री ही छोकरी मी उडविणार!'' तो मुर्दाडपणाने दात काढीत म्हणाला.

''पाहा गड्या, पण मला तरी तू हा अतिरेकी बेत सोडावास असं वाटतं.''

''मूर्ख आहेस झालं! बेत सोडावा म्हणे!''

''माझं आपलं सांगणं आहे. ऐकणं न ऐकणं तुझं काम!''

''तुझा फालतू उपदेश ऐकायला मला सवड नाही आणि मी त्यासाठी आलोही नाही. तुला आजच ही उपरती का झाली रे? कुणाचं तोंड बंद करायचं राहिलं आहे का? त्यासाठी तुला काही पैसे हवे आहेत का? सांग ना, मी ते मोजायला तयार आहे.''

''ह्या पोरीचे आईबाप सामान्य माणसं नाहीत! हा प्रकार ते मुकाट्याने सहन करणार नाहीत. आख्खा रशिया पालथा घालून तुला ते खेचून आणतील. तुरुंगात डांबतील. अँतोन, तू विवाहित आहेस. तू घटस्फोट घेतलेला नाहीस. अशा स्थितीत दुसरं लग्न करणं गुन्हा आहे, ह्याची जाणीव तुला आहे ना?'' दोलकोव्ह चिडक्या आवाजात म्हणाला.

''ह्या छोकरीबरोबर एखादा आठवडा काढायला मिळाल्यानंतर मी तुरुंगात काय, पण मसणात जायलाही तयार आहे!'' निर्लज्जपणाने दात विचकीत अँतोन म्हणाला.

रात्र झाली. अँतोनने ठरविलेला व नेहमीच त्याच्या साहसी दुष्कृत्यात सामील असलेला गाडीवाला बलागा तेथे आला.

''ये ये बलागा, वेळेवर आलास. जनावरं चांगली आणली आहेस ना?''

''चांगली? एका दमात साठ मैलांची झडप मारतील साहेब!''

''तीन तासांत पल्ला गाठला गेला पाहिजे बलागा!''

''ठीक आहे साहेब, पण आता निघायचंच ना?''

अँतोन शेजारच्या खोलीत जाऊन जामानिमा उरकून बाहेर आला. सर्वांनी मद्याचे प्याले उंचावले व अँतोनचे अभीष्टचिंतन करून ते रिकामे केले.

''अच्छा दोस्त, नमस्ते! नमस्ते!!'' अँतोन उल्हासाने म्हणाला.

''काय रे, जादा ऊबदार पांघरूण घेतलं आहेस का एखादं?''

''कशाला?''

''वा रे शहाण्या! ती पोरगी घाईघाईने बाहेर येईल आणि थंडी वाजते म्हणून कोट आणण्यासाठी परत फिरेल! ही चिमणी पाखरं लांबविताना ती उबेत ठेवायची दक्षता घ्यावी लागते. हिचा कोट घेऊन जा बरोबर. तिला उचलताना मला त्याचा चांगला उपयोग झाला होता.'' दोलकोव्हने अनुभवाचे शास्त्र सांगितले. जिप्सी कळपातली एक छोकरी त्याने नुकतीच आणली होती.

रोस्टोव्ह प्रासादापर्यंत अँतोनची सोबत करण्यासाठी दोलकोव्हही त्याच्याबरोबर जाण्यास निघाला.

''तय्यार?'' बलागाने गाडी हाकण्याच्या तयारीने विचारले.

''हाँ ऽ चलो!''

गाडी दौडत निघाली व हां हां म्हणता रोस्टोव्ह प्रासादाच्या पिछाडीस येऊन थडकली. अंधार भयाण होता. चाबकाच्या फटकाऱ्यांप्रमाणे गार वारा अंगाला झोंबत होता. पावसाची रिप् रिप् अधून मधून चालू होती. अँतोनला वाटले, वेळ तर अनुकूल आहे. तो व दोलकोव्ह गाडीतून उतरून प्रासादाच्या मागील दारापाशी आले. अँतोनने हळुवार शीळ घातली. तिला प्रतिसाद येऊन हळूच दार उघडले गेले. बाहेर आलेली दासी हलक्या आवाजात म्हणाली, ''आत अंगणात या... बाईसाहेब एकदोन मिनिटात येत आहेत.'' उल्लू अँतोन दोलकोव्हला दारापाशी उभा करून घाईने आत शिरला.

''यावं, यावं सरकार!'' एका गलेलठ्ठ हुजऱ्याने त्याची मानगूट पकडून म्हटले.

इतक्यात कोठूनतरी अचानक आलेला पहारेवाला दोलकोव्हला झोंबला. ह्या अचानक हल्ल्याने बावरलेला दोलकोव्ह हळूच ओरडला, ''अँतोन, घात झालेला दिसतो, पळ!'' तो पहारेवाल्याशी झुंज घेऊ लागला. ह्या प्रकाराची, गोंगाट होऊन वाच्यता होऊ नये म्हणून उभय पक्षांनी दक्षता घेतल्याचे दिसत होते. दहापाच लाथा व टपला खाऊन अँतोन व दोलकोव्ह निसटून जीव घेऊन पळत सुटले व कडमडत गाडीत चढले.

''झालं काम साहेब?'' हातापायाची जुडी करून पुढील पेटीवर बसलेल्या बलागाने विचारले.

''हाण गाडी घराकडे!''

''म्हणजे?''

''फाजील चौकशा करायचं काम नाही'' अँतोन चिडून ओरडला. बलागाने गाडी परत वळवून आल्या दिशेने पिटाळली.

ह्या प्रकारानंतर पेरी व सोनियाने नताशाची समजूत काढण्याचा खूप प्रयत्न केला पण त्यात त्यांना यश आले नाही. ती मानसिक धक्क्याने अंथरुणाला खिळून गेली. आपली मुलगी एकाएकी का आजारी पडली हे म्हाताऱ्या काउंटला व त्याच्या पत्नीला मुळीच समजले नाही. पण अँड्रीपासून मात्र ही गोष्ट गुप्त राहू शकली नाही. त्याला ती कळून चुकली. अँतोनशी विवाह होणार ह्या भ्रमात नताशाने त्याच्या बहिणीला- मेरीला- सर्व हकीकत लिहून कळविली होती. अँड्रीला वचनमुक्त केल्याची कबुलीही ती देऊन चुकली होती. स्वाभाविक मेरीने ही वार्ता अँड्रीला कळविली. अँतोनही स्वस्थ नव्हताच! सर्व मॉस्कोत नताशाच्या पलायनाची वार्ता चर्चिली जात होती. पेरीच्या शब्दावर विश्वास ठेवण्यास कोणीच तयार नव्हते. अँतोनच्या बंदोबस्ताशिवाय हे प्रकरण थंडावणार नाही हे पेरीला कळून चुकले. तो त्याला शोधू लागला. त्याने खूप तपास केला पण त्याचा ठावठिकाणा त्याला मिळाला नाही.

अँतोन दोलकोव्हच्या मकाणात दडून, झाल्या प्रकाराचा वचपा कसा काढावा ह्याचा विचार करण्यात गढला होता. एक दिवस बहिणीचा सल्ला घ्यावा म्हणून तो चोरून तिच्याकडे आला आणि नेमका त्याचवेळी तेथे थडकलेल्या पेरीच्या दृष्टीस पडला. ''ओहो ऽ हो! काउंट पेरी!'' म्हणत हेलेन पुढे आली. (पेरी क्वचित प्रासादात येई. हेलेनच्या दिमतीस त्याने तो दिला होता.) पण पेरीची

मुद्रा पाहाताच थबकली. पेरी सरळ अँतोनपुढे जाऊन उभा राहिला व त्याला म्हणाला, ''तू जिथे जिथे जाशील, तिथे तिथे दुष्कृत्य, कारस्थानं असणारच! मला तुझ्याशी काही बोलायचं आहे, चल माझ्याबरोबर!'' अँतोनने एकदा बहिणीकडे पाहिले, पण पेरीचा अवतार पाहून तो मुकाट्याने त्याच्या पाठोपाठ चालू लागला. पेरीने त्याला एका खोलीत नेऊन दार बंद करून घेतले.

''नताशाला तू लग्नाचं वचन दिलं होतंस? तिला पळवून नेण्याचा प्रयत्न तू केलास?'' पेरीने त्याला खडसावून विचारले.

''प्रिय महाशय, आपल्या ह्या प्रश्नांची उत्तरं द्यायला मी बांधलेला आहे असं मला वाटत नाही!'' उसन्या अवसानाने अँतोन कुर्ऱ्यात म्हणाला. पेरी भडकला. त्याने अँतोनची कॉलर पकडून त्याला खसकन् आपल्याकडे ओढले. त्या हिसक्याने त्याचे कपडे फाटून त्याच्या गुंड्या लोंबू लागल्या. ह्या धसक्याने तो चांगलाच हादरला. दोनचार गचांड्या बसताच त्याचे पाणी पाणी झाले. ''मला माझ्या प्रश्नांची उत्तरं हवी आहेत!'' पेरीने त्याला सुनावले, ''तू हरामखोर आहेस! हलकट आहेस!! ह्या पेपरवेटने तुझं टाळकं फोडून तुझा सडका मेंदू बाहेर काढायला मी मागेपुढे पाहाणार नाही.'' असे म्हणत पेरीने टेबलावरील जाडजूड पेपरवेट हाती घेतले. ''बोल, तू तिला लग्नाचं वचन दिलं होतंस की नाही?''

''न्ऽन्ऽनाही, मी तसं वचन कधीच दिलं नाही.''

अँतोनची जीभ वळवळू लागली.

''तिची काही पत्र तुझ्याकडे आहेत की नाही?'' असे म्हणून पेरी त्याच्यावर चाल करून आला. अँतोन हिरवा पिवळा झाला. त्याने गडबडीने खिशात हात घालून काही पत्रे बाहेर काढली व पेरीपुढे टाकली. पेरीने ती उचलून ताब्यात घेतली. ''उद्यापासून तू मॉस्कोत दिसता कामा नयेस!'' पेरीने दम दिला. ''नाही! नाही!! जाऊ मी?'' अँतोन गडबडीने म्हणाला. ''- आणि हे पाहा, झाल्या प्रकारातील एक शब्द कुठे बोललास तर जीभ हासडून काढीन तुझी! तुझ्या वैयक्तिक सुखासाठी, दुसऱ्यांच्या जीवनाची होळी करायला दिक्कत वाटणार नाही तुला! स्वार्थी अवलाद! तुला मौजच हवी असेल ती तुझ्या बहिणीच्या - माझ्या एक वेळच्या बायकोच्या - जातीच्या स्त्रिया तुला हव्या तेवढ्या भेटतील ह्या दुनियेत. तुझ्यासारख्या हलकटाशी सामना द्यायला लागणारी साधनं, हत्यारं, पात्यारं त्यांच्यापाशी भरपूर असतात! त्यांना अनीतीच्या खाणाखुणा माहीत असतात!'' पेरीच्या ह्या दणक्याने अँतोन घाबरा घुबरा झाला. सुटकेसाठी चुळबुळ करू लागला.

''भागूबाई! भिऊ नकोस! हे पैसे घे आणि फिरून इथे यायच्या भरीस पडू नकोस! मॉस्कोतून काळं कर!''

पेरीने देऊ केलेल्या पैशांवर अँतोनने झडप घातली व जीव घेऊन पळ काढला.

●●●

११.

बोलन्स्की मंडळी अँड्रीच्या आगमनाची वाट पाहात होती. नताशाच्या अँतोनशी आलेल्या प्रेमसंबंधाचा इतका गवगवा झाला असता, खुद्द नताशाची लेखी कबुली मेरीकडे आली असता, अँड्रीच्या सोयरिकीचा प्रश्न संपला असे सर्वांनी गृहीत धरले होते. अँड्री येताच ह्या सर्व प्रकरणावर कायमचा पडदा टाकण्याच्या तयारीने, सर्वजण-विशेषत: म्हातारा काउंट मुलाची वाट पाहात होता.

पेरीही अँड्रीला भेटण्यास उत्सुक होता. नताशाचा बालिशपणा प्रामुख्याने ह्या घटनेला कारणीभूत झाला असल्याने, अँड्रीला तिचा निर्दोषपणा पटेल व ह्या घटनेला फाजील महत्त्व न देता तो नताशाला पूर्वीच्याच चांगुलपणाने वागवील अशी त्याची भावना होती. आपल्याला उदारमतवादाचा उपदेश करून हेलेनला क्षमा करण्याचा सल्ला देणारा अँड्री ह्या प्रकरणी मनाचा मोठेपणा खास दाखवील अशी त्याची भावना होती. दोनचार वेळा त्याने अँड्रीच्या घरी जाऊन तपास केला, पण तो आला नसल्याने

दर खेपेस त्याला अँड्रीची चिठी मिळाली. त्याने लिहिले होते, ''मी आलो आहे व तुला भेटण्याची इच्छा आहे.'' पेरी मोठ्या उल्हासाने अँड्रीकडे जावयास निघाला. प्रेमभंगामुळे तो व्याकूळ झाला असेल ह्या कल्पनेत तो होता. दारात भेटलेल्या मेरीला त्याने विचारले,

''काय म्हणतो अँड्री?''

''ठीक आहे!''

''ह्या मधल्या घटनेमुळे तो निराश झाला नाही ना?''

''तो मोठा अभिमानी आहे. त्याला काही वाटलं असल्यास तो ते प्रकट करणं शक्यच नाही! सध्या तरी तो मोठ्या खुशीत असल्याप्रमाणे वागत आहे.'' मेरीचे भाषण ऐकून पेरी मनातून निराश झाला. नताशासाठी वकिली केल्यास तिला कितपत यश येऊ शकेल ह्याबद्दल तो साशंक झाला. म्हातारा बोलन्स्की ह्या घटनेमुळे खूश असणार ह्याची जाणीव त्याला होती; कारण प्रथमपासूनच तो ह्या संबंधाच्या विरुद्ध होता. त्याच्याकडून मिटते घेतले जाण्याची सुतराम शक्यता नव्हती.

तो अँड्रीकडे आला तेव्हा अँड्री पोलंडमधील घडामोडींची, भेटावयास आलेल्या लोकांशी चर्चा करण्यात रंगला होता. पेरीशी बोलतानाही अवांतर गप्पा मारण्याचाच त्याचा कल दिसू लागला. मनोव्यथा, निराशा दडविण्याची त्याची ही एक धडपड असावी असा पेरीला वारंवार संशय येत होता.

नंतर त्याने पेरीला आपल्या खोलीत नेले व त्याच्या हाती नताशाचे मेरीला आलेले पत्र दिले. ''नताशाकडून मला नकार आला आहे! एवढंच नव्हे, तर तिचा तुझ्या मेव्हण्याशी प्रेमसंबंध जमला असल्याची वार्ता आहे. हे सर्व खरं ना?'' त्याने सकंप आवाजात विचारले.

''हे खरं आहे..... पण तितकंच खोटंही आहे!''

''तिची आणि तुझी भेट झाल्यास, हा फोटो व तिची ही पत्रं तिला परत दे!'' पेरीने पुरा खुलासा करण्यापूर्वीच अँड्री म्हणाला व त्याने त्या वस्तू पेरीच्या हातात कोंबल्या.

''ती फार आजारी आहे सध्या!''

''मला फार वाईट वाटतं तिच्या आजाराबद्दल!'' अँड्री कठोर हास्य करून म्हणाला.

''अँतोन विवाहित आहे, त्याला नताशाशी विवाह करणं कसं शक्य आहे?''

''तो त्यांचा प्रश्न आहे, पण तिला म्हणावं, मी तुला वचनमुक्त केलं आहे. आता काहीही करायला तिची ती मुखत्यार आहे. तिला सुख लाभावं अशीच इच्छा करीन मी. तुझा मेव्हणा सध्या कुठे आहे?''

''तो परागंदा आहे! अँड्री, तू मला केलेला उपदेश आठवतो का?''

''कसला उपदेश?''

''उदारमतवादाचा!''

''आठवतो ना! पतित स्त्रियांना सहानुभूतीने वागवावं असं मी तुला सांगितलं होतं, पण मी तसं करीन असं कधीच म्हटलं नव्हतं मी पेरी! तुझी वकिली व्यर्थ आहे; मला हे जमणार नाही.''

''पण! पण!''

''तुझं म्हणणं काय? आभाळाएवढं विशाल अंत:करण करून मी तिला फिरून मागणी घालावी, प्रेमयाचना करावी, हेच ना? तिने दिलेला नकार विसरावा, केलेला विश्वासघात उपेक्षावा! एवढा महात्मा व्हायची माझी लायकी नाही, ती मिळवायचीही इच्छा मला नाही! पेरी, तुझे माझे प्रेमसंबंध, स्नेहसंबंध अबाधित राहावे अशी इच्छा असेल तर तू ह्याबाबत न बोलणं चांगलं!'' अँड्री तोडून बोलला.

पेरी निराश झाला व पुढे तेथे असेपर्यंत अबोलपणानेच वावरला. सायंकाळी नेहमीप्रमाणे तो रोस्टोव्ह कुटुंबात आला व नताशापाशी जाऊन म्हणाला, ''नताशा, त्या दुष्ट माणसावर तुझं खरं खुरं प्रेम आहे?''

''त्याला दुष्ट का म्हणता? ... मला ठाऊक नाही .... मला माहीत नाही.'' असंबद्धपणाने व साश्रूनयनांनी ती म्हणाली.

''विवाहित असताना ही गोष्ट लपवून ठेवून त्याने तुला झुलवलं म्हणून मी त्याला दुष्ट म्हणातो नताशा! त्याचं प्रेम नुसतं ढोंग!''

''खोटं, साफ खोटं!'' ती ओरडली. पण पेरीच्या उद्गारात खोटे असणार नाही ह्याची जाणीव होताच ती एकदम विकलगात्र होऊन स्फुंदून स्फुंदून रडू लागली. पेरीचे हृदय अनुकंपेने भरून आले. तो म्हणाला, ''पोरी, कधी

काळी तुला काही सांगावं-बोलावंसं वाटलं तर मला तुझा मित्र समजून नि:संकोचपणाने सांगत जा हं!'' पेरी प्रेमभराने तिच्या हाताचे चुंबन घेऊन म्हणाला.

''मी ह्या सहानुभूतीला पात्र नाही!''

''चूप, असं बोलू नकोस. अज्ञान आणि ढोंग ह्यातील फरक कुणाला कळो वा न कळो, मला तो कळतो, नताशा!''

''आता सर्वच संपलं आहे!'' ती निराशेने, दु:खाने म्हणाली व रडू लागली. आतापर्यंतच्या आयुष्यात ती प्रथमच रडत होती.

''पोरी, मी जरा जरी रूपसंपन्न असतो, धीट असतो, पात्र असतो तर तुझ्यापुढे गुडघे टेकून याचना करायला मी कमी केलं नसतं!'' पेरी एकदम म्हणाला व झटकन् उठून चालता झाला.

१८१२ च्या जून महिन्यात नेपोलियनने रशियन सरहद्द ओलांडली. झारच्या पत्राला त्याने कवडीचीही किंमत दिली नाही. पूर्व व पश्चिम युरोपमधील भयंकर रणकंदनाला तोंड लागले. नेपोलियन म्हणाला, ''इंग्रजांच्या, इंग्रजांच्या कारस्थानामुळे युद्ध सुरू झालं!'' इंग्रज म्हणाले, ''नेपोलियनच्या राक्षसी महत्त्वकांक्षेमुळे युद्ध सुरू झालं!'' झार म्हणाला, ''नेपोलियनने निष्कारण चढाई केल्यामुळं युद्ध करणं भाग पडलं!'' नेपोलियन म्हणाला, ''झारने आपल्याविरुद्ध कारस्थानं करून आपल्याला युद्ध करणं भाग पाडलं.'' कोणी म्हटले, ''ओडेनबर्गच्या ड्यूकमुळे युद्ध झालं.'' तर अनेकांनी मुत्सद्द्यांच्या मूर्खपणाला दोष दिला. काहीही असो, खून, मारामाऱ्या, लुटालूट, जाळपोळ एकूण एक साऱ्या गुन्ह्यांना राजरोस मुभा मिळाली एवढे खरे! युद्ध म्हणजे हे सर्व गुन्हे राजरोस करण्याचा परवाना! आणि हे करणारांची थोरवी, मानसन्मान! इतिहाससंशोधक, डोकी चालवून काहीही संशोधन करोत, आपापल्या सोईने निर्णय करोत, पण सामान्य माणूस ह्या प्रकरणी भरडला गेला, अगतिक बनून दैवाधीन झाला ही गोष्ट खरी! मानव दास बनला. त्याचे रक्त सांडणे न सांडणे हे त्याच्या हातात राहिलेच नाही! ते बड्यांच्या हाती गेले आणि त्यांनी ते सांडण्याचा निर्णय केला, ही वस्तुस्थिती!

झाडावरून फळ पडले. गुरूत्वाकर्षणाने पडले? वाऱ्याने पडले? देठ सुकल्याने आपोआप गळाले? कोणा व्रात्य पोराने दगड मारल्याने पडले? की ह्यांपैकी सारेच थोडे थोडे घडल्याने पडले? हा सारा काथ्याकूट नंतरचा आहे. अंतिम सत्य त्यातून प्रकट होणार कसे? आणि प्रत्येकजण आपलेच सत्य म्हणू लागला तर संपलेच! युद्धाचे तेच आहे. युद्ध सुरू झाले हे खरे! का आणि कसे ह्याची चर्चा करून काय उपयोग?

इतिहासाच्या धाग्यादोऱ्यांनी बांधलेली माणसे ह्या प्रवाहात खेचली जातात. ही अटळ घटनाच आहे. नावाला कोणी तरी पुढे असतात, पण त्या प्रचंड मानव समाजाला गतिमान् करण्याचे कार्य हे एकटे दुकटे काय करतात? समाज संघर्षापासून अलिप्त राहातो म्हणाला तर ह्यांचे काय चालणार?

निमेन नदी ओलांडून हां हां म्हणता फ्रेंच सैनिकांचा लोंढा रशियन प्रदेश व्यापू लागला. नेपोलियन जातीने सैनिकांच्या हालचालींचे निरीक्षण करीत असल्याने फ्रेंच सैनिकांना अमर्याद उत्साह वाटत होता.

झार अद्यापि व्हिल्नामध्ये राहून महिने न् महिने आपल्या अधिकाऱ्यांशी युद्धयोजनांच्या वाटाघाटी करीत होता. सैन्यांच्या हालचाली पाहात होता. नेपोलियनला थोपविण्याच्या अनेक योजना आखीत होता, सोडीत होता. लढाईची अशी तयारी प्रथमपासूनच नसल्याने 'श्रीगणेशा' पासून सारी सुरुवात होती. त्याचा मुक्काम व्हिल्नात वाढत होता. पण प्रत्यक्ष युद्ध हाताळण्याच्या दृष्टीने काहीच निर्माण होत नव्हते. त्याच्या भोवती जमलेले टोळके युद्धापेक्षा त्याला ख्यालीखुशालीतच जास्त रमवीत होते.

अँड्रीने फिरून सेनापती कुझोव्हच्या हाताखाली नेमणूक करून घेतली. आघाडीवर असताना कोठे ना कोठे अँतोनची गाठ पडावी अशी त्याची मनापासून इच्छा होती. आपल्या प्रेयसीला फसविल्याबद्दल सूडाचा विचार त्याच्या मनात घर करून राहिला होता. ह्याचा अर्थच असा की नताशाबद्दलची प्रेमभावना त्याच्या मनातून उखडली गेली नव्हती. ती नुसती दबली होती, त्याने दबविली होती. अँतोन युद्धात सामील होऊन आघाडीवर गेला आहे, हे त्याला माहीत होते, पण तो नक्की

कोणत्या विभागात आहे हे कळण्यास काहीच मार्ग नव्हता. कुझोव्हबरोबर त्याने तुर्की सरहद्दीला भेट दिली. तो आघाडीवर वावरत होता. दक्षतेने आपली कामे पार पाडीत होता. पण अँतोनचा विचार मात्र काही केल्या त्याच्या डोक्यातून जात नव्हता. आपणास युरोपियन आघाडीवर पाठविण्याची त्याने कुझोव्हला विनंती केली व त्यानेही ती तत्काळ मानली.

अँड्री तिकडे जाण्यास निघाला, पण जाता जाता थोडी आडवाट करून तो आपल्या घरी आला. पण घरचे सर्वच वातावरण बदलल्याचे, उदासवाणे झाल्याचे त्याला दिसून आले. त्याचा बाप एखाद्या पाहुण्याशी वागावे तसा त्याच्याशी वागलाच, पण मेरीबद्दलही कुरकुरला. बहीण मेरी प्रेमाने बोलली, पण तिनेही फार मोठा जिव्हाळा दाखविला नाही. नाही म्हणायला आपल्या मुलाला पाहून मात्र त्याला जरा बरे वाटले. तो आता चालू-बोलू लागला होता; पण तेवढी एकच गोष्ट त्याचे मन रमविण्यास पुरेशी नव्हती. तो एक दिवस विशेष गाजावाजा न करता घरातून बाहेर पडला व युद्धआघाडीवर येऊन दाखल झाला. रशियाने 'बोरोडिनो' येथे नेपोलियनला थोपण्याची तयारी केली होती; त्यामुळे त्याच्या आसमंतात घनघोर युद्धाला तोंड लागणे अटळ होते. पेरीला ही वार्ता कळण्यास विलंब लागला नाही. युद्ध म्हणजे काय चीज आहे हे प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहाता आले तर पाहावे म्हणून तो बोरोडिनो येथे जाण्यास निघाला.

●●●

## १२.

बोरोडिनो येथे येताच पेरीने लष्करी छावणीला भेट दिली. अँड्री येथे लष्करी अधिकारी म्हणून आला असल्याने ही गोष्ट त्याला सहज सुलभ झाली. बापाच्या मृत्यूची वार्ता कळल्याने तो जरा अस्वस्थ होताच, त्यात पेरीच्या भेटीमुळे नताशाची दबलेली स्मृती उफाळून वर आल्यामुळे तो अधिकच अस्वस्थ झाला.

रात्र बरीच होती. छावणीत सर्वत्र सामसूम होती, पण पेरी आणि अँड्री अद्यापि जागे होते. जरा चक्कर मारून यावे म्हणून ते उभयता राहुटीबाहेर पडले.

''मी अनेक लढायांत भाग घेतला पेरी, पण ह्या लढाईत मात्र मी मरणार असं वाटतं मला!'' अँड्रीने शांतताभंग केला. नंतर थोडा वेळ थांबून तो म्हणाला, ''युद्ध ही एक मोठी भयानक भानगड आहे! असला भयानक खेळ खेळायचा आणि मग त्यात शिष्टाचार दाखवायचा आव आणायचा? निव्वळ ढोंग! मी कैदी घ्यायच्या अगर त्यांना सहानुभूती दाखवायच्या अगदी विरुद्ध आहे! त्या भरीला मी पडणार नाही. असल्या भयानक खेळात सामील होणाराने मरणाच्या तयारीनेच यावं मुळी!'' अँड्रीने खांदे उडविले, ''पण माझ्या ह्या साऱ्या विचारांचं दडपण तुझ्यावर काय म्हणून? पेरी, उद्या जरा मौज मेजवानी करू! पुढे काय होईल कुणास ठाऊक? जीवन आहे तोपर्यंत सारी मजा!'' तो खिन्नपणाने म्हणाला.

नेपोलियन रशियन तंत्राने चिडला होता, खवळला होता. रशियन सामना देत नव्हते. माघार घेत होते. जाळपोळ करून मुलूख उजाड करून माघार घेत होते. नेपोलियनचा प्रचंड सेनासागर रशियाच्या अफाट भूमीवर पुढे पुढे जात होता. सेनापती कुझोव्ह मोठी लढाई टाळीत होता. झार त्याच्या ह्या धोरणाला चिडल्यागत झाला. रशियन सेनेची ही सतत माघार त्याला कमीपणाची वाटली. त्याने कुझोव्हला खास हुकूम दिला, ''मॉस्कोला धोका निर्माण होण्यापूर्वी नेपोलियनशी घनघोर संग्राम देऊन त्याला थोपवा.'' झारइतकीच नेपोलियनलाही एकदा सोक्षमोक्ष करण्याची घाई झाली होती. पण कुझोव्ह ऐकण्यास तयार नव्हता. शत्रूला घोळवीत, घोळवीत आत खेचण्याचे त्याचे धोरण कायम होते. रशियाच्या विशाल व जंगलव्याप्त प्रदेशात शत्रूला आत आत खेचीत नेणे त्याला अधिक श्रेयस्कर वाटत होते. चढाई करून शत्रू दमला, अन्नपाण्यासाठी कावरा बावरा झाला, म्हणजे मग

त्याला ठेचण्याचा त्याचा संकल्प होता. त्याच्या वागण्याचा अर्थ न कळल्याने झार खवळला. फ्रेंचांप्रमाणे आपणही नेत्रदीपक विजय मिळवून दाखवावा ह्याची ईर्षा त्याला लागली. इतर दरबारी त्याला भरीला घालीत होते. कुझोव्हला थेरडा, भित्रा, अशा शेलक्या शिव्या मोजीत होते. झारचा प्रत्येक निरोप तो लक्षपूर्वक ऐकल्यागत करी, पण त्याच वेळी नेपोलियनला हुलकावण्या दाखवीत माघार घेई. माघार घेता घेता एखादी चकमक करून फ्रेंचांचे जेवढे नुकसान करता येईल तेवढे करून घेई. शत्रूला जमीनदोस्त करण्याची शक्यता दिसल्याशिवाय मोठ्या लढाईचा धोका पत्करण्यास तो तयार नव्हता.

दोन महिने नेपोलियन चढाई करीत होता, पण अद्यापि शत्रूचा एकही मुडदा त्याच्या हाती लागला नव्हता. एकही तोफ हस्तगत झाली नव्हती, की झेंडा धुळीला मिळविल्याचे श्रेय मिळाले नव्हते. ओरोडिनोच्या आसपास रशिया सामना देण्याची तयारी करीत आहे हे जेव्हा त्याला कळले तेव्हा त्याला खरा आनंद झाला. आतापर्यंतच्या पायपिटीने त्याच्या शिस्तबद्ध सैन्याची बरीचशी शिस्त बारगळली होती. त्यात निराशा पसरू लागली होती. रशियाच्या छुप्या हल्ल्यांनी ते हैराण होऊ लागले होते.

आणि मग एक दिवस युद्धाला तोंड लागले. उभयपक्षी तोफांचा भडिमार चालू होऊन युद्धाची नांदी झडली. उभय सैन्यांची झटापट चालू झाली. नेपोलियनला आज सर्दी झाली होती, तरीही तो आपल्या लष्करी अधिकाऱ्यांना हुकूम फर्मावीत धावपळ करीत होता. आपल्या ठराविक पद्धतीने पाठीशी हात बांधून अस्वस्थपणाने येरझारा घालीत होता. फ्रेंचांच्या प्रत्येक चढाईला रशियन सैनिक कडवा प्रतिकार करीत होते. सतत दहा तास कत्तलखाना चालू होता, पण रशियन माघार घेण्याचे चिन्ह दिसत नव्हते. नेपोलियन बुचकळ्यात पडला. चिंतातुर दिसू लागला.

फ्रेंच तोफखान्याच्या माऱ्याच्या टप्प्यातच अँड्री आपली तुकडी घेऊन सज्ज होता. एका शेतात पाय रोवून ते दबून बसले होते. सतत सहा तास फ्रेंच तोफखाना त्यांच्यावर आग पाखडीत होता. पण चढाई करण्याचा अगर माघार घेण्याचा हुकूम अद्यापि त्यांना मिळत नव्हता. थंडपणाने मारा सोशीत बसण्यापलीकडे गत्यंतरच नव्हते त्यांना! अद्यापि एक फैरही त्यांना झाडली नव्हती. रशियन अधिकाऱ्यांच्या गैदी कारभारामुळे ते पेचात सापडले होते. आतापर्यंत निष्कारणच तिसरा हिस्सा सैनिक गमावून बसले होते.

अँड्रीला काहीही हालचाल न करता बसण्याची पाळी आली होती. त्याला हुकूम मिळत नव्हता; तो स्वतंत्रपणे हुकूम देऊ शकत नव्हता. त्याचे कपडे मळले होते. चेहरा संत्रस्त झाला होता, मलीन झाला होता. जे घडेल ते घडू देणे व घडणारे पाहात बसणे, एवढेच जणू त्याचे काम होऊन बसले होते. माणसे पटापट घायाळ होत होती. घायाळ शिपायांना उचलून दूर नेण्याचे काम व त्यांची जागा भरून काढण्याचे काम तत्परतेने केले जात होते. घायाळ होऊ न देणे व होणाऱ्यांना दूर करणे एवढीच कामगिरी त्याच्यावर आली होती.

कर्कश शीळ मारल्याप्रमाणे आवाज घुमला व मग अल्पावधीतच धडाका उडाला. त्याच्यापासून थोड्याच अंतरावर तोफगोळा आदळला. त्याचा प्रचंड स्फोट झाला. ढेकळांचा, धातूच्या तुकड्यांचा पाऊस पडला. अँड्रीच्या सर्वांगातून एक थंडगार सळक उठली. ह्या दणक्यात अनेकांना इजा होण्याची शक्यता त्याला जाणवली. ''हेऽ असे मेंढरांप्रमाणे घोळका करून उभे राहू नका!... पांगून राहा!'' तो मोठ्याने ओरडला. त्याचा दुय्यम अधिकारी त्याच्या हुकुमाची अंमलबजावणी करण्यास धावणार तोच ''देखो साब! देखो!'' असं ओरडून तो जमिनीवर पालथा पडला. त्यांच्या दिशेने फेकल्या गेलेल्या हातबाँबवर त्याचे लक्ष गेले होते. अँड्रीपासून फारच थोड्या अंतरावर येऊन तो पडला. सहकाऱ्याच्या ह्या वागण्याने फारच थोडा वेळ अँड्री बुचकळ्यात पडल्याप्रमाणे झाला; पण वस्तुस्थिती त्याच्या ध्यानात येण्यास फारसा वेळ लागला नाही. तोही जमिनीवर पालथा पडणार तोच धडाड् करून प्रचंड स्फोट झाला व अँड्री वेडावाकडा जमिनीवर फेकला गेला. अनेक शिपाई त्याच्याकडे धावले. अँड्री बेशुद्ध झाला होता. त्याच्या उजव्या बगलेस पोटाच्या खालच्या बाजूने रक्ताचा पाट वाहात होता.

तत्काळ रुग्णशिबिकेच्या साहाय्याने त्याला

आघाडीपासून अंदाजे अर्ध्या मैलावर असलेल्या रुग्णालयाकडे पाठविण्यात आले. फक्त तीन राहुट्यांत जखमींची सोय करण्यात आली होती. त्यातील एकीमधून रक्ताळलेले कपडे घातलेला एक डॉक्टर बाहेर आला. त्याचे हातही रक्ताने माखले होते. आपल्या चिमटीत धरलेल्या सिगारेटला ते लागून ती खराब होऊ नये म्हणून तो दक्षता घेत होता. त्याने अँड्रीला एकदा निरखून पाहिल्यागत केले व तो ओरडला, ''ह्याला ताबडतोब उपचारासाठी घ्या रे!''

अँड्री शुद्धीवर आला तेव्हा त्याला कळून आले की आपण एका राहुटीत असून एका टेबलावर पडलो आहोत. कोणीतरी त्याच्या तोंडावर पाण्याचे हबके मारीत होते व म्हणत होते, ''लौकरच बरे व्हाल तुम्ही!'' शेजारच्या, दुसऱ्या अशाच एका टेबलावर एका शिपायाचा वस्त्रहीन देह परसला होता. अँड्रीला त्याची मुद्रा दिसत नव्हती, कारण त्याने ती दुसऱ्या बाजूस वळविली होती. त्याचे कुरळे केस अँड्रीला परिचयाचे वाटले. त्याच्या तंगड्या भरदार असल्या तरी पांढऱ्या फटफटीत पडल्या होत्या व पेटके आल्याप्रमाणे तो त्या वेड्यावाकड्या करीत होता. दोन दणकट मदतनिसांनी त्याला दाबून धरले होते व तिसरा त्याच्या छिन्न भिन्न तंगडीवर औषधोपचार करीत होता.

''ओऽय्ऽऽ ओऽ य्ऽऽ मेलो!'' तो मनुष्य खच्चून विव्हळला व ओरडला.

''अरे देवा, हा अँतोन तर नाही ना?'' अँड्रीला शंका आली.

तो चमकला. त्याच्या प्रेयसीला खेचून त्याच्यापासून दूर नेणारा अँतोन त्याच्या शेजारी आपली शेवटची घटका मोजीत पडला होता. अँड्रीला त्याचा राग आला पण एकदम कीवही आली. जीवनातील रागालोभाच्या सीमेपलीकडे जाण्यास अँतोन निघाला होता, विचारात असतानाच अँड्रीला बेशुद्धी आली व फिरून तो घनदाट अंध:कारात बुडाला.

सायंकाळ झाली. युद्ध तात्पुरते विराम पावले. रशियन सैन्याचा बराच नाश झाला, पण फ्रेंचांनाही मोठा विजय मिळाल्याचे समाधान मिळाले नाही.

रात्री आपल्या राहुटीसमोर बाकडे टाकून बसलेला कुझोव्ह आपल्या सहकाऱ्यांना म्हणत होता, ''आम्ही शत्रूला तटवीत आहोत. लढाईच्या सर्वसाधारण नियमाप्रमाणे, आपण उद्या सकाळी शत्रूवर हल्ला चढविला पाहिजे; पण आपली दमछाक झाली असल्याने हल्ला करणं आपल्याला शक्य नाही! ही एक वैशिष्ट्यपूर्ण लढाई आहे! आम्ही ती हरलेलो नाही. माघार घेणं म्हणजे हरणं नव्हे! मला हे मान्य नाही!! आपण विजयी झालो अशी जर नेपोलियनची कल्पना असेल तर त्याचा तो भ्रम आहे. आपण शत्रूला बेताबेताने घायाळ करीत आणला आहे. ह्या रक्तस्त्रावानेच त्याचा शक्तिपात होऊन तो मरणार आहे एक दिवस!''

''शत्रू मॉस्कोला, आपल्या राजधानीला, भिडला तरी आपणास हेच धोरण चालवायचं आहे काय?'' कोणी तरी धिटाईने प्रश्न केला. कुझोव्ह अगदी थंडपणाने, शांतपणाने म्हणाला, ''रशिया वाचवणं महत्त्वाचं आहे! युद्ध टाळून मॉस्को घालवणं मला मान्य आहे. पण युद्ध करून मात्र, सैन्य व मॉस्को दोन्हीही जाण्याची शक्यता आहे,'' नंतर कुझोव्ह ताडकन् उठून उभा राहिला व ओरडला, ''माघार! माघार घेतली जाणार! माझ्या अधिकारांत ढवळाढवळ केलेली किंवा त्याचा अपमान केलेला मला खपणार नाही! माघार! एकदम माघार घेण्याचा हुकूम मी देत आहे तुम्हाला!''

●●●

१३.

रशियन सैन्य माघार घेऊ लागले. मुलुख उजाड करीत माघार घेण्याचे तंत्र काटेकोरपणाने अमलात येऊ लागले.

ह्या प्रचंड माघारीत निकोलस रोस्टोव्ह सामील होता. अँड्रीच्या कुटुंबियांना नेपोलियनच्या मार्गातून काढून सुरक्षित स्थळी नेण्यात त्याची मोठीच मदत झाली. फ्रेंच सैनिक त्यांच्या घरावर धाड घालण्यापूर्वीच निकोलसने ही कामगिरी बजाविल्यामुळे मेरीला त्याच्याबद्दल आस्था वाटू लागली. नताशाचा तो भाऊ असल्याने तिचे मन अस्वस्थ झाले. नकळत आपल्या हातून त्याच्या बहिणीवर अन्याय तर झाला नाही ना, अशी शंका तिच्या मनाला चाटून गेली.

नेपोलियनची धडक मॉस्कोवर येत असल्याची वार्ता पसरताच तेथे एकच गोंधळ उडाला. मॉस्कोला लष्करी भिकाऱ्यांचा तांडा आहे हेही कळणे मुष्कील होऊन बसले होते.

मॉस्को मुंग्यांच्या वारुळाप्रमाणे बुजबुजले होते.

रोस्टोव्ह प्रासादाचे अंगणही आज असेच गजबजून गेले होते. म्हातारा काउंट स्वत: पुढे उभा राहून सामानाची बांधाबांध पाहात होता. मेजे, खुर्च्या, कोच, कपाटे, पलंग, आरसे अनेक मौल्यवान् वस्तू, एकूण एक चीज हलवून नेण्याचा चंग त्याच्या म्हाताऱ्या बायकोने बांधला होता. सुतळीचा तोडाही शत्रूच्या हाती लागू न देण्याची जिद्द तिने बाळगली होती. घरातील 'तसबिरा' गोळा करण्यासही तिने कमी केले नव्हते. ''आटपा! आटपा!! नेपोलियन येऊन धडकेपर्यंत तरी तुमची ही बांधाबांध थांबणार की नाही?'' काउंट रोस्टोव्ह सारखा ओरडत होता. ह्या धांदलीत आघाडीवरून आलेल्या अनेक जखमी शिपायांनी त्या अंगणात तळ टाकला होता. त्यांची ती दीनवाणी अवस्था पाहून नताशा कळवळली होती. त्यांच्याकडे पाहाताना तिलाच काय पण कोणालाही मनस्ताप, क्लेश होण्याजोगी त्यांची अवस्था होती. पट्ट्या बांधलेले जखमी हातपाय घेऊन ते कशी मजल मारणार हे एक कोडेच होते. त्यांना हलविण्याची सोय न झाल्यास ते नेपोलियनच्या पंजात सापडण्याचीच संरक्षण देण्याचे कुझोव्हने टाळले असल्याने नागरिकांची पाचावर धारण बसली. घा ऽऽण्, घाऽऽण् आवाज करून प्रार्थनामंदिरांच्या घंटा रात्रंदिवस धोक्याचा इशारा देत होत्या. नागरिकांना, मॉस्को खाली करण्याच्या सुचना देत होत्या. नेता येईल तेवढी चीजवस्तू गोळा करून मॉस्को सोडण्याच्या नादात असलेल्या नागरिकांनी रस्ते फुलून गेले होते. तशातच आघाडीवरून परत फिरलेल्या सैनिकांचा लोंढाही त्यांच्यात मिसळला होता. ह्या सैनिकांची अवस्था मोठी केविलवाणी होती. त्यांना अन्न नव्हते, कपडा नव्हता. त्यांच्यातील जखमी लोकांची नीट सेवाशुश्रुषा झाली नसल्याने कित्येक आजारी अपंग बनले होते व तशातच त्यांची रखडपट्टी चालू होती. हे सैनिक आहेत का आंधळ्या पांगळ्या शक्यता होती. नताशाला हे दृश्य फार काळ सहन करणे शक्य नव्हते. ती धावतच बापाकडे गेली व म्हणाली, ''बाबा, ह्या लोकांना इथेच सोडून आपण सामान हलविण्याची सोय करणे ठीक नाही! सामान राह्यलं तरी चालेल, पण ह्यांना न्यायची सोय केली पाह्यजे. उघड्या डोळ्यांनी त्यांना फ्रेंचांच्या तावडीत जाऊ देणं शक्य नाही! आपल्यासाठीच सोसताहेत बिचारे!'' जखमी शिपायांची सुटका करण्याची नताशाची कल्पना म्हाताऱ्याला तितकीशी आवडली नाही, पण त्याने फारसा विरोध मात्र केला नाही. नताशाची आई मात्र चांगलीच उसळली. मौल्यवान सामानांचे ढिगारे सोडून ह्या लुळ्यापांगळ्या शिपायांची सोय करणे तिच्या जिवावर आले, पण नताशाच्या हट्टापुढे कोणाचे काहीच चालले नाही. तिने नोकरांना सांगून गाड्यांत लादलेले सामान भराभर काढून टाकले व त्यात जखमी लोकांची बसण्याची सोय केली. नताशाच्या ह्या कृतीने ते जखमी शिपाई आनंदून गेले. कृतज्ञतेने त्यांचे चेहेरे फुलले.

माघार घेणाऱ्या शिपायांच्या लोंढ्याबरोबरच पेरी मॉस्कोत येऊन दाखल झाला. जखमी अँड्रीला घेऊन येणाऱ्या गाडीबरोबरच तो चालत होता. रोस्टोव्ह कुटुंबियांचा व त्यांच्या बरोबरीला जखमी शिपायांचा तांडा मॉस्को सोडून जावयास निघाला, त्याच वेळी पेरी तेथे येऊन थडकला. पेरी ज्या गाडीबरोबर आला

होता ती चांगली बंदिस्त होती. रोस्टोव्ह तांड्याच्या शेवटीच हीही गाडी चालू लागली.

हे सारे लटांबर मॉस्कोच्या रस्त्यातून संथपणे चालले असता, धुळीने माखलेला व श्रमश्रांत झालेला पेरी नताशाच्या दृष्टीस पडला. ती धावतच पेरीकडे आली व म्हणाली, ''तूही येणार ना आमच्याबरोबर?''

''नाही! नाही!! काहीही करून मला इथे मॉस्कोत राहाणं भाग आहे. महत्त्वाचं काम आहे!'' तो म्हणाला. मॉस्कोत शिरणाऱ्या नेपोलियनचा काहीही करून खून करण्याचा विचार त्याच्या डोक्यात घोळत होता. आपली योजना पार पडल्यास आपण रशियाचे 'वीर पुरुष' म्हणून ओळखले जाऊ असे त्याला वाटत होते. त्याला 'वीर' बनण्याचा ध्यास लागला होता.

सोनियाच्या कानात त्याने हळूच काहीतरी सांगितले व मॉस्कोच्या त्या प्रचंड रहदारीत तो कोठेतरी गडप झाला.

रोस्टोव्ह तांडा मॉस्को सोडून दूर पुढे पुढे निघाला आणि पाठोपाठ नेपोलियन मॉस्कोवर येऊन धडकला.

मॉस्कोच्या वेशीवर, नेपोलियन आपल्या लष्करी अधिकाऱ्यांसह येऊन पोचला होता. विजयोत्सवाने त्या शहरात प्रवेश करण्याचा त्याचा मानस होता. पण शहरात सर्व सामसूम दिसत होते. नागरिकांनी नगराचा त्याग केला असल्याने स्मशानशांतता नांदत होती तेथे. कुत्र्याखेरीज महत्त्वाचे असे कोणी त्या वैभवशाली नगरीत राहिल्याचे दिसत नव्हते. हळूहळू नगरही आगीच्या भक्षस्थानी पडू लागले होते. ह्या नगरीचे लोक विनाश टाळण्यासाठी, गुडघे टेकून आपल्यापुढे येतील, दीनवाणेपणाने आपल्याला, आपल्या नगराला, वाचविण्यासाठी याचना करतील, मग आपण उदार हृदयाने त्यांना अभय देऊन आपल्या विजयावर आपल्या दातृत्वाचा, चांगुलपणाचा कळस चढवू ह्या घमेंडीत आलेल्या नेपोलियनचा एकदम अपेक्षाभंग झाला. त्याला आपला उपमर्द झाला असेच वाटले. मॉस्को आगीच्या ज्वालांत धडधडू लागले होते. अग्नीचे धडधडणे व कुत्र्यांचे रडणे एवढाच काय तो आवाज ऐकू येत होता आणि फक्त ह्याच आवाजांनी मॉस्कोच्या वेशीवर त्याचे स्वागत झाले. मॉस्कोची भयाण नीरवता त्याला जाणवली.

''नगरप्रतिनिधींना बोलवा! त्यांना म्हणावं, मी बोलावलं आहे. त्यांच्या ह्या सुंदर नगरीला अभय द्यायला मी तयार आहे!'' तो आपल्या लष्करी अधिकाऱ्यांना म्हणाला. ''भित्रे लेकाचे! त्यांनीच वस्तुत: वेशीत येऊन माझी गाठ घेण्यास हरकत नव्हती!''

मॉस्को पौरस्त्य स्थापत्याने नटले होते. प्रार्थनामंदिरांचे घुमट, मनोरे आकाशाला जाऊन भिडले होते. पश्चिम युरोपमधील नगरांपेक्षा ह्या नगरीचा दिमाख काही आगळा आहे, ह्याची जाणीव नेपोलियनला झाली. प्रत्येक रशियन नागरिकाला ही नगरी मातृस्थान वाटते. ह्या नगरीला आज आपले पाय लागले ह्या विचाराने नेपोलियन बहरून आला. आपण जगात काहीतरी विशेष करून दाखविले ह्या अभिमानाने त्याचा ऊर भरून आला. चित्तवृत्ती तल्लीन झाल्या.

''शत्रूने व्यापलेली नगरी म्हणजे बलात्काराला बळी पडलेली, भ्रष्ट झालेली स्त्री!'' तो तुच्छतेने हसून म्हणाला, ''अशक्य! म्हणे अशक्य! या आणि पाहा म्हणावं, नेपोलियनच्या कोशात अशक्य शब्दाला थारा नाही! आज मी मॉस्को जिंकलं आहे! ह्या नगरीचा मी स्वामी आहे!! ह्या शहराचं भवितव्य आता माझ्या हाती आहे! लहर येण्याचा अवकाश, मी ते संपूर्ण धुळीला मिळवीन!'' त्याने कठोर स्मित केले. ''माझा एक शब्द, एक खूण, ह्या शहराचा निकाल लावण्यास पुरेशी आहे. उगवत्या सूर्याच्या उन्हात चमकणारे त्याचे वैभव आज माझ्या पायांशी येऊन पडले आहे. पण मला त्याचा नाश करायची इच्छा नाही. मॉस्कोच्या क्रेमलिन प्रासादात उभे राहून एका नव्या संस्कृतीचे दर्शन मला भिकारड्यांना घडवायचे आहे!'' तो मनाशी म्हणत होता.

''आणा! नगर प्रतिनिधींना आणून माझ्यापुढे हजर करा!'' तो फिरून गरजला. एक लष्करी अधिकारी काही सैनिक घेऊन शहरात दवडला आणि नेपोलियन नगरप्रतिनिधींशी करावयाच्या बोलण्याची मनातल्या मनात जुळवाजुळव करू लागला. आपल्या रुबाबाने, चांगुलपणाने त्यांना दिपवून टाकण्याचा त्याचा विचार होता.

बराच वेळ झाला तरी नगरप्रतिनिधी भेटण्यास येण्याचे चिन्ह दिसेना. त्याचे सैनिक शहर ओस पडले असल्याची वार्ता घेऊन आले होते. भटक्या कुत्र्यांखेरीज

मॉस्कोत नेपोलियनचा निरोप ऐकण्यास कोणी शिल्लकच नव्हते! पण नेपोलियनपुढे जाऊन हे सांगण्याची हिंमत कोणास होती! काही लोकांनी लुटूपुटीचे शिष्टमंडळ तयार करून त्याच्यापुढे नेऊन उभे करण्याचा विचार चालविला होता.

नेपोलियनला वस्तुस्थितीची जाणीव होण्यास फारसा वेळ लागला नाही. त्याने काय ओळखावयाचे ते ओळखले. त्याने खुणावताच तोफेचा गडगडाट झाला व त्याच्या सैन्याचा लोंढा मॉस्को शहरात शिरला.

मधमाश्यांनी त्यागिलेल्या पोवळ्याप्रमाणे, मॉस्को शहर रिकामे पडले होते. ''भित्रे लेकाचे, शहर सोडून पळाले आहेत!'' आपण योजिलेले नाटक वठविण्यास संधी न मिळाल्याने चिडलेला नेपोलियन तिरस्काराने म्हणाला.

फ्रेंच सैन्याने व्यापिलेले मॉस्को धडाडून आगीच्या भक्ष्यस्थानी पडत होते. फ्रेंच सैनिक आता त्या आगीत तेल ओतीत होते. लुटालुटीचा धूमधडाका चालू होता. ज्याला जे वाटेल ते करण्याची मुभा होती. फ्रेंच सैनिकांनी लूट गोळा करण्याची चढाओढ चालू केली होती. आगीने रात्रीचाही दिवस करून सोडला होता.

गाडीवाल्याचा लांब डगला अडकवून पेरी ही लूटमार पाहात भिकाऱ्याप्रमाणे भकास मुद्रेने भटकत होता. नेपोलियनच्या खुनासाठी टपलेला पेरी एक वेळ संधी मिळूनही पिस्तुलाचा चाप ओढू शकला नव्हता. माणूस मारणे त्याला शक्य होत नव्हते. खुद्द नेपोलियनसारख्या, आपल्या देशावर आपत्ती आणणाऱ्या माणसालाही मारण्यास त्याचे मन धजावत नव्हते. माणसाने माणसाला मारण्यात काहीतरी लज्जास्पद आहे अशीच त्याची भावना होऊन बसली होती. तो भीत नव्हता, पण त्याला घृणा वाटत होती. हे दुष्कृत्य आहे अशी जाणीव बोचत होती. फ्रेंचांच्या दुष्कृत्यांची एवढी किळस त्याला आली होती की आपण त्यातच सामील होऊ, जमा होऊ ह्याच भीतीने त्याला घेरले होते. त्याचे धर्मग्रंथवाचन त्याला नडत होते.

तो असाच एक दिवस एका ओसाड रस्त्याने भटकत होता. पाय नेतील तिकडे जात होता. एका करुण किंकाळीने तो भानावर आला. इकडे तिकडे पाहू लागला. फ्रेंच शिपायांच्या तावडीत सापडलेली एक दुर्दैवी मुलगी धडपडत होती. किंकाळ्या फोडीत होती. फ्रेंच धटिंगण तिच्याशी झोंबीत होते, हसत -खिदळत होते. पेरीला ते दृश्य असह्य झाले. त्याने एकदम त्या रानगटांवर चाल केली. एका क्षुल्लक, फाटक्या माणसाने दाखविलेली ही धिटाई पाहून फ्रेंच सैनिक क्षणभर थक्क झाले. ह्या हल्ल्याने बावचळून त्यांनी त्या पोरीला सोडले व पेरीवर हल्ला चढविला. ''पळ! पोरी पळ!!'' पेरी ओरडला. पण पुढे काय झाले ते त्याला समजलेच नाही. सैनिकांनी केलेल्या लाथा बुक्क्यांच्या भडिमारामुळे तो क्षणार्धात बेशुद्ध झाला.

हाती लागलेल्या अनेक रशियन सैनिकांना, नागरिकांना, युद्धकैदी करण्यात आले होते. गोठ्या-गव्हाणींचा तुरुंगाप्रमाणे उपयोग करण्यात येऊन तेथे त्यांना लष्करी पाहाऱ्याखाली डांबण्यात आले होते. अशाच एका तुरुंगात पेरीला ढकलण्यात आले.

●●●

## १४.

पेरीला फ्रेंच सैनिकांनी, एक दिवस इतर काही कैद्यांबरोबर बाहेर नेले. आपणास कोठे नेण्यात येत आहे, पुढे काय करण्यात येणार आहे, ह्याची काहीच कल्पना ह्या कैद्यांना नव्हती. सकाळची कोवळी उन्हे सर्वत्र लख्ख पसरली होती. त्यांना ज्या ठिकाणी नेण्यात आले, त्या ठिकाणचे दृश्य पाहून पेरीचे रक्त गोठून गेले. दोनचार कैद्यांना वधस्तंभाना बांधण्यात येई. पडघम वाजत, रायफली कडाडत आणि खांद्याला बांधलेले कैदी छातीतून लालभडक रक्तची गुळणी टाकून निर्जीवपणाने माना टाकीत. पेरी ह्या भयानक दृश्याने हादरला, थिजून गेला. त्याचे डोळे ओढल्यागत झाले. पण काय झाले कोण जाणे? पेरीची पाळी येण्यापूर्वीच ही कत्तल आखडती घेण्यात आली.

पेरीला परत नेऊन त्या तबेल्यात डांबण्यात आले.

झाल्या प्रकाराने बधिर झालेला पेरी पोक काढून, तबेल्याच्या भिंतीला टेकून, दिवसभर अवघडल्यागत उदासपणाने बसून होता. त्याच्या जवळच प्लेतां नावाचा शेतकरी बसला होता. आपण कैदी आहोत ह्याची फारशी फिकीर प्लेतांला दिसत नव्हती. तो मजेत, खुशीत असल्याप्रमाणे दिसत होता. फाटके कपडे, दाढीचे जंगल व तुरुंगवजा असलेल्या ह्या तबेल्यातील वास्तव्य, ह्यामुळेच तो कैदी आहे हे समजून येत होते. त्याच्या चेहऱ्यावर मात्र खेदाची, दु:खाची कोणतीच भावना नव्हती. पेरीकडे सहानुभूतीने पाहात तो म्हणाला, ''कसला विचार करतोस बाबा? काय व्हायचं ते आता होणारच आहे, ते टाळणं आपल्या हाती आता थोडंच आहे! उद्या येणाऱ्या जगात आम्ही फिरून जन्माला आलो व परमेश्वराने काही खुलासा केला तरच, का आणि कसं झालं ह्याचा काही खुलासा आपणाला कळला तर कळणार! मग उगीच डोक्याला शीण का?'' एखाद्या स्थितप्रज्ञाप्रमाणे गंभीरपणाने तो उद्गारला. प्लेतांने बटाट्यांचे काही तुकडे काढून पेरीला खायला दिले, आपण खाल्ले व काही आपल्या कुत्र्याला दिले. त्याच्याबरोबर त्याचे मरतुकडे कुत्रेही आले होते आणि फ्रेंच शिपायांनी ते त्याच्याजवळ राहूही दिले होते. कैदेत त्याला त्याची सोबत वाटत होती. ''परिस्थितीशी जुळते मिळते घेऊन जगण्यापलीकडे आपल्या हाती काय आहे? दैवाचे लागेबांधे हे सारे! आपण मानू तो आनंद! नाही ते दु:ख! मग आहे त्यातच आनंद का मानू नये?'' फिरून प्लेतांने आपली टकळी चालू केली. नंतर भली मोठी जांभई देऊन त्याने प्रार्थना गुणगुणण्यास सुरुवात केली. त्याच्या मुद्रेवर पसरणारी प्रगाढ शांत समाधानाची भावना पाहून पेरी आश्चर्यचकित झाला. प्लेतांच्या मर्यादित विश्वाच्या चिंधड्या नेपोलियनच्या लष्कराने आज केल्या होत्या, पण ज्या विश्वासाच्या पायावर त्याने ते उभारले होते, तो पाया नेपोलियन हादरू शकला नव्हता. त्याच पायावर फिरून नवे विश्व उभारण्याची धमक प्लेतांला आहे आणि म्हणूनच तो समाधानी आहे ह्याची जाणीव पेरीला झाली. विश्वासावर आधारलेला विश्वाचा पाया ढळविण्याचे सामर्थ्य रक्ताचे सडे शिंपणाऱ्या लष्करात नाही ह्याची खात्री त्याला पटली.

रोस्टोव्ह तांड्याने आपल्या पहिल्या रात्रीचा मुक्काम टाकला. धडधडत्या मॉस्कोच्या ज्वालांचा लाल भडक प्रकाश, दूरच्या क्षितिजावर त्यांना येथून दिसत होता. आपल्या प्रवासात अँड्री आपणाबरोबर आहे ही गोष्ट फार वेळ नताशापासून चोरून ठेवणे सोनियाला जमले नाही. अँड्रीची प्रकृती घडोघडी खालावू लागली होती. नताशाला ह्या अचानक वार्तेने चांगलाच धक्का बसला. ती तशीच्या तशीच उठून अँड्रीला ठेवण्यात आलेल्या झोपडीकडे चालू लागली. झोपेत चालणाऱ्या माणसाप्रमाणे तिची अवस्था होती. मृतवत् पांढरा पडलेला अँड्री, काहीतरी जुळणी करून तयार करण्यात आलेल्या एका खाटल्यावर पडला होता. नताशा हळूच गुडघे टेकून त्याच्या बिछान्यापाशी बसली व तिने आपले मस्तक त्याच्या गालावर टेकले. ''क्षमा कर! मला क्षमा कर!!'' ती पुटपुटली. तिच्या स्पर्शाने अँड्री भानावर आला होता. ''क्षमा... कसली? .... कशाबद्दल? .... नताशा, माझं तुझ्यावर प्रेम आहे.... पूर्वी होतं.... त्याहून अधिक आहे....'' अँड्री कसेबसे म्हणाला. नताशाच्या डोळ्यातून समाधानाचे, आनंदाचे अश्रू झरझर ओघळू लागले. तिचे अंत:करण भरून आले.

प्रवास चालू झाला. नताशा अँड्रीची काळजी घेत होती, पण जखमेच्या वेदना वाढत होत्या. ती गंभीर इजा आरंभीच उपेक्षिली गेली असल्याने, आता ती बरी होण्याची आशा दुरावली होती. प्रवासाच्या रगाड्यात जास्त काही करणे अशक्य होते.

एक दिवस रात्री अँड्रीला, आसऱ्यासाठी खेडेगावातील एका मठात ठेवण्यात आले. फ्रेंचांची टेहेळणी चुकवून प्रवास करणे दिवसेंदिवस कठीण होऊ लागले होते. अँड्रीला आपले भवितव्य कळून चुकल्याप्रमाणे झाले होते. जवळ बसलेल्या नताशाला तो म्हणत होता, 'प्रेम म्हणजे काय ते आता मला कळलं! प्रेम! खरं प्रेम! ते मिळविण्यात, जिंकण्यात नसून, त्याच्यासाठी त्याचा त्याग करण्यात आहे!'' त्याची निराशा नताशाला जाणवत होती, पण ती दूर करणे तिच्या शक्तीपलीकडचे होते.

रात्र बरीच झाली होती. मेणबत्ती जळत जळत संपून विझण्याच्या बेतात आली होती. अँड्रीचा श्वासोच्छ्वास

अनियमित होऊ लागला होता. शेजारी नताशा घाबरून बसली होती. ''नताशा, मला खूपच चांगलं स्वप्न पडत आहे... मला एक उघडा दरवाजा दिसत आहे... मला त्या दारातून आत जायचं आहे.... पलीकडे जायचं आहे....मी मरणार आहे... मरत आहे नताशा!... मरण हीच खरी जागृती... किती साधी गोष्ट आहे ही!.... '' बोलता बोलता अँड्रीचे डोळे मिटले. त्याचा अनियमित श्वास मंद होत होत कायम विराम पावला. ''अँड्री! ... अँड्री!!... कुठे गेलास? .. कुठे आहेस तू?'' नताशा त्याच्या डोक्यावर आपले मस्तक टेकून हमसाहमशी रडू लागली. एक काळ तिला दुरावलेला अँड्री, तिच्या जवळ जवळ आल्यागत झाला आणि कायमचा दूर... दूर निघून गेला.

महिने न् महिने, मॉस्कोत तळ टाकून बसलेले फ्रेंच सैनिक, आता कंटाळू लागले होते. त्यांचे धैर्य खचू लागले होते. शेकडो मैल दूर राहिलेली मातृभूमीवरील घरे -दारे, बायका-पोरे, त्यांना त्यांच्या डोळ्यापुढे दिसू लागली. हे अनिश्चित वातावरण केव्हा निवळणार ह्याची हुरहुर लागली. लुटीचा, कत्तलीचा उन्माद ओसरला. मॉस्कोपलीकडे हजारो मैल पसरलेला 'रशिया' अद्यापि जिवंत होता. त्यात काय शिजत आहे, ह्या शंकेने ते भयाकुल झाले. रशियन चढाईच्या कंड्या पिकू लागल्या. रशियन सेनेची रग खची झाली नसून ती अधिकच वाढली असल्याची वार्ता पसरू लागली. चोरट्या हल्ल्यांचे प्रमाण वाढून त्याचे प्रत्यंतर येऊ लागले आणि वस्तूस्थितीही तशीच होती. रशियन तरुण स्वयंस्फूर्तीने लाखा-लाखांनी लष्करात भरती होऊ लागले होते, तर इकडे फ्रेंच सैनिकांची संख्या रोडावत होती. हजारो मैल दूर आलेले सैनिक आजाराला, उपासमारीला बळी पडत होते. भीती व शक्तिपात ह्या दोहोंनीही त्यांना ग्रासले होते.

परत निघण्याचा हुकूम देण्याखेरीज नेपोलियनला गत्यंतर नव्हते. मॉस्को जिंकले, पण रशिया त्याने जिंकला नव्हता! त्याने अनेक विजय मिळविले पण खरा निर्णायक विजय त्याला मिळाला नव्हता! त्यामुळे हा विजयी बादशहा पराभूत होऊन काढता पाय घेत होता. त्याचे एका काळचे ते 'भव्य सैन्य' आता मॉस्को सोडून परत निघाले होते. आत येताना असलेला जोम आता जाताना साफ साफ जिरला होता.

पडघम वाजत होते. झेंडे फडकत होते. लुटीची गठळी लादून घेतल्याने शिपाई अवजड झाले होते. घरी परतत असतानाही ते पाय जलद उचलत नव्हते. हजारो गाड्यांतही लुटीचा माल ठासून कोंबण्यात आला होता. धनिकांचे वाडे, प्रार्थनामंदिरे, सर्व काही लुटून फस्त करण्यात आले होते. युद्धकैद्यांचा तांडाही बरोबर नेण्यात येत होता. ही मानवी लूट बरोबर का, कशासाठी नेली जात होती कोण जाणे? आपणास कोठे, कशासाठी नेले जात आहे हे कैद्यांना कळण्यास मार्ग नव्हता. पेरीही ह्या कैद्यांच्या तांड्यात चालत होता. आपण आपल्या मातृभूमीला मुकत आहोत ह्या जाणिवेने व भवितव्याच्या अनिश्चिततेने कैद्यांच्या मुद्रेवर भयाण कळा पसरली होती. पण त्यांना चालणे भाग होते. फ्रेंच सैनिकांचे आसूड त्यांना गुरामेंढरांप्रमाणे वळवीत होते, हाकीत होते. प्लेतां व त्याचा कुत्राही पेरीबरोबरच ह्या अहेतुक प्रवासात रखडत होते.

सेनापती कुझोव्ह आता जोशात आला होता. मजेत होता. ''हे रानटी श्वापद आता घायकुतीला येऊन माघारी फिरलं आहे. सतत आपल्या हल्ल्यांचे फटकारे त्याच्या ढुंगणावर आता ओढले पाहिजेत! त्याला चालत ठेवण्यास, बसू न देण्यास एवढा एकच मार्ग! आता माघारी उलटण्याची त्याची हिंमत नाही. त्यात तेवढं भान नाही! फ्रान्सला ते धड जिवंतपणी पोचलं म्हणजे जिंकली त्याने!'' तो आपल्या सहकाऱ्यांना बजावीत होता.

जेत्यांचीही पिछेहाट चालू होती आणि पराजित त्यांच्या पाठीवर सतत हल्ले चढवून त्यांना रेटीत होते, सतावीत होते. सामग्रीचा तुटवडा घडी घडी जाणवू लागला होता. रशियाचा जीवघेणा हिवाळा सर्वत्र तांडव-नृत्य करू लागला होता. लुटीची गाठोडीच काय पण लष्करी सामग्रीही हलविणे दुरापास्त होऊ लागले. मार्गात साचलेल्या हिमावर ती इतस्तत: पसरलेली दिसू लागली. जिवाचे ओझे सांभाळता सांभळता पुरेवाट झाली. हे वाळले ओझे कोण सांभाळणार? वाहून नेणार? दमलेल्या फ्रेंच लष्कराची दुर्दशा होऊ लागली. गनिमी हल्ल्याचा वेग व तीव्रता वाढू लागली.

ह्या रखडपट्टीत कैद्यांचे भयंकर हाल होत. माघार घेणाऱ्या लष्कराबरोबर चाल ठेवणे त्यांना अशक्य होऊ लागले. थंडीने ते निळे काळे पडले होते. सांधान् सांधा खिळखिळा होऊन दुखू लागल्याने त्यांना धड चालताही येईना. रेंगाळणाऱ्या कैद्यांना आसूडाने झोडपले जाई अगर खडाखड गोळ्या घालून ठार केले जाई. पेरी जात्याच धडधाकट असल्याने कसाबसा गती

टिकवून होता. पण प्लेतांला चालणे अशक्य झाले. एक दिवस खचून तो खाली बसला. दाढीच्या जंगलातून आपले दात दाखवीत त्याने पेरीकडे पाहून मंद स्मित केले. कुत्र्याला कुरवाळले.

''उठो! चलो जलदी!!'' फ्रेंच सैनिक त्याच्या अंगावर ओरडला. प्लेतांने त्याच्याकडे उर्मटपणाने पाहिले व तुच्छतेने तो बर्फावर थुंकला. सैनिकाची रायफल उचलली गेली. नेम धरला गेला. चाप ओढला गेला. त्या थंडगार वातावरणात रायफलचा आवाज घुमला. प्लेतां उरले सुरले रक्त सांडीत हिमावर पसरला. निश्चल झाला. चालण्याच्या हुकमाची कदर करण्यापलीकडे गेला. पेरीच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले, पण त्याला चालणे भाग होते. प्लेतांचा मृतदेह तसाच हिमात टाकून त्याला पुढे जाणे भाग होते. त्याने त्याचे ते चिमुकले कुत्रे बगलेत मारले व तो चालू लागला.

शेजारीच असलेल्या पाईन वृक्षराजीत दोलकोव्ह आपल्या कोझॅक सैनिकांना घेऊन दबून बसला होता. ससाण्याच्या नजरेने तो फ्रेंच सैनिकांची हालचाल न्याहाळीत होता. गनिमी लढाई हा दोलकोव्हचा आवडता खेळ होता. निकोलसचा छोटा भाऊ, अवघा अठरा वर्षांचा पेत्या रोस्टोव्ह, त्याच्या ह्या तुकडीतच दाखल झाला होता. हल्ला चढविण्यासाठी तो उतावीळ झाला होता. दोलकोव्हला तगादा करीत होता. ''मी येणार हं तुमच्या बरोबर!'' असे बजावीत होता.

आणि मग गुडघा गुडघा हिमात रेंगाळणाऱ्या ह्या फ्रेंच सैन्यावर दोलकोव्हने अचानक झडप घातली. प्रतिकारासाठी सज्ज होण्यापूर्वी अनेक फ्रेंच सैनिक खतम् झाले. चकमक मोठी तजेलदार व झटपट झाली. पेत्याने तरवार काढून, एका दाढीवाल्या व कपडे रक्ताने भरलेल्या फ्रेंच सैनिकाच्या अंगावर घोडा घातला. सैनिक सावध होता. त्याने पेत्यावर रायफल रोखली. ''पोरा, सांभाळ!'' दोलकोव्ह ओरडला; पण एवढ्यात रायफल कडाडली. पेत्याचा घोडा चक्कर मक्कर होऊन गर्रकन फिरला. पेत्या खोगिरावरून धडपडत घसरला आणि मग उलटा पालटा होऊन खाली हिमावर कोसळला. थंड झाला. फ्रेंच सैनिकाचा दोलकोव्हच्या गोळीने बळी घेतला. पण पेत्याच्या मृत्यूने त्याचे काळीज फाटून गेले.

●●●

१५.

दोलकोव्हच्या तुफानी हल्ल्यातून बचावलेल्या काही फ्रेंच सैनिकांनी पळ काढला. काही चकमकीत ठार झाले, तर काही कैद झाले. रशियन कैद्यांची सुटका झाली. त्यांनी ओरडून आनंद व्यक्त केला. आनंदातिशयाने काहीना रडू कोसळले. पेरी बावरल्यागत झाला. आपण स्वतंत्र झालो, बंधनमुक्त झालो ही वस्तुस्थितीही त्याला आकलन होईना. तो मूढ बनून गेला होता. दोलकोव्ह त्याच्यापाशी आला. त्याने आपले ऊबदार पांघरूण त्याच्या अंगाभोवती लपेटले. ''पेरी, हेलेनच्या मृत्यूची वार्ता तुला बहुधा समजली नसेल!'' तो म्हणाला, ''मला ठार मारावं असं कित्येकदा तुला वाटलं असेल, नाही? पेरी! मला तुझी क्षमा मागायची आहे!'' बधिर झालेल्या पेरीने मुकाट्याने आपला हात पुढे केला व दोलकोव्हने तो प्रेमाने दाबला.

कैद झालेल्या फ्रेंच शिपायांचे एक टोळके दोलकोव्हपुढे आणून हजर करण्यात आले. ''ह्यांना घेऊन जा!'' त्याने हुकूम दिला. त्याचा चेहरा कठोर आणि उग्र दिसत होता. ''ह्यांचं काय करायचं ते तुम्हाला चांगलं ठाऊक आहे!'' क्षणभराने तो व पेरी, मरून पडलेल्या पेत्यापाशी गेले. त्याच्यासाठी थडगे खणण्यात आले. कोवळ्या पेत्याचा मृतदेह त्यात ठेवताना दोघांनाही अत्यंत दु:ख झाले. एवढ्यात रायफलींची फैर झडली. ''तुझ्या खुनाचं प्रायश्चित्त दिलं गेलं!'' दोलकोव्ह ओठ दाताखाली चावीत म्हणाला.

टेकीला आलेल्या फ्रेंचांवर संकटांमागून संकट कोसळत होती. नेपोलियनच्या ह्या 'भव्य' सेनेची अक्षरश: वाताहत झाली होती. उरलेल्या थोड्याफार सैन्याच्या मार्गात बेरेझिना नदी पसरली होती. नदी गोठण्याच्या पंथात आली होती. पण गोठली नव्हती. थंडगार पाण्याचा हा प्रचंड प्रवाह होड्यांचा कृत्रिम पूल

तयार करून ओलांडणे भाग होते. पूल तयार झाला. नेपोलियन, काही लष्करी अधिकारी व सैनिक पलीकडे गेले न गेले तोच रशियन तोफखाना गर्जू लागला. पुलाच्या ठिकऱ्या उडाल्या. असंख्य सैनिक त्या थंडगार पाण्याच्या लोंढ्यात गडप झाले.

हुकुमावर हुकूम फर्मावून नेपोलियनचा घसा कोरडा पडला. आज त्याच्या हुकुमांची अंमलबजावणी होत नव्हती. होणे शक्य नव्हते. त्याचे सारे लष्करी यंत्र विस्कळीत झाले होते. मोडून तोडून पार निकामी झाले होते. संतापाने, निराशेने त्याच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले. आज त्याचा संताप वांझ ठरला होता. त्याने धाडकन् हिमगाडीत अंग टाकले. कडाकड् घोड्यांच्या पाठीवर आसूड ओढले. त्या मुक्या जनावरांवर आपला संताप काढणे एवढेच त्याला आता शक्य होते. आपण निराधार, निराश्रित, दुबळे झालो आहोत ह्याची जाणीव त्याला प्रकर्षाने झाली.

रोस्टोव्ह कुटुंब मॉस्कोला परत आले.

त्यांच्या भव्य प्रासादाचा उकिरडा बनून गेला होता. सर्वत्र मोडतोड झाली होती. मौल्यवान् सामान नाहीसे झाले होते. उंची मेजे, खुर्च्या, कोच ह्यांचा उपयोग शेकोटीसाठी करण्यात आला होता. फ्रेंच सैनिकांच्या वास्तव्याच्या व लीलांच्या त्या भयंकर खाणाखुणा पाहून प्रत्येकाचा जीव कासावीस होत होता.

अँड्रीच्या व बापाच्या मृत्यूने निराधार झालेली मेरी रोस्टोव्ह कुटुंबाच्या आश्रयास आली होती. सोनियाने निकोलसला वचनमुक्त केले. मेरीचा निकोलसशी विवाह तिला अटळ वाटू लागला आणि घडलेही पण तेच. तिचे घराणे म्हाताऱ्या काउंटेसला बरोबरीचे, तोडीचे तर वाटलेच पण बोलन्स्की मालमत्ताही तिच्या व्यवहारी मनाला आवडल्याशिवाय राहिली नाही. निकोलसला आईच्या शब्दाला मान देणे भाग होते. व्यवहारी जगात सोनियाला माघार घेणे भाग होते आणि तिने तेच केले.

नताशा उध्वस्त घरातून हिंडत होती. समाधानाने म्हणत होती, ''घराचा काही सर्वस्वी नाश झालेला नाही! निम्मा भाग तर चांगला शाबूत आहे!'' पण क्षणभरातच तिची वृत्ती बदलली. तिला पेत्या दिसू लागला. अँड्री दिसू लागला. 'संचलनाचा' दिवस तिला आठवला. त्या दिवशी घरात कशी किलबिल चालू होती! आनंद कसा ओसंडत होता! 'तो दिवस, तसा दिवस घरात फिरून उजाडणार का?' तिच्या मनात विचार आला. खिन्नपणाने ती इतर मंडळी उभी असलेल्या जागी जाण्यास निघाली. पण एवढ्यात दरवाजात उभ्या असलेल्या एका माणसाची आकृती तिला अस्पष्ट दिसली. ती व्यक्ती चालत चालत पुढे प्रकाशात आली. नताशाला ती ओळखली. तो पेरी होता. हर्षाची एक अस्फुट आरोळी ठोकून ती पुढे धावली व त्याने पसरलेल्या बाहूंचा तिने आश्रय घेतला. ''पेरी! पेरी! तुला पाहून मला कित्ती, कित्ती आनंद झाला म्हणून सांगू!'' ती म्हणाली.

हातात हात घालून नताशा व पेरी बागेत पडलेल्या उध्वस्त वस्तूंच्या ढिगाऱ्यातून मार्ग काढीत बोलत बोलत चालले होते. नव्या आनंदात, त्यांच्या आजूबाजूस पसरलेल्या जुन्या विध्वंसाचा त्यांना जणू विसरच पडला होता.

''कित्ती, कित्ती यातनांतून जावं लागलं रे तुला!'' नताशा म्हणत होती.

''होय, पण त्यामुळे मला खूप खूप शिकायलाही मिळालं. यातना, मृत्यू, लढाया ही जीवनातील कटू सत्यं मान्य केली पाहिजेत हे मी शिकलो, त्याचप्रमाणे शांतता, जन्म, आनंद हीही मानवी जीवनाची दुसरी प्रलोभनीय बाजू आहे ह्याचीही जाणीव मला झाली नताशा!''

नताशाने मान डोलवली व मधुर स्मित करीत ती म्हणाली, ''पेरी, तू एकदा काय म्हणाला होतास आठवतं?... मी सुंदर असतो... आणि आणि...'' ती पुढे बोलू शकली नाही, पण पेरीने ते जाणले. त्याने हळुवारपणाने तिला जवळ केले.

सकाळची कोवळी उन्हे सर्वत्र पसरली होती.

नताशा आणि पेरी हातात हात घालून उभे होते.

त्याना शांतता मिळाली होती. नव्याने त्यांनी एकमेकांना ओळखले होते, जवळ केले होते.

''साऱ्यात अवघड पण आवश्यक गोष्ट म्हणजे जीवनावर अढळ श्रद्धा, निरागस प्रेम! आत्यंतिक यातनांतही जीवनावर मनुष्य प्रेम करतो. कारण 'जीवन' हेच जगाचे सार-सर्वस्व आहे. जीवनावरील श्रद्धा हीच परमेश्वरावरील श्रद्धा! जो जीवनावर प्रेम करतो तोच परमेश्वरावर प्रेम करतो!''

●●●